दैनिक

# राष्ट्र सह्याद्री

अहिल्यानगर | पुणे | छत्रपती संभाजीनगर | बीड | धाराशिव | नाशिक येथून दररोज प्रसिध्द

संपादक : काकासाहेब नवले I RNI No. MAHMAR/2019/82605 I वर्ष ७ वे I पाने ८ I मुल्य रू. ४.०० I अंक ३३५ I शुक्रवार १८ सप्टेंबर २०२६

I पोस्टल परवाना : G-2/Rashtra Shyadri/RNP/2025-26 I www.rashtrasahyadri.com

## ठाकरेंचा १९ लाख शपथपत्रांचा दावा १९ मुद्यात खोडला

**मुंबई :** शिवसेना पक्ष आणि चिन्हाबाबात सुप्रीम कोर्टात सुनावणी पार पडली. एकनाथ शिंदे यांच्या वतीने नीरज किशन कौल यांनी युक्तिवाद केला. यावेळी शिंदेंच्या वकिलांनी न्यायालयात सादर केली ठाकरेंना झटका देणारी शॉकिंग आकडेवारी सादर केली.ठाकरेंचा १९ लाख शपथपत्रांचा दावा शिंदेच्या वकिलांनी १९ मुद्द्यात खोटा ठरवला. ठाकरेंकडून १९ लाख शपथपत्र सादर करण्यात आली. तर शिंदेंकडून फक्त चार लाख शपथपत्र सादर केली गेली अशी माहिती ठाकरेंची वकिल देवदत्त कामत यांनी यापूर्वी पार पडलेल्या निवडणुकीत सादर केली होती. त्यांचा हाच दावा शिंदेच्या वकिलांनी आकडेवारीसह खोडून काढला आहे.

# हा शेवटचा विश्वास... जरांगेचे उपोषण मागे!

## १० दिवसांचा 'अल्टीमेटम्' - दगाफटका झाल्यास मुंबईवर धडक

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**जामखेड :** मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी गेल्या २० दिवसांपासून उपोषणाला बसलेल्या मनोज जरांगे यांनी अखेर आपले उपोषण मागे घेतले आहे. सलग उपोषणामुळे त्यांची प्रकृती चिंताजनक झाली होती आणि त्यांनी वैद्यकीय उपचार घेण्यासही नकार दिला होता. अखेर पाटोदा येथे महायुती सरकारच्या शिष्टमंडळाशी झालेल्या चर्चेनंतर त्यांनी हा निर्णय घेतला.

### पाटोदा येथे झाली महत्त्वाची बैठक

महसूल मंत्री राधाकृष्ण विखे, भाजप आ. प्रसाद लाड, दादा भुसे, सुरेश धस यांच्या शिष्टमंडळाने जरांगे यांची भेट घेतली. या यशस्वी चर्चेनंतर मनोज जरांगे यांनी उपोषण मागे घेण्याचा निर्णय घेतला.

मात्र उपोषण मागे घेतले असले तरी मराठा समाजाचे हे 'निर्णायक आंदोलन' सुरूच राहील आणि सरकारने दगाफटका केल्यास तीव्र स्वरूपाचे आंदोलन करू असा स्पष्ट इशारा जरांगे यांनी दिला आहे.

### सरकारला ९० दिवसांचा अल्टीमेटम

मराठा आरक्षणाचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी मनोज जरांगे यांनी फडणवीस सरकारला ३ महिन्यांचा (९० दिवस) वेळ, महत्त्वाचे मुद्दे आणि मागण्या सातारा, कोल्हापूर, औंध संस्थानांच्या गॅझेटियरनुसार जीआर (GR) हैदराबाद गॅझेटियरनुसार कुणबी प्रमाणपत्रांचे वाटप करावे आणि त्यांना तात्काळ वैधता द्यावी ५८ लाख कुणबी नोंदींपैकी एकही नोंद कमी होणार नाही. याचे सरकारकडून लेखी (टाईम बाँड) घेतले जाईल

कुणबी नोंदी शोधण्याची मोहीम- आणखी व्यापक राबवावी - जरांगे स्वतःची मदत सरकारला देणार असून विखे पाटलांनी ती स्वीकारली आहे.

### आम्ही या मुद्द्यांवर तयार आहोत

- असे देवेंद्र फडणवीस यांनी स्वतः व्हिडिओ जारी करून स्पष्ट सांगावे, अशी मागणी
- EWS आणि SEBC चे विषय लवकरात लवकर मार्गी लावावेत
- 'सारथी' संस्थेचे प्रलंबित प्रश्न सोडवावेत.
- आरक्षण आंदोलनात बलिदान दिलेल्या आंदोलकांच्या कुटुंबांना

### शिष्टमंडळाची आश्वासने

राधाकृष्ण विखे पाटील यांनी सांगितले की, सातारा, कोल्हापूर आणि औंध संस्थानांचा सुमारे ३ ते ४ महिन्यांत पूर्ण होईल. हैदराबाद गॅझेटच्या जीआरमध्ये आवश्यक सुधारणा केल्या जातील. सर्व जात पडताळणी समित्यांची विशेष शिबिरे भरवून समाजाची कोणतीही फसवणूक होणार नाही याची काळजी घेतली जाईल.

दादा भुसे यांनी मागासवर्ग आयोगाच्या अहवालानुसार नियमांत बसवून जीआर दुरुस्तीची प्रक्रिया केली जाईल, असा विश्वास व्यक्त केला.

प्रसाद लाड यांनी सांगितले की मुख्यमंत्री सध्या मराठवाड्यात असून ध्वजारोहणानंतर आपल्या भाषणात यावर अधिकृत भूमिका मांडतील.



### हा शेवटचा विश्वास- मनोज जरांगे पाटील

जरांगे पाटील यांनी भावूक होत सांगितले...मी सरकारवर शेवटचा विश्वास ठेवत आहे. जर यावेळी विश्वासघात झाला, तर यापुढे कधीही विश्वास ठेवणार नाही. नुसत्या हुल्लडबाजीने समाज पुढे नेता येत नाही. हे आंदोलन पूर्ण यशस्वी झाल्याशिवाय थांबणार नाही. सरकारला जीआर काढण्यासाठी वेळ दिला असला तरी बैठकांच्या माध्यमातून आपले आंदोलन सुरूच राहील. बरेच तालुक्यातील मराठा आंदोलन माझी वाट पाहत होते परंतु यापुढे जामखेड श्रीगोंदासाठी व इतर तालुक्यासाठी बराचं वेळ देणार असल्याचे पाटील यांनी सांगितले.

### पुढे काय?

येत्या ९० दिवसांत सरकार दिलेल्या आश्वासनांची पूर्तता करते का, यावर मराठा आरक्षण आंदोलनाची पुढील दिशा ठरणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची अधिकृत भूमिका आणि व्हिडिओ संदेश याकडे आता संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे.

### जरांगेंनी उषोषण सोडल्याचा आनंद : मुख्यमंत्री



संभाजीनगर येथे मुख्यमंत्री देव्रेंद्र फडणवीस आले असता यांच्या दौऱ्या संदर्भात पत्रकारांनी विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देतांना म्हणाले की जरांगे उपोषण सोडल्यानं आनंद झाला . त्यांच्या १३ पैकी १२ मागण्या पूर्ण केल्या असून आरक्षणासंदर्भात प्रशासकीय अडचणी दुर करून मराठा समाजाला न्याय देण्याचे काम करणार . तसेच शिष्टमंडळाने खूप चांगल्या पद्धतीने चर्चा करून हे उपोषण थांबवले त्याबद्दल सर्व शिष्टमंडळाचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसने आभार व्यक्त केले. असून जरांगे पाटलांचेही अभार मानले.



## खंडणीखोरांचा धुमाकूळ
## ५० हजारांच्या खंडणीसाठी मारहाण

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

### चार जिल्हे पालथे, अखेर नेवाशात पकडला

गुन्हा दाखल होताच आरोपी फरार ■ सातारा, सांगली, पुणे, संभाजीनगरमध्ये शोध ■ ठिकाणे बदलत राहिल्याने पोलिसांची कसरत, शिंगवे तुकाईत सापळा ■ मुख्य आरोपी प्रतिक पाचपुते ताब्यात.

**श्रीगोंदा :** टाकळी लोणार-पिसोरे खांड रस्त्यावर वाहन अडवून ५० हजार रुपयांची खंडणी मागत काठी आणि लोखंडी टॉमीने मारहाण करून रोख रक्कम जबरीने लुटल्याच्या प्रकरणातील मुख्य आरोपी अखेर स्थानिक गुन्हे शाखेच्या हाती लागला. प्रतिक गोकुळ पाचपुते (वय २५, रा. काष्टी) असे ताब्यात घेतलेल्या आरोपीचे नाव आहे. तब्बल सातारा, सांगली, पुणे आणि छत्रपती संभाजीनगर या जिल्ह्यांत शोध घेतल्यानंतर पोलिसांनी नेवासा तालुक्यातील शिंगवे तुकाई परिसरात सापळा रचून त्याला वेड्या ठोकल्या.

याबाबत सविस्तर माहिती अशी की, ५ सप्टेंबर रोजी विजय भाऊसाहेब शेळके (वय ४१, रा. गुणवडी) हे श्रीगोंदा येथून घरी जात असताना टाकळी लोणार ते पिसोरे खांड रस्त्यावर प्रतिक पाचपुते व (पान ४ वर)

## कृषी आयुक्तालयाच्या रडारवर जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पुणे :** राज्याच्या कृषी विभागाचे सचिव परिमल सिंह यांच्या अध्यक्षतेखाली १६ सप्टेंबर रोजी झालेल्या आढावा बैठकीस अमरावती विभागीय कृषी सहसंचालकांच्या अधिनस्त सर्व जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी उपस्थित राहिले नसल्याचे समोर आले आहे. या पार्श्वभूमीवर असमाधानकारक कामकाज असलेल्या संबंधित जिल्हा अधीक्षक कृषी अधिकाऱ्यांवर प्रशासकीय कारवाई सुरू करण्याबाबतचे प्रस्ताव दोन दिवसांत सादर करण्याच्या सूचना कृषी आयुक्त सुरज मांढरे यांनी अमरावती विभागीय कृषी सहसंचालकांना दिल्या आहेत.

### शेतकऱ्यांशी संबंधित कामकाज बाधित होऊ नये :

सद्यःस्थितीत राज्यात एल-निनोच्या पार्श्वभूमीवर हवामानातील अनिश्चितता निर्माण झाली असून शेतकऱ्यांना विविध अडचणींचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे अधिकारी व कर्मचाऱ्यांनी शेतकऱ्यांना वेळेवर तांत्रिक मार्गदर्शन देणे, योजनांची प्रभावी अंमलबजावणी करणे, पीक परिस्थितीचे निरीक्षण व पाहणी करणे, पंचनामे आणि विविध अहवाल तयार करणे तसेच शासनाच्या निर्देशानुसार आवश्यक कार्यवाही करणे अपेक्षित आहे. शेतकऱ्यांच्या हिताला सर्वोच्च प्राधान्य देत सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी संघटनात्मक भूमिका आणि शासकीय कर्तव्य यामध्ये समन्वय राखावा. शेतकऱ्यांशी संबंधित कोणतेही कामकाज कोणत्याही परिस्थितीत बाधित होणार नाही, याची दक्षता घ्यावी, असेही कृषी आयुक्तांनी स्पष्ट केले आहे. त्यामुळे कृषीसेवा महासंघाच्या पुढील भूमिकेकडे आता लक्ष लागले आहे.

कृषी विभागाच्या मंजूर आकृतीबंधाला विरोध करत महाराष्ट्र राज्य कृषिसेवा महासंघाने गेल्या तीन आठवड्यांपासून आंदोलनाची भूमिका घेतली आहे. या पार्श्वभूमीवर कृषी सचिवांच्या आढावा बैठकीस अमरावती विभागातील जिल्हा अधीक्षक कृषी अधिकाऱ्यांची अनुपस्थिती गंभीरपणे घेण्यात आली आहे. त्यामुळे कृषी विभागातील कामकाज अद्याप पूर्णपणे सुरळीत झाले नसल्याचे या प्रकारातून स्पष्ट झाले आहे.दरम्यान, कृषी आयुक्त सुरज मांढरे यांनी पुणे विभागीय कृषी सहसंचालक बाबासाहेब जेजुरकर यांनाही १६ सप्टेंबर रोजी पत्र दिले आहे. कृषी विभागाचा आकृतीबंध रद्द करण्याची घोषणा कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी प्रशासनाशी चर्चा करून केली असून, त्यानुसार शासनस्तरावर पुढील कार्यवाही सुरू असल्याचे (पान ४ वर)

### सोनपावलांनी गौराईचे आगमन...



**श्रीरामपूर : गणेशोत्सवाच्या मंगलमय वातावरणात आज घरोघरी गौराईंचे उत्साहात आगमन झाले. महिलांनी पारंपरिक पद्धतीने गौराईंचे स्वागत करून पूजा-अर्चा केली. फुलांची आकर्षक सजावट, रांगोळ्या आणि मंगलगीतांनी घराघरांत भक्तिमय वातावरण निर्माण झाले. गौराईच्या आगमनाने सुख, समृद्धी आणि सौभाग्य नांदावे, अशी प्रार्थना करण्यात आली.**

**गौराई आली अंगणी, दरवळला आनंदाचा सुगंध, फुलांनी सजली ओसरी, मनामनांत भक्तीचा रंग।**
**सुख-समृद्धी घेऊन ये, अशी मनी आस दाटली, गौराईच्या आगमनाने घराघरांत मंगलमय पहाट झाली!**

**अशा भक्तिमय वातावरणात सौ पुनम नवले यांच्या घरी गौराईंची स्थापना करण्यात आली.**

(छायाचित्र : वेदश्री नवले)

## उक्कलगावात तरुणाचा खून दोघे पोलिसांच्या ताब्यात

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**उक्कलगाव :** श्रीरामपूर तालुक्यातील उक्कलगाव येथे एका २७ वर्षीय तरुणाचा संशयास्पद खून केलीची घटना घडली. याप्रकरणी पोलीसांनी दोघांना ताब्यात आहे. आशिष उर्फ लाल्या विजय पारखे (वय २७, रा. उक्कलगाव, ता.श्रीरामपूर) असे मयत तरुणाचे नाव आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, आशिष पारखे हे माजी ग्राम पंचायत सदस्य विजय रत्नाकर पारखे यांचे धाकटे चिरंजीव आहेत. आशिष यांची सासुरवाडी कोपरगाव येथे असून, ते गेल्या दोन महिन्यांपासून सासुरवाडीकडे राहत होते.

मात्र, कालरात्रीच्या सुमारास आशिषचा याचा मृतदेह पडवीत रक्ताच्या थारोळ्यात आढळून आला.मयत आशिषच्या मानेवर जबरी धारदार शस्त्राने वार करण्यात आले होते. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेत दोघांना चौकशीसाठी ताब्यात घेतले. त्यांची सखोल चौकशी सुरू असून, मयताचे वडील विजय पारखे यांनी मात्र, आशिषच्या 'जवळच्या' (पान ४ वर)

# पारनेर कारखाना विक्री प्रकरणात चोरडिया बंधूंची चौकशी!

## नऊ आरोपींच्या खात्यांवर २३ कोटी पाठवल्याचा आरोप

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**निघोज :** देवीभोयरे येथील पारनेर सहकारी साखर कारखाना विक्रीतील कथित गैरव्यवहार प्रकरणाच्या तपासाला पुन्हा वेग आला असून पुण्याचे उद्योजक अतुल चोरडिया व अशोक चोरडिया या बंधूंची पारनेर पोलिसांकडून चौकशी होणार आहे. या प्रकरणातील ९ आरोपींच्या बँक खात्यांवर सुमारे २३ कोटी रुपये पाठवल्याचा आरोप आहे. याच अनुषंगाने तपासासाठी पारनेर पोलिसांनी चोरडिया बंधूंना पोलीस ठाण्यात उपस्थित राहण्याच्या नोटिसा बजावल्याची माहिती आहे.

पारनेर पोलीस ठाण्याचे पो. नि. तथा तपासी अधिकारी सोमनाथ दिवटे यांच्या मार्गदर्शनाखाली ही चौकशी होणार आहे. जून महिन्यात या गुन्ह्याचा तपास न्यायालयाच्या निगराणीखाली करण्याचे आदेश झाल्यानंतर काही काळ तपास संथ झाला होता. आता संबंधित आर्थिक व्यवहारांची चौकशी करण्याच्या दृष्टीने पोलिसांनी हालचाली सुरू केल्या आहेत. न्यायालयीन आदेशानंतर तपास पुन्हा सुरू झाल्याचे वृत्त यापूर्वीही प्रसिद्ध झाले आहे.



कारखाना बचाव समितीच्या म्हणण्यानुसार, पारनेर कारखाना लिलावात खरेदी करण्यासाठी चोरडिया बंधूंनी पुण्याचे मा. खा. विदुरा नवले यांच्या कुटुंबातील सदस्य असलेल्या ९ आरोपींच्या खात्यांवर सुमारे २३ कोटी रुपये पाठवले. संबंधित रक्कम क्रांती शुगर कंपनीत गुंतवण्याऐवजी महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेला पाठवण्यात आल्याचा समितीचा आरोप आहे. या व्यवहाराच्या माध्यमातून क्रांती शुगर कंपनीसाठी कारखान्याची मालमत्ता खरेदी करण्यात आल्याचा दावा करण्यात आला आहे.या आर्थिक व्यवहारांवर आक्षेप घेत कारखाना बचाव समितीने तपासाची मागणी केली आहे. चोरडिया बंधूंनी दिलेली रक्कम करचुकवेगिरीतून मिळवलेला 'काळा पैसा' असल्याचा आरोप समितीने केला आहे. संबंधित रकमेच्या माध्यमातून मालमत्ता खरेदी दाखवून त्याच मालमत्तेवर सुमारे ३४० कोटी रुपयांचे कर्ज उभारण्यात आल्याचा दावाही समितीने केला आहे.या सर्व आर्थिक व्यवहारांची सखोल चौकशी करून निधीचा स्रोत, संबंधित बँक व्यवहार आणि कारखाना खरेदीतील आर्थिक साखळी तपासावी, अशी मागणी कारखाना बचाव समितीने केली आहे. समितीचे वकील ॲड. रामदास घावटे यांनी याबाबत पो. नि. सोमनाथ दिवटे यांच्याकडे निवेदन दिल्याचे सांगितले.

# सुतावरून स्वर्ग गाठण्यापूर्वी...

**विखे पाटील 'व्हिलन' आणि फडणवीस 'खेळाडू'? राजकीय चर्चे पेक्षा वास्तवाचा मागोवा महत्त्वाचा**

--------------

विशेष संपादकीय
करण नवले (संपादक)

मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मनोज जरांगे पाटील यांनी सुरू केलेले २० दिवसांचे उपोषण अखेर १७ सप्टेंबर रोजी स्थगित झाले. बीड जिल्ह्यातील पाटोदा येथे राज्य सरकारच्या शिष्टमंडळाशी झालेल्या चर्चेनंतर जरांगे पाटील यांनी सरकारला ९० दिवसांची मुदत दिली. हैदराबाद गॅझेटियर, विविध संस्थानांच्या गॅझेटचा अभ्यास, कुणबी नोंदी आणि प्रमाणपत्रांशी संबंधित मुद्द्यांवर सरकारकडून आश्वासने देण्यात आली. मात्र उपोषण स्थगित झाले असले तरी आंदोलन संपलेले नाही, अशी भूमिका जरांगे पाटील यांनी स्पष्ट केली आहे.

या संपूर्ण घडामोडीत एक नाव सातत्याने चर्चेत राहिले ते म्हणजे राज्याचे जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील. मराठा समाजाच्या प्रश्नासाठी गठित मंत्रिमंडळ उपसमितीचे अध्यक्ष म्हणून त्यांच्यावर सरकारची बाजू मांडण्याची आणि आंदोलकांशी संवाद साधण्याची जबाबदारी आहे. या पार्श्वभूमीवर विखे पाटील हेच मराठा आंदोलनाचे 'व्हिलन' बनवले गेले आणि त्यामागे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची राजकीय खेळी आहे, असा तर्क काही ठिकाणी मांडला जात आहे. प्रश्न असा आहे की, या तर्काला आधार देणारे ठोस पुरावे आहेत का?

राजकारणात संशयाला जागा असते; पण संशय आणि निष्कर्ष यांच्यात मोठे अंतर असते. सुतावरून स्वर्गाला जाणे हा राजकारणात नवीन प्रकार नाही. एखाद्या नेत्यावर टीका झाली, त्याच्यावर एखाद्या समाजाचा रोष वाढला किंवा त्याच्या राजकीय वाटचालीत एखादा अडथळा निर्माण झाला, की त्यामागे दुसऱ्या नेत्याची 'खेळी' शोधणे सोपे असते. परंतु त्या खेळीचे पुरावे वेगळे आणि राजकीय अंदाज वेगळे.

राधाकृष्ण विखे पाटील यांची मराठा समाजाच्या प्रश्नावरील उपसमितीच्या अध्यक्षपदी नियुक्ती २०२५ मध्ये झाली. त्याआधी चंद्रकांत पाटील या समितीचे अध्यक्ष होते. म्हणजेच विखे पाटील यांच्याकडे ही जबाबदारी सरकारने अधिकृतपणे सोपवली आहे.

मग प्रश्न उलटाही विचारायला हवा. फडणवीसांना विखे पाटील राजकीयदृष्ट्या अडचणीचे वाटत असतील, तर एवढ्या संवेदनशील विषयाची जबाबदारी त्यांच्याकडे का सोपवावी? मराठा आरक्षणासारखा विषय हाताळताना प्रत्येक शब्दाचे राजकीय, सामाजिक आणि कायदेशीर परिणाम होऊ शकतात. अशा वेळी सरकारने अनुभवी नेत्याला पुढे केले, याचा सरळ अर्थ सरकारने त्यांच्यावर जबाबदारी टाकली असा होतो. त्यातून 'राजकीय कट' सिद्ध होत नाही.

गेल्या काही वर्षांचा घटनाक्रम पाहिला तर मराठा आरक्षण आंदोलन हाताळण्यासाठी सरकारने वेगवेगळ्या टप्प्यांवर वेगवेगळ्या नेत्यांना पुढे केले आहे. २०२३ मध्ये मनोज जरांगे यांच्या उपोषणानंतर तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी अंतरवाली सराटीत जाऊन त्यांची भेट घेतली होती आणि जरांगे यांनी शिंदे यांच्या हस्ते ज्यूस घेत उपोषण सोडले होते. पुढे सरकारने विविध समित्या आणि प्रशासकीय यंत्रणांच्या माध्यमातून हा प्रश्न हाताळण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे आज विखे पाटील मध्यस्थी करत आहेत म्हणून त्यामागे एखाद्या व्यक्तीला राजकीयदृष्ट्या संपवण्याचा डाव आहे, असा निष्कर्ष काढणे घाईचे ठरेल.

विशेष म्हणजे सध्याच्या आंदोलनाच्या शेवटच्या टप्प्यात विखे पाटील स्वतः पाटोदा येथे गेले आणि सरकारच्या शिष्टमंडळासह जरांगे यांच्याशी चर्चा केली. त्यानंतर ९० दिवसांची मुदत देत उपोषण स्थगित करण्याचा निर्णय झाला. ही बाब राजकीय समीकरणांच्या चर्चे पेक्षा अधिक महत्त्वाची आहे. कारण ज्यांच्यावर काही दिवसांपूर्वी तीव्र टीका होत होती, त्याच नेत्याला सरकारने चर्चेसाठी पुढे केले आणि त्यांनी प्रत्यक्ष आंदोलनस्थळी जाऊन संवाद साधला.

जरांगे पाटील यांच्या भाषेवरूनही मोठी चर्चा झाली. आंदोलनकर्त्याला सरकारवर, मंत्र्यांवर आणि मुख्यमंत्र्यांवर टीका करण्याचा लोकशाही अधिकार आहे. मात्र घटनात्मक पदांवरील व्यक्तींविषयीची भाषा संयमित असावी, ही अपेक्षा तितकीच स्वाभाविक आहे. स्वतः जरांगे यांनी आजच्या चर्चेनंतर फडणवीस आणि शिंदे हे आपले वैरी नसल्याचे स्पष्ट केले आहे. त्यामुळे आंदोलनातील तीव्र राजकीय वक्तव्ये आणि प्रत्यक्ष वाटाघाटी यांच्यात फरक ठेवणे आवश्यक आहे.

विखे पाटील यांच्याविरोधातील टीकेचा आणखी एक पैलू म्हणजे त्यांचे राजकीय वजन. ते अनुभवी नेते आहेत, अनेक वर्षे विधानसभा राजकारणात आहेत आणि विविध खात्यांचा अनुभव त्यांच्या पाठीशी आहे. त्यामुळे भविष्यातील सत्तासमीकरणांमध्ये त्यांची भूमिका काय असेल, याबाबत चर्चा होणे स्वाभाविक आहे. पण 'संभाव्य मुख्यमंत्रीपदाचा दावेदार' म्हणून कोणाचे नाव चर्चेत असणे आणि त्या व्यक्तीला संपवण्यासाठी सत्तेतील दुसऱ्या नेत्याने कट रचणे, या दोन गोष्टी एकच नाहीत.

महाराष्ट्राच्या राजकारणात भूतकाळातील अनेक नेत्यांच्या राजकीय चढ-उतारांची उदाहरणे देता येतील. पण प्रत्येक घटनेचे श्रेय किंवा अपश्रेय आजच्या एखाद्या नेत्याला देणे इतिहासाचा अति-सुलभीकरण करणारे ठरते. राजकारणात स्पर्धा असते, मतभेद असतात, सत्तासमीकरणे बदलतात; परंतु प्रत्येक घडामोडीमागे एका व्यक्तीचा मास्टरप्लॅन शोधणे हे विश्लेषणापेक्षा आख्यायिका अधिक ठरू शकते.

फडणवीस आणि विखे पाटील यांच्यात मतभेद नाहीत, असे ठामपणे म्हणण्याइतकेही सार्वजनिक पुरावे आपल्याकडे नाहीत आणि फडणवीस विखे पाटलांना राजकीयदृष्ट्या संपवत आहेत, असे म्हणण्याइतकेही पुरावे नाहीत. त्यामुळे सध्या उपलब्ध घटनांवरून निष्कर्ष काढण्याऐवजी प्रश्न खुला ठेवणेच योग्य.

राजकारणात प्रत्येक नेता आपले वजन वाढवण्याचा प्रयत्न करतो. विखे पाटीलही त्याला अपवाद नसतील आणि फडणवीसही नाहीत. उद्या दोघांमध्ये राजकीय शह-काटशह झाले, तरी ते राजकारणाचा भाग असेल. मात्र त्याचा संबंध मराठा आरक्षणाच्या आंदोलनाशी जोडायचा असेल तर त्यासाठी घटनांची स्पष्ट सांगड आणि पुरावे आवश्यक आहेत.

आजच्या घडीला मात्र एक गोष्ट स्पष्ट आहे, जरांगे पाटील यांचे उपोषण स्थगित झाले आहे; प्रश्न संपलेला नाही. सरकारला ९० दिवसांची मुदत मिळाली आहे आणि त्या काळात आश्वासनांची अंमलबजावणी कितपत होते, हेच पुढील राजकीय आणि सामाजिक समीकरण ठरवेल.

म्हणूनच विखे पाटील 'व्हिलन' आहेत की फडणवीसांनी त्यांना 'व्हिलन' बनवले, या चर्चेपेक्षा सरकारने दिलेली आश्वासने प्रत्यक्षात उतरतात का, मराठा समाजाच्या मागण्यांना कायदेशीर चौकटीत किती न्याय मिळतो आणि पुढील ९० दिवसांत सरकार काय पावले उचलते, हा खरा प्रश्न आहे.

कारण राजकारणाच्या सारीपाटावर मोहरे बदलत राहतात; पण आरक्षणाचा प्रश्न हा कोणत्याही एका नेत्याच्या राजकीय कारकीर्दीपेक्षा मोठा आहे. त्याचे उत्तर राजकीय आख्यायिकेत नव्हे, तर कायदा, संविधान, प्रशासन आणि प्रत्यक्ष निर्णयांच्या कसोटीवरच शोधावे लागेल.

# कोल्हार करांनी अनुभवला ऊन पावसाचा खेळ

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**



**कोल्हार** : येथे गुरुवारी दुपारी सव्वातीन च्या सुमारास मध्यम स्वरूपाच्या पावसाने १५ ते २० मिनिटे हजेरी लावली या पावसामुळे सखल भागात पाणीच पाणी झाले होते. पाऊस पडतानाच सूर्यनारायण अधून मधून काळा ढगांमधून डोकवत असल्याने उन्हाचे चटके व कोसळणाऱ्या पाऊस धारा असा ऊन पावसाचा संमिश्र खेळ खेळाचा अनुभव काल कोल्हारकरांनी काही वेळ अनुभवाला.

गेली दोन ते तीन दिवसापासून चटके देणारे ऊन उष्णतेमुळे नागरिक हैराण झाले होते. आकाशात रोज काळे ढगांची गर्दी होत होती परंतु सायंकाळी वातावरण पुन्हा निरभ्र होत असे परंतु गुरुवारी सकाळपासूनच वातावरणात उष्मा वाढलेला होता व आकाशात काळे ढगांची गर्दी दाटली होती.

आज पाऊस बरसणार असा सूरही नागरिकांमध्ये होता आणि सव्वा तीनच्या दरम्यान पावसाला सुरुवात झाली तब्बल १५ ते २० मिनिटं मध्यम स्वरूपाचा हा पाऊस बरसला पाऊस सुरू असतानाच कडक ऊनही पडत होते. गणपती बाप्पा नंतर आज गौरीच्या आगमनाला पावसाने हजेरी लावल्यामुळे वातावरण अल्हाददायक बनले.

धरण क्षेत्रामध्ये चांगला पाऊस होऊन धरणे तुडुंब भरले असले तरी लाभ क्षेत्रामध्ये मात्र अद्यापही पावसाची गरज आहे. पावसाचे वातावरण रोजच तयार होते आहे त्यामुळे शेतकरी वर्ग ढगाकडे डोळे लावून बसला आहे निश्चितच गणपती बाप्पा शेतकरी वर्गाची प्रार्थना ऐकून परिसर हिरवा गार करेल व पिकांना नवस संजीवनी देईल अशी अपेक्षा शेतकरी वर्ग व्यक्त करीत आहे.

# निलंबन आदेश कर्मचाऱ्याच्या तोंडावर फेकला

## गटशिक्षणाधिकारी कार्यालयात निलंबित मुख्याध्यापिकेचा थयथयाट ; आदेश स्वीकारण्यास स्पष्ट नकार

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी** : निलंबनाचा आदेश हातात पडताच तो स्वीकारण्याऐवजी संबंधित कर्मचाऱ्याच्या तोंडावरच फेकून देत आदेश स्वीकारत नसल्याचे सांगण्याचा प्रकार देसवंडी येथील शिरसाटवस्ती जिल्हा परिषद शाळेच्या निलंबित मुख्याध्यापिका सुलताना जावेद शेख-इनामदार यांनी केल्याची माहिती समोर आली आहेराहुरी गटशिक्षणाधिकारी कार्यालयात कर्मचारी महेश भापकर यांच्या समक्ष शेख-इनामदार यांनी मोठा थयथयाट केल्याची चर्चा असून, या प्रकाराची प्रशासनाने गंभीर नोंद घेतली आहे.मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी यांच्या आदेशानुसार सुलताना शेख-इनामदार यांच्यावर निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे. या आदेशाची प्रत बजावण्यासाठी कर्मचारी महेश भापकर गटशिक्षणाधिकारी कार्यालयात गेले होते. भापकर यांनी निलंबन आदेश स्वीकारण्यास सांगितल्यानंतर शेख-इनामदार यांनी प्रथम आदेश वाचून घेण्याची भूमिका घेतली. आदेश वाचल्यानंतर आपले निलंबन झाल्याचे समजताच त्यांनी आदेश स्वीकारण्यास नकार दिला.इतकेच नव्हे तर निलंबनाचा आदेश भापकर यांच्या अंगावर फेकून देत तो स्वीकारत नसल्याचे सांगितल्याचा आरोप आहे. प्रशासनाकडून बजावण्यात आलेल्या आदेशाची प्रत स्वीकारण्याऐवजी संबंधित कर्मचाऱ्याशीच अशा पद्धतीने वर्तन केल्याने गटशिक्षणाधिकारी कार्यालयातील या प्रकाराची चर्चा सुरू झाली आहे.या घटनेची गटशिक्षणाधिकाऱ्यांनी नोंद घेतली असून, निलंबन आदेशाची नोंद शेख-इनामदार यांच्या सर्व्हिस बुकमध्ये करण्यात आली आहे. आदेश स्वीकारण्यास नकार दिल्याच्या प्रकाराबाबत पंचनामा करण्यात आल्याची माहितीही समोर आली आहे.दरम्यान, शेख-इनामदार यांच्या कार्यपद्धतीविरोधात पालक व ग्रामस्थांकडून यापूर्वी तक्रारी करण्यात आल्या होत्या. या तक्रारींच्या पार्श्वभूमीवर प्रशासनाने निलंबनाची कारवाई केली असतानाच, निलंबन आदेश बजावण्याच्या प्रक्रियेतच कर्मचाऱ्याच्या अंगावर आदेश फेकल्याचा प्रकार घडल्याने या प्रकरणाला नवे वळण मिळाले आहे.

# आठ दिवसापूर्वी प्राजक्तदादांना दिलेला शब्द आश्रम शाळेतील मुलांनी पाळला

**राजेंद्र परदेशी | राष्ट्र सह्याद्री**



**राहुरी** :शहरातील श्री संत गाडगे महाराज आश्रम शाळेतील विद्यार्थ्यांना काही दिवसापूर्वी पाढे पाठ करण्याचे मुलांना आमदार प्राजक्त यांनी सांगितले होते. काल रात्री उशिरा आमदार प्राजक्त तनपुरे यांनी आश्रम शाळेतील या चिमुकल्या विद्यार्थ्यांची भेट घेतली.

आमदार तनपुरे यांनी शाळेत प्रवेश करताच त्या छोट्या चिमुकल्या विद्यार्थ्यांनी मोठ्या आत्मविश्वासाने आमदार तनपुरे यांना धडाधड पाढे म्हणून दाखविले. त्या चिमुकल्यांच्या चेहऱ्यावरील आनंद व डोळ्यातील चमक पाहून आमदार प्राजक्त तनपुरे यांचे मन गहिवरून आले.

या चिमुकल्या विद्यार्थ्यांनी दिलेला शब्द लक्षात ठेवला. व आठ दिवसापूर्वी दादांना दिलेला शब्द पूर्ण करून दाखविला या छोट्याशा यशाचा आनंद आणखी मोठा व्हावा म्हणून आमदार प्राजक्त तनपुरे यांनी सर्व विद्यार्थ्यांना चप्पल भेट दिली. या निरागस चेहऱ्यांवरच उद्याचा समाज घडण्याची आशा बळावली आहे. या निमित्ताने माजी मंत्री व भारतीय जनता पक्षाचे विधान परिषदेचे आमदार प्राजक्त तनपुरे यांनी एक अनोख्या शैलीचे दर्शन समाजाला घडविले आहे. या निमित्ताने आमदार प्राजक्त तनपुरे यांनी आपल्या दैनंदिन कार्यामध्ये काही ना काही तरी वेगळी व अनोखी सामाजिक बांधिलकी बांधण्याची शैली दिसून येत आहे. आणि समाजातील असलेल्या सर्व प्रकारच्या घडामोडी कडे व सामान्य जनतेकडे किती बारकाईने लक्ष आमदार प्राजक्त तनपुरे देत असल्याचे दिसून येत आहे.या निरागस चिमुकल्या विद्यार्थ्यांचा व आमदार प्राजक्त तनपुरे यांचा संवाद हा पुन्हा एकदा राजकीय व सामाजिक क्षेत्रात अहिल्यानगर जिल्ह्यात मोठ्या कौतुकाने चर्चिला जात आहे.

# पंकज ललवाणी यांच्या ५१ दिवसांच्या तपश्चर्येची पूर्णाहुती

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**



**श्रीरामपूर** : येथील छत्रपती शिवाजी महाराज रोडवरील जैन स्थानकात चातुर्मासानिमित्त आलेल्या श्रमण संघाच्या उपप्रवर्तिनी साध्वी चंदनबाला व जिनशासन प्रभाविका पद्मावती महासतीजी तसेच त्यांच्या सुशिष्यांच्या प्रेरणेने व आशीर्वादाने धार्मिक व सामाजिक कार्यकर्ते पंकज धनराज ललवाणी यांनी केलेल्या ५१ दिवसांच्या निरंकार उपवासाच्या तपश्चर्ये ची पूर्णाहुती गुरुवारी (दि. १७) सकाळी साडेनऊ वाजता धार्मिक वातावरणात झाली.

साध्वीजींच्या मंत्रोच्चार व मंगलपाठाने पूर्णाहुती सोहळा संपन्न झाला. पंकज ललवाणी हे श्रीरामपूरमधील प्रमुख व्यापारी व सामाजिक कार्यकर्ते स्व. कचरदास ललवाणी व मदनबाई कचरदास ललवाणी यांचे नातू, तर स्व. धनराज ललवाणी यांचे सुपुत्र आहेत.

पर्युषण पर्वाच्या शेवटच्या दिवशी अन्य तपस्वींचाही तपपूर्ती सोहळा उत्साहात झाला. यामध्ये रंजना सुनील चोरडिया यांनी ११ उपवास, भावना अभय कटारिया यांनी ११ उपवास, मंजुश्री सुवालाल कोठारी यांनी ९ उपवास, प्रियंका राहुल कटारिया यांनी ८ उपवास, लौकिक नितीन गदिया यांनी ८ उपवास, प्रित सारिका कुमट यांनी ५ उपवास आणि पलक वैभव लुंकड यांनी ५ उपवास पूर्ण केले. तपमूर्ती पंकज ललवाणी यांचा स्थानकवासी जैन संघ, नवकार प्रतिष्ठान, दीक्षा व चातुर्मास समिती तसेच सकल जैन समाज बेलापूर श्रावक संघाच्या वतीने मानपत्र व शाल देऊन सन्मान करण्यात आला. पू. चंदनबाला व पू. पद्मावती महासतीजी यांच्या प्रवचनानंतर महामांगलिकने तपपूर्ती सोहळ्याचा समारोप झाला. ललवाणी परिवाराच्या वतीने उपस्थितांसाठी गौतम प्रसादी भोजचे आयोजन करण्यात आले होते. सोहळ्यास सकल जैन समाजातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# महावीर पिपाडा यांची संघपतीपदी निवड

## जैन श्रावक संघातर्फे सत्कार

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**शिर्डी** : राहाता जैन श्रावक संघ तसेच जैन ओसवाल पंच ट्रस्टच्या संघपती व अध्यक्षपदी महावीरजी मदनलालजी पिपाडा यांची निवड झाल्याबद्दल जैन श्रावक संघ व ओसवाल पंच ट्रस्टच्या वतीने त्यांचा सत्कार करून अभिनंदन करण्यात आले.

यावेळी जैन श्रावक संघाचे सचिव प्रवीण बागरेचा यांनी महावीर पिपाडा यांचा शांत, संयमी, स्मितभाषी व धार्मिक स्वभाव सर्वपरिचित असल्याचे सांगितले. समाजातील सर्व घटकांना सोबत घेऊन धार्मिक परंपरा, सामाजिक एकोपा आणि संघटनात्मक कार्य अधिक बळकट करण्यासाठी त्यांचे नेतृत्व मार्गदर्शक ठरेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. धार्मिक संस्कार पुढील पिढीपर्यंत पोहोचविणे, प्रवचन-स्वाध्यायाला प्रोत्साहन देणे, साधू-साध्वींच्या चातुर्मासाचे नियोजन तसेच सेवाभावी उपक्रमांना त्यांच्या नेतृत्वातून नवी दिशा मिळेल, असेही ते म्हणाले. यावेळी मावळते संघपती अनिल पिपाडा यांचाही विशेष सत्कार करण्यात आला. भाजपा नेते डॉ. राजेंद्र पिपाडा यांनी महावीर पिपाडा यांच्या शांत व संयमी नेतृत्वामुळे जैन समाजाच्या धर्मकार्यास नवी दिशा मिळेल, असे सांगितले. तसेच अनिल पिपाडा यांनी मागील कार्यकाळात तीन यशस्वी चातुर्मासांचे आयोजन करून समाजात धर्मभावना वृद्धिंगत करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य केल्याचे नमूद केले. या प्रसंगी नगराध्यक्षा ममता पिपाडा, उपाध्यक्ष नेमीचंद लोढा, सुरेंद्र सांड, विजय मुथा, मदनलाल पिपाडा, कमलनयन टाकी, सुवालाल मुनावत, प्रवीण जैन, तुषार मुथा, स्वप्नील लोढा, ललित पिपाडा यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. उपस्थितांनी महावीर पिपाडा यांचे अभिनंदन करून पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या.

# टंचाई आढावा बैठकीला गैरहजर अधिकाऱ्यांची खरडपट्टी

## तातडीने कारणे दाखवा नोटीस बजावण्याचे आ. अमोल खताळ यांचे निर्देश

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**संगमनेर** : तालुक्यात टंचाईची परिस्थिती गंभीर असताना लोकप्रतिनिधीच्या अध्यक्षतेखाली आयोजित टंचाई आढावा बैठकीला काही विभागांचे अधिकारी व कर्मचारी गैरहजर राहिल्याने आमदार अमोल खताळ यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. गैरहजर राहिलेल्या सर्व संबंधित अधिकारी-कर्मचाऱ्यांना तातडीने कारणे दाखवा नोटीस बजावावी, असे सक्त निर्देश त्यांनी प्रशासनाला दिले.

नवीन नगर रोडवरील यशवंतराव चव्हाण प्रशासकीय भवनात गुरुवारी (दि. १७) आमदार खताळ यांच्या उपस्थितीत बैठक झाली. उपविभागीय अधिकारी अरुण उंडे, तहसीलदार धीरज मांजरे, गटविकास अधिकारी प्रवीण सिनारे, महावितरणचे प्रभारी कार्यकारी अभियंता नारायण सोनवणे, उपविभागीय कृषी अधिकारी अक्षय गोसावी, तालुका कृषी अधिकारी रेजा बोडके आदी उपस्थित होते. बैठकीत तालुक्यातील टंचाईस्थिती व विविध विभागांच्या कामकाजाचा आढावा घेण्यात आला.

बैठकीला गैरहजर अधिकाऱ्यांवर नाराजी व्यक्त करताना खताळ म्हणाले, ''तालुक्याचा लोकप्रतिनिधी टंचाईसारख्या गंभीर विषयावर बैठक घेत असताना अधिकारी उपस्थित राहत नसतील, तर ही बाब गंभीर आहे. टंचाई आढावा बैठक गंमत करण्याचा विषय वाटला का?'' टंचाईच्या काळात विभागांनी जबाबदारी एकमेकांवर न ढकलता समन्वयाने काम करावे. ज्या गावांमध्ये वाड्या-वस्त्यांवर टँकरची गरज आहे, तेथे तातडीने टँकर सुरू करावेत, अशा सूचना त्यांनी दिल्या.




केवळ कार्यालयात बसून टंचाईचे नियोजन होणार नाही. ग्रामसेवक, तलाठी व कृषी विभागाच्या कर्मचाऱ्यांनी आपल्या कार्यक्षेत्रातील गावांना प्रत्यक्ष भेट देऊन पाणी, चारा व अन्य गरजांची माहिती प्रशासनाला द्यावी, असेही त्यांनी सांगितले. टंचाईच्या काळात पशुधनासाठी पाणी व चाऱ्याचा प्रश्न गंभीर असताना पशुसंवर्धन विभागाचा एकही कर्मचारी बैठकीला उपस्थित नसल्याबद्दलही त्यांनी नाराजी व्यक्त केली. पशुवैद्यकीय डॉक्टरांकडून दूध उत्पादकांकडून पैसे घेतल्याच्या तक्रारी बैठकीत करण्यात आल्या. सावरगाव तळे येथे आजारामुळे तीन गायींचा मृत्यू झाल्यानंतरही पशुवैद्यकीय डॉक्टर घटनास्थळी आले नसल्याची तक्रार करण्यात आली. या तक्रारींची दखल घेत पशुधनासाठी पाणी, चारा व पशुवैद्यकीय सेवा वेळेवर उपलब्ध करून देण्याचे निर्देश खताळ यांनी दिले.

# विद्यार्थ्यांची स्पर्धा कृत्रिम बुद्धिमत्तेशी

## त्यात सरस ठरल्यास यश निश्चित : गणेश कुंभकर्ण

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**लोणी** : विद्यार्थ्यांची खरी स्पर्धा आता केवळ एकमेकांशी नसून कृत्रिम बुद्धिमत्तेशी (अख) आहे. या स्पर्धेत स्वतःला अद्ययावत ठेवून सरस ठरल्यास विद्यार्थ्यांना भविष्यात घवघवीत यश मिळवता येईल, असे प्रतिपादन नेटवर्क अभियंता गणेश कुंभकर्ण यांनी केले.

प्रवरा ग्रामीण अभियांत्रिकी महाविद्यालय, लोणी येथील इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरिंग विभागाच्या वतीने अभियंता दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात प्रमुख वक्ते म्हणून ते बोलत होते. यावेळी प्रवरा ग्रामीण अभियांत्रिकी महाविद्यालय, लोणी येथील इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरिंग विभागाचे विभागप्रमुख डॉ. पंकज चित्ते यांनी सांगितले की मुलांच्या प्लेसमेंटसाठी मदत व्हावी या उद्देशाने विभागातील सर्व प्राध्यापकानी मॉक इंटरव्ह्यू, प्री प्लेसमेंट टॉक्स, एक्सपर्ट लेक्चर्स, तज्ञांचे कंपन्यांमध्ये लागणारे प्रॅक्टिकल वर्कशॉप्स यांची सिरीज विभागाच्या माध्यमातून आयोजित केली आहे.




प्रवरा ग्रामीण अभियांत्रिकी महाविद्यालयातील इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन विभागाच्या वतीने आयोजित अभियंता दिन कार्यक्रमानिमित्त अभियंता गणेश प्रमोद कुंभकर्ण यांचा सत्कार करताना प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी सुष्मिता विखे पाटील.( **छाया- सौरभ शिंदे** )

यावेळी गणेश कुंभकर्ण यांनी विद्यार्थ्यांना नेटवर्क अभियंता म्हणून उपलब्ध असलेल्या विविध संधी, कामाचे स्वरूप, जगभरातील नेटवर्किंग कंपन्यांमध्ये असणाऱ्या रोजगाराच्या संधी तसेच नेटवर्क अभियंता होण्यासाठी आवश्यक असलेली विविध प्रमाणपत्रे (उशऔंळषळलरींळेपी) याबाबत मार्गदर्शन केले. तसेच नोकरी मिळविण्यासाठी आवश्यक तयारी, कौशल्यविकास आणि प्रभावी रिझ्युमे (ठशीीाश) तयार करण्याच्या पद्धती याबाबतही त्यांनी विद्यार्थ्यांना सविस्तर माहिती दिली.

कार्यक्रमाच्या निमित्ताने प्रवरा शिक्षण संस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुष्मिता विखे पाटील यांच्या हस्ते गणेश कुंभकर्ण यांचा सत्कार करण्यात आला.यावेळी प्राचार्य गुल्हाने, प्रा. वराडे आदि उपस्थित होते.

यावेळी इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन विभागाचे विभागप्रमुख डॉ. पंकज चित्ते, वरिष्ठ प्राध्यापक डॉ. सतीश तुरकणे,प्रा. सोमनाथ लव्हाटे यांच्यासह महाविद्यालयातील शिक्षकवृंद आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक काकासाहेब बाबासाहेब नवले** यांनी त्यांच्या साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड करिता, प्लॉट नं. २० ए, इंदिरानगर, शिरसगाव, श्रीरामपुर, जि. अहिल्यानगर (महाराष्ट्र) ४१३ ७०९ इंडिया येथे छापून साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड, दै. राष्ट्र सह्याद्री कार्यालय, मिनी स्टेडियम कॉम्प्लेक्स, पहिला मजला, नवीन कोर्टाशेजारी, श्रीरामपूर, जि.अहिल्यानगर, पिन नं. ४१३७०९, जिल्हा कार्यालय -कोहिनूर प्लाझा, दूसरा मजला, पत्रकार चौक, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर, महाराष्ट्र, इंडिया येथे प्रकाशित केले, संपादक : करण बाबासाहेब नवले RNI No. MAHMAR/2019/82605 www.rashtrasahyadri.com
owner "publisher & Printer **Kakasaheb Babasaheb Nawale** To be Printed At Saved Prakashan Private Limited 2d, plot n. 20 A, Indiranagar, Shirasgaon, Shrirampur, Dist. Ahilyanagar, 413709 (Maharashtra) India & published At Saived Prakashan Private Limited Daily Rashtra Sahyadri Office, Mini Stedium Complex, First Floor. Near New Court, Shrirampur. Dist. Ahilyanagar, Maharashtra 413 709, India Editor: **Karan Babasaheb Nawale**" RNI No MAHMAR/2014/82605 www.rashtrasahyadri.com, EmalID- rashtrasahyadri@gmail.com. Mo. 7774001818 (पोस्टल परवाना No:G-2/Rashtra Shyadri / RNP/2025-26 )

## द • ख • ल

### कुकरेजा यांचे स्विमींगमध्ये यश



**श्रीरामपूर** : येथील व अहिल्यानगर जिल्ह्यातील जलतरणपटू मोहनलाल आरतमल कुकरेजा यांनी बहादुरगड (नागपूर) येथे नुकतेच झालेल्या २२ व्या राष्ट्रीय मास्टर्स स्विमींग स्पर्धेत नेत्रदीपक कामगिरी करत २०० मीटर बेस्ट स्ट्रोक प्रकारामध्ये तिसरे स्थान पटकावित कांस्यपदक पटकाविले आहे. मोहनलाल कुकरेजा यांची ऍसिएन मास्टर स्विमींग चॅम्पियनशिप बंगलोर येथे स्पर्धेसाठी निवड झाली आहे. या स्पर्धा ऑक्टोबर २०२६ मध्ये होणार आहे. अहिल्यानगर जिल्ह्यातील पात्र ठरलेले एकमेव जलतरणपटू आहेत. कुकरेजा यांनी कठोर परीश्रम व सातत्यपूर्ण सरावाच्या जोरावर कांस्यपदक पटकावले आहे. त्यांच्या कामगिरीमुळे अहिल्यानगर जिल्ह्यातील जलतरणपटूंना एक वेगळी प्रेरणा मिळाली आहे. या पुढील स्पर्धांत त्यांचे नेतृत्वाखाली जलतरण स्पर्धेत सहभागी होण्याचा मनोदय जलतरणपटूंनी व्यक्त केला. स्थानिक क्रीडा क्षेत्रात त्यांचे यशामुळे आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून सर्वत्र अभिनंदन होत आहे.

### शालेय तालुकास्तरीय कुस्ती स्पर्धेत पैलवान प्रशांत जाधव प्रथम




**संगमनेर** : पारनेर तालुक्यातील मांडवे खुर्द येथील रहिवासी असलेले पहिलवान प्रशांत किसन जाधव यांनी शालेय तालुकास्तरीय कुस्ती स्पर्धेत नुकताच प्रथम क्रमांक पटकवत सुवर्णपदक मिळविले आहे. क्रीडा व युवक सेवा संचालन महाराष्ट्र राज्य पुणे व अहिल्यानगर जिल्हा क्रीडा यांच्या संयुक्त विद्यमानाने शालेय तालुकास्तरीय कुस्तीस्पर्धा सन २०२६-२७ या वर्षासाठी श्री शिवछत्रपती संकुलन पारनेर येथे बुधवार दि. १६ सप्टेंबर २६ आयोजित करण्यात आले होती. यावेळी तालुकास्तरीय शालेय कुस्ती स्पर्धेमध्ये पैलवान प्रशांत जाधव यांनी चितपट कुस्ती करून प्रथम क्रमांक पटकावत सुवर्णपदक मिळविले. त्याच्या या यशाबद्दल मांडवे खुर्द गावाचे व कुटुंबाचे व शाळेचे नाव अभिमानाने उंचावले असून त्याच्या या अभिमानास्पद कामगिरीबद्दल सर्वत्र कौतुक होत आहे.

### वनप्रस्थ फाउंडेशनच्या सहकार्याने प्रवरा महाविद्यालयातर्फे वृक्षारोपण



**लोणी** : सामाजिक बांधिलकी, पर्यावरण संवर्धन आणि विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणविषयक जागरूकता निर्माण करण्याच्या उद्देशाने लोकनेते पद्मभुषण डॉ.बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या चिंचोली सिन्नर येथील प्रवरा महिला औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय, चिंचोली, नाशिक यांच्या वतीने महाविद्यालयीन सामाजिक बांधिलकी अंतर्गत वृक्षारोपण व पर्यावरण संवर्धन उपक्रमाचे आयोजन करण्यात आले.

वनप्रस्थ फाउंडेशन, सिन्नर यांच्या सहकार्याने आई तुळजाभवानी डोंगर परिसरांत हा उपक्रम उत्साहात पार पडला. या उपक्रमात महाविद्यालयातील विद्यार्थी व शिक्षकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत वृक्षारोपण केले. वृक्षारोपणासोबतच वृक्षसंवर्धन, पर्यावरण संरक्षण, जैवविविधतेचे संवर्धन आणि शाश्वत विकास याबाबत विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती करण्यात आली. उपक्रम समन्वयिका डॉ. कावेरी वडितके, आणि शीतल गोसावी यांनी उपक्रमाच्या आयोजनासाठी व यशस्वी अंमलबजावणीसाठी सक्रिय सहभाग घेतला.

# स्पर्धांमध्ये जिंकण्यासाठी खेळा; मात्र कामात निष्ठा कायम ठेवा : डॉ. सुस्मिता विखे

## डॉ.सुजय विखे पाटील यांनी केले क्रिडा स्पर्धेचे उद्घाटन





**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**लोणी** : प्रवरा सांस्कृतिक महोत्सवाच्या माध्यमातून आपल्या समृद्ध संस्कृतीचा जागर होत असतानाच क्रीडा स्पर्धांच्या माध्यमातून सांघिक भावना, एकोपा आणि परस्पर समन्वयाची जडणघडण व्हावी, या उद्देशाने क्रीडा स्पर्धांना विशेष महत्त्व देण्यात आले आहे. प्रत्येकाने स्पर्धेत जिंकण्यासाठी खेळावे; मात्र जीवनातील प्रत्येक काम करताना निष्ठा, प्रामाणिकपणा आणि समर्पणाची भावना कायम ठेवावी, असे प्रतिपादन लोकनेते पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुस्मिता विखे पाटील यांनी केले.

जलसंपदा तथा अहिल्यानगरचे पालकमंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या संकल्पनेतून तसेच प्रदेश उपाध्यक्ष डॉ. सुजय विखे पाटील आणि डॉ. सुस्मिता विखे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित प्रवरा सांस्कृतिक क्रीडा महोत्सवातील क्रीडा स्पर्धांच्या शुभारंभप्रसंगी त्या बोलत होत्या. यावेळी संस्थेतील शाळा, महाविद्यालये तसेच कर्मचाऱ्यांसाठी आयोजित मुला-मुलींच्या हॉलीबॉल स्पर्धेचे उद्घाटन डॉ. सुजय विखे पाटील यांच्या हस्ते झाले.

विद्यार्थ्यांना शुभेच्छा देताना त्यांनी खेळामध्ये सांघिक भावना कायम ठेवत जिंकण्यासाठी प्रयत्न करा, असा संदेश दिला. प्रवरा सांस्कृतिक महोत्सवात बालगोपाळांच्या सांस्कृतिक कार्यक्रमांसोबतच क्रीडा स्पर्धांनाही विशेष स्थान देण्यात आले आहे. संस्थेतील विविध खेळाडूंना आपले कौशल्य सिद्ध करण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध करून देण्याचे काम या माध्यमातून केले जाते. क्रीडेतून शिस्त, संघभावना, सामाजिक बांधिलकी आणि परस्पर सहकार्याची भावना विकसित होते, असे यावेळी सांगण्यात आले.

प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या फार्मसी महाविद्यालयाच्या क्रीडांगणावर झालेल्या या कार्यक्रमास शिक्षण संचालक डॉ. प्रदीप दिघे, शिक्षण संचालिका सौ. लीलावती सरोदे, डॉ. महेश खर्डे, फार्मसी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रविंद्र जाधव, आयटीआयचे अर्जुन आहेर, आस्थापना विभागाचे सागर शेगांवकर यांच्यासह विविध विभागांचे प्रमुख, शिक्षक, कर्मचारी आणि क्रीडाप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## सरपंच सुरडकर यांचे पुणतांबा सबस्टेशन समोर उपोषण सुरू

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**




**शिर्डी** : राहाता तालुक्यातील मौजे रामपूरवाडी येथे मागील ६ ते ७ महिन्यांपासून सुरू असलेल्या भीषण वीजकपातीविरोधात अखेर आजपासून महावितरण कार्यालयासमोर आमरण उपोषण सुरू झाले आहे.

गावात गेल्या अनेक महिन्यांपासून दररोज १३ ते १५ तास वीज गायब राहत असल्याने त्रस्त झालेल्या ग्रामस्थांच्या वतीने माजी सरपंच संदीप तुकाराम सुरडकर यांनी यापूर्वीच महावितरणला आंदोलनाचा इशारा दिला होता. वारंवार तोंडी व लेखी तक्रारी करूनही प्रशासनाने कोणतीही दखल न घेतल्याने अखेर दिलेल्या इशाऱ्यानुसार आजपासून अन्नत्याग उपोषण सुरू करण्यात आले आहे.

गेल्या सहा महिन्यांपासून गावात सलग १३ ते १५ तास वीज खंडित होत असल्याने रामपूरवाडीतील जनजीवन पूर्णपणे विस्कळीत झाले आहे. सततच्या लो-व्होल्टेजमुळे घरातील महत्त्वाची विद्युत उपकरणे नादुरुस्त होत आहेत, तर वीज नसल्याने अंधारात शाळकरी मुलांचा अभ्यास आणि शिक्षण कोलमडले आहे.

दुसरीकडे, वेळेवर वीज मिळत नसल्याने शेतकऱ्यांना विहिरीचे पाणी शेतात देता येत नाही, ज्यामुळे त्यांची उभी पिके डोळ्यांसमोर जळून चालली आहेत.

जोपर्यंत रामपूरवाडीचा वीज पुरवठा सुरळीत होत नाही आणि महावितरणचे अधिकारी लिखित स्वरूपात ठोस आश्वासन देत नाहीत, तोपर्यंत उपोषण मागे घेतले जाणार नाही, असा ठाम पवित्रा माजी सरपंच संदीप सुरडकर यांनी घेतला असून या आंदोलनामुळे राहाता तालुक्यात खळबळ उडाली आहे.

## श्रीरामपूरात नवमतदार नोंदणीसाठी प्रशासन सज्ज



**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर** : भारत निवडणूक आयोगाच्या विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रम-२०२६ अंतर्गत २२०-श्रीरामपूर (अ.जा.) विधानसभा मतदारसंघात १९, २०, २६ व २७ सप्टेंबर रोजी विशेष मतदार नोंदणी शिबिरांचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिरांच्या माध्यमातून नवमतदार नोंदणी, मतदार यादीतील नावात दुरुस्ती तसेच नाव वगळणीचे अर्ज स्वीकारले जाणार आहेत. १ ऑक्टोबर २०२६ रोजी वयाची १८ वर्षे पूर्ण करणाऱ्या तरुणांना मतदार म्हणून नोंदणी करण्याची संधी मिळणार आहे. महिला व दिव्यांग मतदारांचा मतदार यादीत समावेश वाढविण्यासाठी विशेष भर देण्यात येणार आहे. शिबिराच्या चारही दिवशी सर्व मतदान केंद्रांवर मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ) उपस्थित राहणार आहेत. एकही पात्र नागरिक मतदार नोंदणीपासून वंचित राहू नये, यासाठी शाळा व महाविद्यालयांमध्ये 'स्वीप'च्या माध्यमातून जनजागृती करण्यात येत आहे. नागरिकांनी या विशेष शिबिरांचा लाभ घेऊन आपले नाव मतदार यादीत नोंदवावे, असे आवाहन प्रांताधिकारी किरण सावंत पाटील, तहसीलदार मिलिंदकुमार वाघ, गटविकास अधिकारी स्मिता निकाळजे, मुख्याधिकारी मनोज उकिर्डे, देवळाली प्रवरा मुख्याधिकारी ऋषिकेश पाटील व नायब तहसीलदार हेमलता वाकडे यांनी केले आहे. १८ वर्षे पूर्ण केलेल्या प्रत्येक तरुणाने मतदार यादीत आपले नाव नोंदवावे. हीच खरी लोकशाहीची ताकद आहे. प्रशासनाने सर्व मतदान केंद्रांवर सुविधा उपलब्ध करून दिली आहे, असे प्रांताधिकारी किरण सावंत पाटील यांनी सांगितले.

## ग्रामीण खेळाडूंच्या कौशल्यांना हवी योग्य दिशा : सुमित कोल्हे

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**



**कोपरगांव** : ग्रामीण भागातील खेळाडू आणि विद्यार्थ्यांमध्ये प्रचंड कौशल्य दडलेले असते. त्यांना योग्य प्रशिक्षण, आवश्यक सुविधा आणि प्रोत्साहन मिळाल्यास ते राष्ट्रीय स्तरावर आपल्या गुणवत्तेची प्रभावी छाप उमटवू शकतात. कोपरगाव तालुक्यातील विद्यार्थ्यांनी विविध क्षेत्रांत उल्लेखनीय यश संपादन करून ही बाब अनेकदा सिद्ध केली आहे. ग्रामीण विद्यार्थ्यांमध्ये असलेल्या सुप्त प्रतिभेला योग्य दिशा मिळाल्यास ते देशपातळीवरही सर्वोच्च स्थान मिळवू शकतात, याचे ज्वलंत उदाहरण संजीवनी सैनिक स्कूल अँड ज्युनिअर कॉलेजच्या ब्रास बँड पथकाने देशात अव्वल क्रमांक पटकावून दाखवून दिले आहे, असे प्रतिपादन संजीवनी ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट्सचे विश्वस्त सुमित कोल्हे यांनी केले.

क्रीडा व संचालनालय, महाराष्ट्र राज्य पुणे व जिल्हा क्रीडा कार्यालय, अहिल्यानगर अंतर्गत कोपरगांव तालुका क्रीडा समितीच्या वतीने संजीवनी सैनिकी स्कूल अँड ज्युनिअर कॉलेजच्या भव्य मैदानावर १९ वर्षे वयोगटांतर्गत तालुका स्तरीय फुटबॉल सामन्यांच्या उद्घाटन प्रसंगी सुमित कोल्हे हे अध्यक्ष स्थानावरून बोलत होते. यावेळी कोपरगांव तालुका क्रीडा समितीचे अध्यक्ष नितिन निकम, डायरेक्टर ऑफ गव्हर्नन्स डी. एन. सांगळे, प्राचार्य कैलास दरेकर, कॅम्पस ॲडमिन विजय भास्कर, विविध संघांचे टीम मॅनेजर्स व्यासपीठावर हजर होते. तालुक्यातील एकुण १२ संघांनी या स्पर्धांमध्ये सहभाग नोंदविला. भारत सरकारच्या संरक्षण मंत्रालयाकडून संजीवनी सैनिक स्कूल अँड ज्युनिअर कॉलेजला प्राप्त झालेली १९६५ च्या भारत-पाकिस्तान युद्धात वापरण्यात आलेली टी-५५ रणगाडा वॉर ट्रॉफी ही राष्ट्रप्रेम, शौर्य आणि कर्तृत्वाची प्रेरणादायी साक्ष आहे. या ऐतिहासिक स्मृतीकडून युवकांनी देशभक्ती, शिस्त आणि जिद्दीची प्रेरणा घ्यावी, असा आशावाद सुमित कोल्हे यांनी व्यक्त केला. प्राचार्य दरेकर यांनी सर्वांचे स्वागत केले. पहिला सामना संजीवनी सैनिकी स्कूलचा विद्यार्थी राघवेंद्र पाठक याच्या विधिवत्त मंत्रोच्चरांनी सुरू झाला. स्कूलच्या ब्रास बॅण्ड पथकांच्या राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

# धारणगाव - माहेगाव देशमुख रस्ता सुधारणा कामाचे आ.काळेंच्या हस्ते भूमिपूजन

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**



**कोळपेवाडी** : एमडीआर-८५ वरील धारणगाव-माहेगाव देशमुख या जवळपास ५ किलोमीटर रस्त्याच्या ४.२० कोटी निधीतून करण्यात येणाऱ्या सुधारणा कामाचे भूमिपूजन गुरुवार (दि.१७) रोजी आमदार आशुतोष काळे यांच्या हस्ते मोठ्या उत्साहात पार पडले.

यावेळी बोलतांना आ.आशुतोष काळे म्हणाले की, माजी आमदार अशोकराव काळे यांनी त्यांच्या कार्यकाळात गोदावरी नदीवर धारणगाव-कुंभारी येथे पूल बांधल्यापासून पश्चिम भाग कोपरगाव शहराला जोडला जावून राज्य मार्ग०७ लगत असलेल्या सुरेगाव-कोळपेवाडी-माहेगाव देशमुख-कुंभारी या (एमडीआर-८५) मार्गे मोठ्या प्रमाणात रहदारी वाढली असून त्याचा प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष कोपरगाव शहराच्या बाजार पेठेवर सकारात्मक परिणाम होवून आर्थिक उलाढाल वाढली आहे.

सद्यस्थितीत एमडीआर-८५ वरील धारणगाव-माहेगाव देशमुख या जवळपास ५ किलोमीटर रस्त्याची दुरावस्था झाल्यामुळे त्याचा वाहनचालकांना व नागरीकांना मोठा त्रास सहन करावा लागत होता. त्यामुळे वाहनचालकांना व नागरीकांना होणारा त्रास कमी व्हावा यासाठी महायुती शासनाकडे पाठपुरावा करून या रस्त्याच्या सुधारणा करणे कामी ४.२० कोटी निधी मंजूर करून आणला असून त्या माध्यमातून होणाऱ्या सुधारणा कामातून अडचणी दूर होणार असल्याचे त्यांनी सांगितले.

या ५ किमी रस्त्याच्या सुधारणेमुळे वाहतुकीच्या अडचणी सुटणार असून कुंभारी, धारणगाव, माहेगाव देशमुख, कोळपेवाडी व सुरेगाव आदी गावातील नागरीकांमध्ये समाधानाचे वातावरण पसरले आहे.

याप्रसंगी परमपूज्य श्री राघवेश्वरनंदगिरीजी महाराज, कर्मवीर शंकरराव काळे सहकारी साखर कारखान्याचे उपाध्यक्ष दिनार कुदळे, संचालक सूर्यभान कोळपे, प्रशांत घुले, विष्णु शिंदे,संभाजीराव काळे आदींसह धारणगाव, हिंगणी, कुंभारी, माहेगाव देशमुख व कोळपेवाडी आदी ग्रामपंचायतचे सरपंच, उपसरपंच, सदस्य व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.


### जाहीर नोटीस

तमाम लोकांस कळविण्यात येते की,

मिळकतीचे वर्णन-मौजे खंडाळा महादेव ता. श्रीरामपूर जि. अहमदनगर येथील गट नं. २८८ मधील क्षेत्र ०१ हे. १२ आर यासी आकार रु. ०० पै ९७, यासी चतु:सीमा पूर्वेस लांडे यांची मिळकत, व दक्षिणेस श्री. गिताराम ढोकचौळे यांची मिळकत, पश्चिमेस श्री. विलास चंद्रकांत ढोकचौळे यांची मिळकत, उत्तरेस अंतर्गत १२ फुट रस्ता, येणेप्रमाणे मिळकत, तीमधील तदंगभूत वस्तू व सर्व प्रकारचे हक्कासह काही एक राखून न ठेवता,

नमूद मिळकत ही श्री. रविंद्र चंद्रकांत ढोकचौळे यांचे कायदेशीर मालकी हक्काची व प्रत्यक्ष कब्जेवहीवाटीची मिळकत होती व आहे. त्यांनी सदर मिळकतीबाबत आमचे अशीलांसोबत कायमस्वरूपी खरेदी करण्यासाठी सौदा केलेला असून त्यानुषंगाने काही रक्कम आगाऊ स्वरुपात स्वीकारली आहे. सदर मिळकत हि निजोखमी व निर्वेध असून त्यांचेव्यतिरिक्त अन्य कुणाचाही व कोणत्याही प्रकारचा हक्क अधिकार नाही, असा हमी व विश्वास त्यांनी आमचे अशिलांना दिलेला आहे.

तरी नमूद मिळकतीसंदर्भात कोणाचाही व कोणत्याही प्रकारचा खरेदी, दान, गहाण, ताबा, कर्ज, लीज, लीन, साठेखत करारनामा, पोटगी, बँक बोजा, वारसाहक्क इत्यादी कोणत्याही प्रकारचा हक्क व अधिकार असल्यास प्रस्तुत नोटीस प्रसिद्ध झालेपासून सात दिवसांचे आत सर्व मूळ कागदपत्रे व पुराव्यानिशी आमचे कार्यालयात समक्ष भेटून खात्री करून द्यावी. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास नमूद मिळकत ही निर्वेध व निजोखमी आहे असे समजून आमचे अशील विद्यमान मालकासोबत खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर व खरेदीखत झाल्यानंतर आलेल्या, तसेच परस्पर वर्तमानपत्रात प्रसिद्ध झालेल्या हरकती आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाही. याची नोंद घ्यावी. कळावे ही जाहीर नोटीस दिली असे.

श्रीरामपूर
दि. ०९/०९/२०२६

**अशिलातर्फे व करिता,**
**ॲड. प्रमोद रमेश आवारे**
**९२, मिनी स्टेडीयम, नवीन कोर्टाजवळ, वार्ड नं. १**
**श्रीरामपूर, जि. अहमदनगर, मो. ९८८१६६१६२४**



### ग्रामपंचायत कार्यालय वेस-सोयगाव, ता. कोपरगांव, जि. अहिल्यानगर

#### संक्षिप्त निविदा नोटीस क्र. ०२ सन २०२६-२७

खालील कामांच्या मोहोरबंद बी-१ निविदा, २ लिफाफे पद्धतीनुसार मा.सरपंच ग्रामपंचायत कार्यालय वेस-सोयगाव, ता. कोपरगांव यांच्या वतीने नोंदणीकृत ठेकेदारांकडून मागविण्यात येत आहेत. या कामाच्या कोऱ्या निविदा ग्रामपंचायत वेस-सोयगाव कार्यालयात दि. १८।०९।२०२६ ते दि. २५।०९।२०२६ पर्यंत ग्रामपंचायत वेस-सोयगाव कार्यालयाकडे निविदा फि भरल्यास देण्यात व स्विकारण्यात येतील. मोहरबंद निविदा ग्रा.पं.वेस-सोयगाव या कार्यालयात दि. २८।०९।२०२६ रोजी सकाळी ११.00 वाजता उघडण्यात येतील.

| अ. नं. | कामाचे नांव | अंदाजपत्रक रक्कम | निविदा रक्कम | काम पूर्ण करण्याचा कालावधी | निविदेचा प्रकार | कोऱ्या निविदाची किंमत | नोंदणीकृत ठेकेदार वर्ग | योजना नाव |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | मौजे वेस-सोयगांव येथे मागासवर्गीय वस्तीतील रस्ते दुरुस्ती, मुरुमीकरण व काट्या काढणे | ७0000 | ५५८१८ | ३ महिने | बी १ | २३६/- | खुला | ग्रामनिधी योजना सन २०२६-२७ |
| २. | मौजे वेस-सोयगांव येथे पाणीपुरवठा योजना देखभाल दुरुस्ती करणे. | १00000 | ८४३५९ | ३ महिने | बी १ | २३६/- | मजुर संस्था | ग्रामीण पाणीपुरवठा योजना सन २०२६-२७ |
| ३. | मौजे वेस-सोयगांव येथे अंगणवाडी वेस गावठाण 0१ इमारत दुरुस्ती करणे. | ६४७४६ | ५३५७९ | ३ महिने | बी १ | २३६/- | सु.बे. | १५ वा वित्त आयोग योजना सन २०२५-२६ अबंधित निधी |
| ४. | मौजे वेस-सोयगांव येथे अंगणवाडी वेस गावठाण 0२ इमारतीवर सोलर बसविणे व लाईट फिटींग करणे. | १३९७९७ | ११८४७२ | ३ महिने | बी १ | २३६/- | खुला | १५ वा वित्त आयोग योजना सन २०२५-२६ अबंधित निधी व ग्रामनिधी सन २०२६-२७ |
| ५. | मौजे वेस-सोयगांव येथे पाऊस पाणी संकलन करणे. | ५0000 | ४१६४३ | ३ महिने | बी १ | २३६/- | खुला | ग्रामीण पाणीपुरवठा योजना सन २०२६-२७ |

१. उपरोक्त कामाच्या निविदा कोणतेही कारण न दाखविता स्विकारण्याचा किंवा नाकारण्याचा हक्क सरपंच, ग्रा.पं.वेस-सोयगांव यांनी राखून ठेवला आहे. २. ठेकेदाराने कोऱ्या निविदा संचाचे अर्जासोबत अद्यावत नोंदणी दाखल्याची प्रत, पॅनकार्ड प्रत, जीएसटी नंबर प्रत, वर्क डन प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे. ३. कामाचा व कामावरील मजुरांचा शासकीय विमा उतरविणे ठेकेदारास बंधनकारक आहे. ४. सविस्तर निविदा अटी व शर्ती ग्रामपंचायत कार्यालयात पहावयास मिळतील.

**ग्रामपंचायत अधिकारी** **सरपंच**
**ग्रामपंचायत वेस-सोयगांव, ता. कोपरगांव**


# विवेकानंद महाविद्यालयाकडून आयुर्वेद दिनानिमित्त जनजागृती रॅली

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**



**राहुरी** : राहुरी फॅक्टरी येथील श्री विवेकानंद नर्सिंग होम ट्रस्ट अंतर्गत आयुर्वेद महाविद्यालयाच्या वतीने आयुर्वेद दिनानिमित्त विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. याच पार्श्वभूमीवर राहुरी फॅक्टरी परिसरात आयुर्वेदाचा प्रचार, प्रसार आणि आरोग्यविषयक जनजागृती करण्यासाठी रॅली काढण्यात आली. संस्थेचे अध्यक्ष अरुण तनपुरे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आलेली ही रॅली आयुर्वेद महाविद्यालयाच्या परिसरातून सुरू झाली. नगर-मनमाड मार्गावरून मार्गक्रमण करत रॅली छत्रपती शिवाजी महाराज स्मारक येथे पोहोचली. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अनंतकुमार शेकोकार यांच्या मार्गदर्शनाखाली उपप्राचार्य डॉ. संतोष बांगर, नोडल अधिकारी डॉ. एस. बी. तुपे, डॉ. प्रांजल खरात, मेडिकल ऑफिसर भागवत वीर, डॉ. विलास कड, डॉ. संदेश चोखर, डॉ. प्रदीप सुराशे, डॉ. आशिष बधे यांच्यासह महाविद्यालयातील अध्यापक, कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी झाले. आयुर्वेद दिनानिमित्त आयोजित या उपक्रमातून नागरिकांना आयुर्वेदिक चिकित्सा पद्धती, पंचकर्म, आहार-विहार, निरोगी जीवनशैली तसेच दैनंदिन जीवनातील आयुर्वेदाचे महत्त्व याबाबत माहिती देण्यात आली. विद्यार्थ्यांनी विविध उपक्रमांच्या माध्यमातून नागरिकांमध्ये आरोग्यविषयक जागृती केली. रॅलीच्या माध्यमातून आयुर्वेद चिकित्सा पद्धती आणि पारंपरिक जीवनशैलीचा अंगीकार करण्याबाबत जनजागृती करण्यात आली. तसेच आयुर्वेदाचा प्रचार व प्रसार करून नागरिकांना निरोगी जीवनशैलीचे महत्त्व पटवून देण्याचा संदेश देण्यात आला.


### जाहीर नोटीस

ॲडव्होकेट श्री. एस.ए.पांडे,
निशाणी नं.६
दिनांक /०९/२०२६

नेमलेली ता. २९/०९/२०२६

श्रीरामपुर येथील मे. १ ले सह दिवाणी न्यायाधिश साहेब क. स्तर यांचे कोर्टात......

वारस चौकशी अर्ज नं, ५९/२०२६

**१. किसनराव केरूजी आव्हाड**, वयः ८१ वर्ष, धंदाः व्यापार,
**२. शिल्पा किसनराव आव्हाड**, वयः ५४ वर्ष, धंदाः व्यापार, मो. ९८१९८७६९०३
**३. समिर किसनराव आव्हाड**, वयः ५२ वर्ष, धंदाः व्यापार, सर्व रा. वार्ड नंबर ७, काळाराम मंदिर परिसर, श्रीरामपुर, ता. श्रीरामपुर, जि. अहिल्यानगर,
**४. श्रध्दा योगेश बहाळकर**, वयः ४६ वर्ष, धंदाः व्यापार, रा. फ्लॅट नंबर ४०४, बिल्डींग सी, उनेक्सि, सर्वे नंबर १३४, मंगरपटटा सिटी, पुणे, ४११०२८ मो. ९८२२९५१५५७**--- अर्जदार**

**विरूध्द**

**कोणी नाही,---सा.वाला**

अर्ज : बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे चॅप्टर ८ प्रमाणे..

याकामी अर्जदारांचा 'अर्ज असा की,

१. अर्जदार नं १ पत्नी व अर्जदार नं २ ते ४ ची आई सुलभा किसन आव्हाड हे दिनांक ०१/०७/२०२१ रोजी श्रीरामपुर येथे मयत झालेले आहे.

२. मयत सुलभा किसन आव्हाड यांना अर्जदार यांचे व्यतिरीक्त इतर कोणीही कायदेशिर वारस नाहीत. केवळ अर्जदार हेच मयताचे कायदेशिर वारसदार आहेत म्हणुन शासकीय कार्यालयात संबंधीत अधिका-यांनी अर्जदार हे मयताचे वारस आहेत म्हणुन नुकतीच जुन २०२६ चे सुरवातीस मागणी केली आहे त्यामुळे अर्जदारांना प्रस्तुतचा अर्ज नमुद अर्जदार नं १ ते ४ हे मयत सुलभा किसन आव्हाड यांचे कायदेशिर वारस आहेत असे ठरवुन तसा वारस दाखला अर्जदार नं १ किसनराव केरूजी आव्हाड यांचे नावाने व त्यांचे लाभात मिळणेकामी प्रस्तुतचा वारस चौकशी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदरहु अर्जदार हे मयताचे वारस नाहीत असे कोणास समजविण्याचे असेल तर या जाहीर नोटीसीच्या तारखेपासुन ३० दिवसांचे आत स्वतः अगर माहीतगार वकिलांकरवी १ ले सह दिवाणी न्यायाधिश साहेब क. स्तर श्रीरामपुर या मे. कोर्टात हजर होवुन योग्य त्या पुराव्यानिशी हरकत नोंदवावी अन्यथा पुढील आदेश केले जातील,

आज दि. १५ माहे सप्टेंबर सन २०२६ रोजी माझे सहीनिशी व मे. न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिली.

**बेंच क्लार्क,**
**१ ले सह दिवाणी न्यायालय क. स्तर श्रीरामपुर**

शिक्का

**सहाय्यक अधिक्षक,**
**सह दिवाणी न्यायालय क. स्तर श्रीरामपुर**

पान १ वरुन

## उक्कलगाव येथे तरुणाचा खून, दोघे पोलिसांच्या ताब्यात

व्यक्तींवर संशय व्यक्त करत मारेकर्यांनी आशिषला जबर मारहाण करून रात्री मृतदेह पडवीत आणून टाकला असल्याचा आरोप त्यांनी केला आहेत. पोलिसांनी घटनास्थळावरून हत्येसाठी वापरलेले हत्यार जप्त आले का? याबाबत ग्रामस्थांमध्ये दबक्या आवाजात चर्चा सुरू होती. घटनास्थळी उपविभागीय पोलीस अधिकारी जयदत्त भवर यांनी भेट दिली. सदर घटनेचा तपास पोलीस निरीक्षक विशाल खैरे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे. पोलीस तपासाअंतीच खूनाचे नेमके कारण आणि सत्य बाहेर येणार आहे. याप्रकरणी श्रीरामपूर शहर पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली. रात्री उशिरापर्यंत गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू होती. पोलीस तपासानंतर खूनाचे रहस्य समोर येणार आहेत. सायंकाळीपर्यंत कोणी फिर्यादी गुन्हा दाखल करण्यासाठी पुढे आले नाहीत.

## खंडणीखोरांचा थरार; ५० हजारांची खंडणीसाठी मारहाण कोणत्या मारले

त्याच्या साथीदारांनी त्यांना आणि साक्षीदारांना अडवले. काठी व लोखंडी टॉमीने मारहाण करून ५० हजार रुपयांची खंडणी मागण्यात आली. शेळके यांनी पैसे देण्यास नकार दिल्यानंतर आरोपींनी त्यांच्याकडील रोख रक्कम जबरीने काढून घेतली. याप्रकरणी श्रीगोंदा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. गुन्हा दाखल होताच मुख्य आरोपी प्रतिक पाचपुते फरार झाला. या गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेता पोलीस अधीक्षकमुम्मका सुदर्शन यांच्या सूचनेनुसार स्थानिक गुन्हे शाखेने आरोपीच्या शोधासाठी दोन पथके रवाना केली.बातमीदारांचे जाळे आणि तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे पोलिसांनी आरोपीचा माग काढला. आरोपी सातारा, सांगली, पुणे आणि छत्रपती संभाजीनगर परिसरात असल्याची माहिती मिळाल्याने पथकांनी संबंधित जिल्ह्यांमध्ये धाव घेतली. मात्र तो वारंवार मुक्कामाची ठिकाणे बदलत असल्याने पोलिसांच्या हातावर तुरी देऊन फरार होत होता .अखेर १७ सप्टेंबर रोजी प्रतिक पाचपुते हा नेवासा तालुक्यातील शिंगवे तुकाई परिसरात येणार असल्याची खात्रीशीर माहिती पथकाला मिळाली. पोलिसांनी विलंब न करता सापळा रचला आणि प्रतिक पाचपुते याला ताब्यात घेतले. त्याला पुढील तपासासाठी श्रीगोंदा पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे.ही कारवाई स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक कृष्णकुमार सेदवाड व स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने केली. प्रकरणाचा पुढील तपास श्रीगोंदा पोलीस करीत आहेत.

न्यायालयाचा दणका! -मुख्य आरोपी प्रतिक पाचपुतेला २ दिवसांची पोलीस कोठडी

खंडणीसह जबरी चोरीच्या गुन्ह्यात एलसीबीने ताब्यात घेतलेल्या प्रतिक गोकुळ पाचपुतेला न्यायालयाने दोन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली. पुढील तपासासाठी पोलिसांकडून आरोपीची चौकशी सुरू आहे.

..........

## कृषी आयुक्तालयाच्या रडारवर जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी

पत्रात नमूद केले आहे.सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी शासकीय बैठकींना उपस्थित राहावे, वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दिलेल्या सूचनांचे पालन करावे तसेच ऑनलाइन आणि प्रत्यक्ष शासकीय कामकाज नियमितपणे पार पाडावे, अशा सूचना देण्याचे निर्देश आयुक्तांनी दिले आहेत. शासकीय बैठकीस अनुपस्थित राहणे, ऑनलाइन काम काज न करणे किंवा अन्य कारणांमुळे शासकीय कामकाजापासून दूर राहणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांची स्वतंत्र नोंद ठेवण्यासही सांगण्यात आले आहे.

# शिक्षकांची बंद केलेली वेतनवाढ आदेश त्वरित रद्द करा : आ. सतीश चव्हाण

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**गंगापूर :** छत्रपती संभाजीनगर जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाने गंगापूर व खुलताबाद तालुक्यातील मुख्यालयी न राहणार्या १०४६ शिक्षकांची एक वार्षिक वेतनवाढ तीन वर्षासाठी बंद करण्यात येणार असल्याचा आदेश काढला असून हा आदेश त्वरित रद्द करावा अशी मागणी आमदार सतीश चव्हाण यांनी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मिन्नू पी. एम. यांच्याकडे केली आहे.

आ. सतीश चव्हाण यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, शिक्षकांना मुख्यालयी राहण्याची सक्ती करण्याअगोदर मु'यालयी राहण्यासाठी त्या शिक्षकांना शासकीय निवासस्थाने, आवश्यक त्या सोयीसुविधा उपलब्ध आहेत का?, राज्यात विधानसेभेचे २८८ मतदारसंघ असतांना गंगापूर-खुलताबाद मतदारसंघातील शिक्षकांनाच मुख्यालयी राहण्याचा सक्ती का?, शिक्षकांच्या बाबतीत आकस ठेवून कुणाचा हट्ट पुरविण्यासाठी जिल्हा परिषदेने हा आदेश काढला?, शिक्षक हे वेळेवर येत असतील व विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्व शिक्षण देत असतील तर शिक्षकांना मुख्यालयी राहण्यासाठी एवढा अट्टहास कशासाठी? असा सवाल आमदार सतीश चव्हाण यांनी उपस्थित केला आहे.

केवळ मुख्यालयी राहत नाहीत या कारणावरून शिक्षकांची तीन वर्षांची वेतनवाढ रोखणे हा समस्येवर उपाय होऊ शकत नाही. शिक्षकांना मुख्यालयी राहण्यासाठी अगोदर निवासस्थाने याच बरोबर भौतिक सोयीसुविधा उपलब्ध करून द्याव्यात. सुविधा उपलब्ध करून दिल्यानंतरही जाणीवपूर्वक नियमांचे उल्लंघन होत असल्यास नियमानुसार कारवाई करण्याचा शासनाला अधिकार आहे. मात्र सुविधाच उपलब्ध करून न देता दंडात्मक कारवाई करणे हे अन्यायकारक आहे. शिक्षक हा शिक्षणव्यवस्थेचा कणा आहे. त्याच्या आर्थिक हक्कांवर गदा आणून शिक्षणाचा दर्जा सुधारणार नाही. उलट या निर्णयामुळे शिक्षकांमध्ये प्रचंड असंतोष निर्माण झाला असून गंगापूर व खुलताबाद तालुक्यातील शाळांवर त्याचा विपरीत परिणाम होऊ शकतो असे आमदार सतीश चव्हाण यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या निदर्शनास आणून दिले आहे.

## उपजिल्हा रुग्णालयात मराठवाडा मुक्ती दिन साजरा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**गंगापूर :** गंगापूर उपजिल्हा रुग्णालयात मराठवाडा मुक्ती संग्राम दिन साजरा करण्यात आला येथील ध्वजारोहण डॉ. सुधाकर मुंडे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी उपस्थित अधिकारी, कर्मचारी आणि रुग्णालयीन कर्मचाऱ्यांनी राष्ट्रध्वजाला मानवंदना देत मराठवाड्याच्या मुक्तीसाठी संघर्ष करणाऱ्या स्वातंत्र्यसैनिकांच्या त्याग व बलिदानाला अभिवादन केले.यावेळी अतुल रासकर सदस्य रुग्ण कल्याण समिती यांनी उपस्थित राहून स्वातंत्र्यसैनिकांना अभिवादन केले. रुग्णालयातील सर्वसामान्य, गोरगरीब आणि गरजू रुग्णांना योग्य उपचार, आवश्यक मार्गदर्शन आणि संवेदनशील सेवा मिळावी, यासाठी रुग्णसेवेला सर्वोच्च प्राधान्य देण्याची भूमिका यावेळी अधोरेखित करण्यात आली. स्वातंत्र्यसैनिकांच्या त्यागाची प्रेरणा घेऊन जनतेची सेवा आणि रुग्णांची सेवा अधिक प्रभावीपणे करण्याचा संकल्प हीच या दिनाची खरी प्रेरणा असल्याचे यावेळी उपस्थितांनी सांगितले. उपस्थित अधिकारी व कर्मचारी यावेळी डॉ. सुधाकर मुंडे, अतुल रासकर – सदस्य, रुग्ण कल्याण समिती, डॉ. सूर्यवंशी, डॉ. केंद्रे, डॉ. मनोरे, डॉ. शेजूळ, डॉ. म्हस्के, सिस्टर कुलकर्णी, रुकसाना शेख, बेबी शेख, वाघ सिस्टर, पवार सिस्टर, तपसे सिस्टर, मंगेश गायकवाड, साबळे, अनिल साळुंके, मोहिते, दळे सिस्टर, लोंढे, किशोर हिवाळे आदी रुग्णालयीन अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

## अमोल पंडित यांना उत्कृष्ट अभियंता पुरस्कार

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**वैजापूर :** जलसंपदा विभागात कार्यरत असलेले कार्यकारी अभियंता अमोल अरुणराव पंडीत यांना महाराष्ट्र शासनाचा 'उत्कृष्ट अभियंता पुरस्कार' जाहीर झाला आहे. त्यांच्या उल्लेखनीय कार्याची दखल घेत शासनाने हा सन्मान जाहीर केल्याने नाशिकसह छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील नागरिकांकडून त्यांचे अभिनंदन होत आहे.



अमोल पंडीत हे छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील कन्नड तालुक्यातील रहिवासी आहेत. त्यांचे प्राथमिक व माध्यमिक शिक्षण वैजापूर तालुक्यात झाले. अभियंता म्हणून सेवेत दाखल झाल्यानंतर त्यांनी जलसंपदा विभागातील विविध जबाबदाऱ्या प्रभावीपणे पार पाडल्या. जलसंपदा प्रकल्पांच्या नियोजनासह अंमलबजावणी, जलव्यवस्थापन आणि विभागीय कामकाजात त्यांनी उल्लेखनीय योगदान दिले आहे.

सन २०२३ वर्षाच्या कामासाठी हा पुरस्कार मिळाला आहे.१६ सप्टेंबर रोजी पुरस्काराचे वितरण होणार आहे.हा पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचे अभिनंदन होत आहे.

## अकारी पडीत जमिनी वाटपाच्या निर्णयाचे माळवाडगावात फटाके वाजवून स्वागत

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**माळवाडगाव :** शेती महामंडळाच्या हरिगाव मळा नऊ गावे कार्यक्षेत्रातील अकारी पडीत जमिनी संबंधित शेतकऱ्यांच्या मूळ वारसांना देण्याचा निर्णय मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आल्याने माळवाडगाव येथे गिरीधर आसने मित्रमंडळाच्या वतीने फटाके वाजवून निर्णयाचे स्वागत करण्यात आले. यावेळी महायुती सरकार तसेच पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या समर्थनार्थ घोषणाबाजी करण्यात आली.

माळवाडगावने खंडकरी लढ्याप्रमाणेच अकारी पडीत जमिनीच्या प्रश्नासाठीही सातत्याने पाठपुरावा केला. याचिकाकर्ते गिरीधर किसनराव आसने यांनी २०१२ पासून या प्रश्नासाठी न्यायालयीन लढा सुरू ठेवला. त्यांचे वडील व खंडकरी चळवळीचे नेते कै. किसनराव गोविंदराव आसने यांनीही त्यांच्या कार्यकाळात खंडकरी जमिनी मिळवून देण्यासाठी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली होती.

दरम्यान, तत्कालीन महसूल मंत्री एकनाथ खडसे यांच्याकडेही अकारी पडीत जमिनीच्या प्रश्नाबाबत पाठपुरावा करण्यात आला होता. त्यानंतर महसूल मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडेही सातत्याने पाठपुरावा करण्यात आला. विखे पाटील यांनी उच्च न्यायालयातील विधिज्ञ ॲड. अजित काळे यांच्याशी चर्चा करून शासनाच्या वतीने आवश्यक पत्रव्यवहार केला. त्यानंतर संभाजीनगर उच्च न्यायालयाने अकारी पडीत शेतकऱ्यांच्या बाजूने निकाल दिला. आता मंत्रिमंडळाने जमिनी वाटपाचा निर्णय घेतल्याने शेतकऱ्यांच्या दीर्घकाळच्या लढ्याला यश मिळाल्याची भावना व्यक्त करण्यात आली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, महसूल मंत्री बावनकुळे, पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्यासह भाजपा जिल्हाध्यक्ष नितीन दिनकर, तालुकाध्यक्ष बाबासाहेब चिडे, माजी तालुकाध्यक्ष दीपक पटारे, याचिकाकर्ते गिरीधर आसने, डॉ. शंकरराव मुठे, महेंद्र पटारे व भाऊसाहेब बाद्रे यांनी निर्णयाचे स्वागत केले.

## वीजपुरवठा सुरळीत न झाल्यास भोकर सबस्टेशनला टाळे : ज्ञानदेव साळुंके

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**टाकळीभान :** भोकर वीज उपकेंद्रातून टाकळीभान, भोकर, घुमनदेव, कमालपूर आदी गावांना वारंवार खंडित होणारा वीजपुरवठा होत असल्याने शेतकरी व नागरिक त्रस्त झाले आहेत. महावितरणने वीजपुरवठा सुरळीत न केल्यास भोकर वीज उपकेंद्राला घेराव घालून टाळे ठोकण्यात येईल, असा इशारा अशोकचे माजी चेअरमन ज्ञानदेव साळुंके व टाकळीभान लोकसेवा विकास आघाडीच्या वतीने देण्यात आला आहे. सध्या पावसाने उघडीप दिल्याने शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे. पिके वाचविण्यासाठी शेतकऱ्यांना विहिरी व अन्य स्रोतांमधून पाणी देण्याची धावपळ करावी लागत आहे. त्यातच वारंवार वीजपुरवठा खंडित होत असल्याने शेतकऱ्यांना मोठा मनस्ताप सहन करावा लागत आहे. पिकांना पाणी देण्यासाठी रात्रीच्या वेळी बिबट्या व अन्य हिंस्र प्राण्यांची जोखीम पत्करून शेतात जावे लागत असल्याचे साळुंके यांनी सांगितले. वाड्या-वस्त्यांवर रात्रीच्या वेळी वीजपुरवठा खंडित झाल्याने लहान मुले व वृद्धांमध्येही भीतीचे वातावरण निर्माण होते. अशा परिस्थितीत अनुचित घटना घडल्यास जबाबदार कोण, असा सवालही त्यांनी उपस्थित केला. महावितरणने योग्य नियोजन करून अखंड वीजपुरवठा करावा.

## निधन

### सदाशिव आव्हाड



**शिरसगाव :** उंदीरगाव येथील सदाशिव शहादू आव्हाड वय ६४ यांचे अल्पशा आजाराने निधन झाले त्यांचेमागे मुले,मुली,सुना,नातवंडे असा परिवार आहे. सामाजिक कार्यकर्ते रामचंद्र आव्हाड यांचे चुलते व शरद व योगेश यांचे ते वडील होत.

### तान्हाजी गायकवाड



**आश्वी ।** आश्वी खुर्द (ता. संगमनेर) येथील तान्हाजी रावबा गायकवाड (वय - ५२) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. दिवंगत तान्हाजी गायकवाड हे पंचक्रोशीत बँका आणि पतसंस्थाचे पिग्मी एजंट म्हणून कार्यरत असल्याने त्याचा मोठा लोकसंग्रह होता. त्यांच्या पश्चात आई, पत्नी, दोन मुले, दोन बहिणी, मेहुणे असा मोठा परिवार आहे. माजी ग्रामपंचायत सदस्या सुनिता गायकवाड यांचे पती तसेच शुभम गायकवाड व साईराज गायकवाड यांचे ते वडील होत.

## सुजाता स्कूलचे जिल्हास्तरीय लॉन टेनिस स्पर्धेत यश

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**सोनई :** क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे जिल्हा क्रीड अधिकारी कार्यालय व जिल्हा क्रीडा परिषद, अहिल्यानगर यांच्या संयुक्त विद्यमानाने आयोजित जिल्हास्तरीय लॉन टेनिस स्पर्धा बुधवार दिनांक १६ सप्टेंबर रोजी नगर क्लब, अहिल्यानगर या ठिकाणी पार पडल्या. संपूर्ण जिल्ह्या मधून विविध शाळांनी स्पर्धेत सहभाग घेतला होता. यामध्ये आपल्या सुजाता इंटरनॅशनल स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज चा इयत्ता बारावीत शिकणारा विद्यार्थी सूर्या कमलेश काकडे १९ वर्ष मुले या वयोगटात जिल्ह्यात प्रथम आला असून त्याची निवड विभागीय स्तर स्पर्धेसाठी झाली आहे. त्याला मिळालेल्या या यशाबद्दल विविध स्तरातून त्याचे कौतुक होत आहे. त्याने संपादन केलेल्या यशाबद्दल संस्थेचे संस्थापक अध्यक्ष किरणजी सोनवणे, प्राचार्या ज्योती सोनवणे, व शिक्षक वृंद यांनी अभिनंदन केले.

## विना क्रमांक वाहनांवर पोलिसांची कारवाई

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**वैजापूर :** वैजापूर पोलिसांकडून गुरुवार रोजी विना क्रमांकाची वाहने, ड्रायव्हिंग लायसन्स नसताना वाहन चालवणाऱ्यांवर कारवाई डॉ बाबासाहेब आंबेडकर चौकात करण्यात आली. वैजापूर पोलिस ठाण्याचे निरीक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली गुरुवारी सकाळी उपनिरीक्षक युवराज पाडळे व वैजापूर पोलिसांच्या पथकाने विना क्रमांक असलेल्या वाहनांवर व विना लायसन्स वाहन चालवणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई केली. यावेळी पोलिसांकडून नागरिकांनी वाहतुकीचे नियम पाळावे,विना क्रमांक दुचाकी अथवा चारचाकी वाहन चालवू नये,चालकांकडे लायसन्स असणे आवश्यक आहे विना लायसन्स वाहन चालवू नये अन्यथा पोलिसांकडून दंडात्मक कारवाई करण्यात येईल असा इशारा देण्यात आला आहे.




## वैजापूर शहरात चक्री जुगार अड्ड्यावर पोलिसांचा छापा ; आठ जणांविरुद्ध गुन्हा



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**वैजापूर :** शहरातील येवला रोडवरील बसस्थानकाजवळ टपरीत सुरू असलेल्या अवैध चक्री जुगार अड्ड्यावर वैजापूर पोलिसांनी बुधवारी रात्री छापा टाकून कारवाई केली. या कारवाईत जुगाराचे साहित्य, रोख रक्कम व मोबाईल असा एकूण ५६ हजार ४५० रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला. याप्रकरणी आठ जणांविरुद्ध वैजापूर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांना येवला रोडवरील बसस्थानकाजवळील एका टपरीत चक्री जुगार सुरू असल्याची माहिती मिळाली होती. या माहितीच्या आधारे पोलिस उपअधीक्षक विनय सोनवणे, पोलिस उपनिरीक्षक युवराज पाडळे, पोलिस हेड कॉन्स्टेबल गोरक्ष तसेच हेड कॉन्स्टेबल अविनाश भास्कर यांच्या पथकाने बुधवारी रात्री आठच्या सुमारास संबंधित ठिकाणी छापा टाकला. यावेळी बजरंग भावसिंग राजपूत (वय २२, रा. पाटील गल्ली, वैजापूर), शाम बाळासाहेब साळुंके (२४, रा. वैजापूर), राजू सुदाम शिंदे (३२, रा. शंकरनगर, वैजापूर), रमेश गमाजी पवार (३६, रा. खंबाळा, ता. वैजापूर), अमोल रावसाहेब गायकवाड (३५, रा. फुलेवाडी रोड, वैजापूर), योगेश बाबासाहेब भवर (२४, रा. परदेशी गल्ली, वैजापूर), शंकर नंदू त्रिभुवन (३०, रा. दत्तनगर, वैजापूर) आणि भीमा काशीनाथ त्रिभुवन (५६, रा. दत्तवाडी, वैजापूर) हे जुगार खेळताना व खेळविताना पोलिसांना आढळून आले.रपोलिसांनी त्यांच्या ताब्यातून जुगाराचे साहित्य, रोख रक्कम व मोबाईल असा ५६ हजार ४५० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. याप्रकरणी पोलिस हेड कॉन्स्टेबल अविनाश भास्कर यांच्या फिर्यादीवरून आठही जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास वैजापूर पोलिस करीत आहेत.

**Change of Name**

I have changed my old name Haripriya Sachin sabale to a new name Haripriya Sachin Sable. Ref. wide affidavit no. 26522420612681 00242551. Dated 15-09-2026.

**Change of Name**

I, BANSODE PRADIP POPATRAO, Residing at SAKURI TAL-RAHATA DISTRICT-AHILYANAGAR herby declare that I have changed my name from BANSODE PRADIP POPATRAO to PRADIP POPATRAV BANSODE.
Henceforth ,I shall be known and identified by my new name PRADIP POPATRAV BANSODE for all purposes, including official records ,government documents ,passports and other legal purposes.
Date-16.09.2026 Place-Rahata

**नावात बदल**

यापूर्वी माझे नाव अरिहंत संदीपकुमार चुत्तर असे होते. आता माझे नवीन नाव अरिहंत संदीप चुत्तर असे राहणार आहे. यापुढे माझे नाव कायमस्वरूपी अरिहंत संदीप चुत्तर असेच ग्राह्य धरावे

# गाथाची कराटेत सुवर्ण कामगिरी

### अवघ्या ८ व्या वर्षी मिळवला ब्लॅक बेल्ट

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**वैजापूर :** येथील विजेता स्पोर्ट्स असोसिएशनची खेळाडू गाथा गिरीश चापानेरकर हिने रविवार दिनांक ३० ऑगस्ट २०२६ रोजी मराठा मंदिर हॉल छत्रपती संभाजीनगर येथे झालेल्या खुल्या आंतरराष्ट्रीय कराटे स्पर्धेत ८ वर्षे वयोगटातील कुमिते प्रकारात सुवर्णपदक पटकावले. तसेच काता प्रकारातील उत्कृष्ट कामगिरीबद्दल तिला स्मृतिचिन्ह देण्यात आले. या उल्लेखनीय कामगिरीबद्दल गाथाला उत्कृष्ट खेळाडूचा पुरस्कार मिळाला.विशेष म्हणजे, कुंग-फू कराटे मार्शल आर्टमध्ये आपल्या वयोगटात मराठवाड्यातील पहिली ब्लॅक बेल्ट मिळविणारी खेळाडू म्हणून गाथाने मान मिळविला आहे. तिला ब्लॅक बेल्ट, सुवर्णपदक, सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.गाथा गेल्या तीन वर्षांपासून विजेता स्पोर्ट्स असोसिएशनचे सचिव व मुख्य प्रशिक्षक निलेश नरवडे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रशिक्षण घेत आहे. तिच्या यशाबद्दल नगराध्यक्ष दिनेशसिंह परदेशी, मुख्याध्यापिका शिल्पा परदेशी तसेच प्रशिक्षक, शिक्षक व क्रीडाप्रेमींनी अभिनंदन केले.




सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये. मो. ९९७५४७९८२६

**नशिबाची परिक्षा**

शुक्रवार दि. १८ सप्टेंबर २०२६

**मिलनम डे**

उदय-अस्त सिंगल ५-१-९ मजबुत

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ५ | १४०<br>२३०<br>७८० | ३ | १२०<br>६३०<br>५८० | ६ | १५०<br>१६९<br>६०० |

१५-५२-९३-३४-०६-६१

**कल्याण**

उदय-अस्त सिंगल ९-४-५ मजबुत

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ७ | १६०<br>२५०<br>३४० | ६ | २८९<br>३०७<br>६०० | २ | १५६<br>१२९<br>२२८ |

५७-७१-३६-०४-३२-२५

**मुंबैम (मेन)**

उदय-अस्त सिंगल ४-७-९ मजबुत

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ० | १९०<br>२८०<br>२४४ | ४ | १३०<br>३३८<br>४४६ | ७ | १२४<br>७४९<br>३०० |

१०-०५-६४-४८-९७-७३

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये. मो. ९९७५४७९८२६

**नावात बदल**

मी बाजीराव बाळू सोनवणे असे जाहीर करतो की माझ्या शाळा सोडल्याच्या दाखल्यावर माझे नाव सोनवणे बाजीराव बाळासाहेब असे नमूद केले आहे मात्र माझ्या पॅन कार्ड आणि आधार कार्ड वर ते बाजीराव बाळू सोनवणे असे लिहिलेले आहे ही दोन्ही नावे एकाच व्यक्तीची आहेत
प्रतिज्ञापत्र क्र,-२६५२२४२०४१२६८१००७१८९६८
दिनांक १६/०९/२०२६

**नावात बदल**

मी अक्षय भीमराज रोहोम असे जाहीर करतो की माझ्या इयत्ता दहावीच्या प्रमाणपत्रावर (सर्टिफिकेट) माझे नाव रोहोम अक्षय भिमराज असे नमूद केले आहे तथापि माझ्या पॅन कार्ड व आधार कार्ड वर ते अक्षय भीमराज रोहोम असे लिहिलेले आहे ही दोन्ही नावे एकाच व्यक्तीची आहेत
प्रतिज्ञापत्र क्र २६५२२४२०४१२६८१००७१८९५१
दिनांक १६/०९/२०२६

**नावात बदल**

मी नानासाहेब काशिनाथ लबडे घोषित करतो की, माझ्या शाळा सोडल्याच्या प्रमाणपत्रावर माझे नाव लबाडे नाना काशिनाथ असे नमूद केले आहे, तथापि माझ्या पॅन कार्ड आणि आधार कार्डवर ते नानासाहेब काशिनाथ लबडे असे लिहिलेले आहे हे दोन्ही नावे एकाच व्यक्तीची आहेत
प्रतिज्ञापत्र क्र २६५२२४२०४१२६८१००७१८९६३
दिनांक १६/०९/२०२६

**नावात बदल**

मी सतीश कचेश्वर लुटे घोषित करतो की माझ्या शाळा सोडल्याच्या प्रमाणपत्रावर माझे नाव सतीश कचरू लुटे असे नमूद आहे. तथापि माझ्या पॅन कार्ड आणि आधार कार्डवर ते सतीश कचेश्वर लुटे असे लिहिलेले आहे, ही दोन्ही नावे एकाच व्यक्तीची आहेत.
प्रतिज्ञापत्र क्र.२६५२२४२०४१२६८१००७१८९५८
दिनांक १६/०९/२०२६

## गौतम पॉलिटेक्निकमध्ये शिक्षक दिन व अभियंता दिन साजरा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**कोळपेवाडी :** कर्मवीर शंकरराव काळे एज्युकेशन सोसायटी संचालित गौतम पॉलिटेक्निक इन्स्टिट्यूट गौतमनगर येथे शिक्षक दिन व भारतरत्न सर मोक्षगुंडम विश्वेश्वरय्या यांच्या जयंतीनिमित्त अभियंता दिन विविध उपक्रमांनी साजरा करण्यात आला. शिक्षक हे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक, तांत्रिक, सामाजिक व सर्वांगीण विकासामध्ये महत्त्वाची भूमिका बजावत असतात. त्यांनी दिलेले ज्ञान, मार्गदर्शन व योगदानाबद्दल आदर आणि कृतज्ञता व्यक्त करण्याच्या उद्देशाने विद्यार्थ्यांच्या वतीने शिक्षक दिनाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. वसीम शेख, संस्थेचे इन्स्पेक्टर नारायण बारे आणि कार्यालयीन अधीक्षक अण्णासाहेब बढे यांच्यासह महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना पेन व पुष्पगुच्छ देऊन शिक्षक दिनाच्या शुभेच्छा दिल्या. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक, तांत्रिक, सामाजिक व सर्वांगीण विकासात शिक्षकांचे योगदान अतुलनीय असून त्यांच्या प्रती असलेली कृतज्ञता विद्यार्थ्यांनी मनोगतातून व्यक्त केली.

तसेच संस्थेच्या संचालिका चैतालीताई काळे यांच्या मार्गदर्शनाखाली महाविद्यालयात अभियंता दिनाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमास नाशिक येथील संदीप युनिव्हर्सिटीचे प्रशिक्षण व नियुक्ती अधिकारी विवेक विसपुते हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. विद्यार्थ्यांना अभियंत्यांचे राष्ट्राच्या विकासातील योगदान, तांत्रिक ज्ञान, नवकल्पना आणि सर्जनशीलतेचे महत्त्व पटवून देणे हा या कार्यक्रमाचा प्रमुख हेतू होता. या निमित्ताने सर्व विभागांतील विद्यार्थ्यांसाठी प्रश्नमंजुषा स्पर्धा आणि पोस्टर सादरीकरण स्पर्धाचे आयोजित करण्यात आले असून या स्पर्धांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी आपले तांत्रिक ज्ञान, सर्जनशीलता, नाविन्यपूर्ण विचार प्रदर्शित केले.

यावेळी संस्थेचे निरीक्षक नारायण बारे, प्राचार्य वसीम शेख, कार्यालयीन अधीक्षक अण्णासाहेब बढे, सर्व विभागांचे विभागप्रमुख, प्राध्यापकवृंद, समन्वयक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# रानची वस्ती..बिबट्याची दहशत..

## अन् अंधाराचे साम्राज्य !

### जेऊर पंचक्रोशीत भारनियमनाविरोधात संताप
### विद्यार्थ्यांच्या अभ्यासासह नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**सायंकाळचा अंधार ; सुरक्षेचा गंभीर प्रश्न!**

बिबट्याचे दर्शन, रानालगतच्या वस्त्या आणि त्यातच अनिश्चित भारनियमन यामुळे जेऊर पंचक्रोशीतील नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला आहे. विद्यार्थ्यांचा अभ्यास, महिलांची कामे आणि गणेशोत्सवातील कार्यक्रम प्रभावित होत आहेत. महावितरणने तातडीने वीजपुरवठा सुरळीत करावा अशी मागणी ग्रामस्थांमधून होत आहे.

**नगर तालुका :** दुष्काळी परिस्थिती, वाढता उकाडा आणि परिसरात बिबट्याचे दर्शन यामुळे आधीच चिंतेत असलेल्या जेऊर पंचक्रोशीतील नागरिकांना दररोजच्या भारनियमनाचा सामना करावा लागत आहे. सायंकाळच्या वेळीच वीज गुल होत असल्याने जेवण, स्वयंपाक, विद्यार्थ्यांचा अभ्यास आणि गणेशोत्सवातील कार्यक्रमांवर परिणाम होत आहे. त्यामुळे महावितरणच्या कारभाराविरोधात ग्रामस्थांमध्ये संताप व्यक्त होत आहे.

जेऊर येथील महावितरणच्या उपकेंद्रांतर्गत येणाऱ्या गावांमध्ये गावठाण वगळता भारनियमन सुरू आहे. भारनियमनाची वेळही निश्चित नाही. सायंकाळच्या वेळी उकाडा आणि डासांचा त्रास वाढत असताना वीजपुरवठा खंडित होत असल्याने लहान मुले, वृद्ध आणि विद्यार्थ्यांना मोठ्या गैरसोयीला सामोरे जावे लागत आहे.

पंचक्रोशीतील अनेक वाड्या-वस्त्या डोंगराच्या कडेला आणि वनक्षेत्रालगत आहेत. परिसरात यापूर्वी अनेक वेळा बिबट्याचे दर्शन झाल्याने रात्रीच्या वेळी नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण असते. अशा परिस्थितीत वीजपुरवठा खंडित झाल्याने वस्त्यांवर अंधाराचे साम्राज्य पसरते. त्यामुळे वन्यप्राण्यांचा धोका आणि नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

जेऊर येथील घुरुडी डोंगरावर सौरऊर्जा प्रकल्प उभारण्यात आला आहे. या प्रकल्पामुळे शेतीसाठी दिवसा वीज आणि नागरिकांना चोवीस तास सुरळीत वीजपुरवठा मिळेल




अशी अपेक्षा ग्रामस्थांमध्ये होती. मात्र सायंकाळच्या वेळी सुरू असलेल्या भारनियमनामुळे या अपेक्षांवर पाणी फेरले गेल्याची भावना नागरिक व्यक्त करीत आहेत.

गणेशोत्सव सुरू असतानाच भारनियमनामुळे धार्मिक कार्यक्रमांमध्येही अडथळे निर्माण होत आहेत. त्यामुळे तातडीने भारनियमन बंद करून सुरळीत वीजपुरवठा सुरू करावा अन्यथा तीव्र आंदोलन करण्याचा इशारा सुरेश पवार, शरद तोडमल, रमेश पवार, नंदू तोडमल, गोरख तोडमल, प्रणव पवार यांच्यासह पंचक्रोशीतील ग्रामस्थांनी दिला आहे.

# आ. कर्डिले यांच्या प्रयत्नातून रस्त्यांच्या कामासाठी ३० कोटी रुपयांचा निधी मंजूर!

## मिरी घोडेगाव रस्ता दुरुस्ती कामाला मुहूर्त मिळाला!!

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**तिसगाव :** राहुरी नगर पाथर्डी मतदार संघातील विविध गावच्या रस्त्यांच्या कामांसाठी आ. अक्षय कर्डिले यांच्या प्रयत्नातून सुमारे ३० कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला असून या निधीच्या माध्यमातून राहुरी नगर पाथर्डी तालुक्यातील अनेक महत्त्वाच्या रस्त्यांचे खडीकरण डांबरीकरण व मजबुतीकरण केले जाणार आहे. गेल्या अनेक दिवसापासून मिरी घोडेगाव या रस्त्याची मोठी दुरवस्था झाली होती त्यामुळे पाथर्डी आणि नेवासा तालुक्याला जोडणारा हा महत्त्वाचा रास्ता खड्ड्यामुळे अडगळीस पडला होता मात्र या रस्त्याच्या खडीकरण व डांबरीकरणासाठी तब्बल तीन कोटी रुपयांचा निधी मंजूर झाल्याने निश्चितपणे या रस्त्याने प्रवास करणाऱ्या प्रवाशांची गैरसोय दूर होणार आहे. कामत शिंगवे ते प्राजीमा ३३ ग्रामीण मार्ग



या रस्त्यासाठी देखील तीन कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला आहे. पांढरीचापूल मिरी शेवगाव बेलाचे झाड पर्यंतच्या रस्त्याची देखील दुरुस्ती केली जाणार असून हा रस्ता देखील शेवगाव नगर पाथर्डी नेवासा तालुक्यातील प्रवाशांसाठी महत्त्वाचा मानला जात असून या रस्त्याच्या कामासाठी अडीच कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला आहे.

केशव शिंगवे पांगरमल पांढरीचापूल पर्यंतच्या रस्त्यासाठी देखील सुमारे अडीच कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला आहे. त्याचबरोबर नगर तालुक्यातील पिंपळगाव उज्जैनी ससेवाडी या रस्त्यासाठी अडीच कोटी तर वांबोरी ते खोसपुरी मिरी माका रस्ता या रस्त्यासाठी साडेतीन कोटी आणि ताहाराबाद राहुरी सोनई या रस्त्यासाठी चार कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला आहे.

**मतदार संघात बेरर चेकची चर्चा !**

विधानसभा पोटनिवडणुकीच्या निमित्ताने राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अक्षय कर्डिले यांना मोठ्या मताधिक्याने विजयी करा या मतदार संघाच्या विकास कामासाठी आजच मी अक्षयला बेरर चेक देऊन जात असल्याचे जाहीर सभेत सांगितले होते. त्याच अनुषंगाने पहिल्याच टप्प्यात रस्त्यांच्या कामासाठी ३० कोटी रुपयांचा निधी मंजूर झाल्याने आ. अक्षय कर्डिले यांनी बेरर चेक वटायला सुरुवात केली आहे की काय अशी चर्चा आता मतदारसंघात सुरू झाली आहे.

## द • ख • ल

### विद्यार्थ्यांनी राजभाषा हिंदीचा प्रसार करावा : प्रा. खिलारी



**टाकळी ढोकेश्वर :** हिंदी भारत देशाची राजभाषा आहे. विद्यार्थ्यांनी मातृभाषा मराठी इतकेच हिंदी भाषेविषयी जागरूक रहावे. भारत हा विविधतेतून एकदा जपणारा देश आहे. हिंदी भाषेच्या ज्ञानामुळे आपणास जागतिक स्पर्धेत टिकून राहता येईल. विद्यार्थ्यांनी राजभाषा हिंदीचा प्रसार करावा असे प्रतिपादन प्राचार्य बाळासाहेब खिलारी यांनी केले. श्री ढोकेश्वर विद्यालयात १४सप्टेंबर हा हिंदी दिवस अतिशय उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी हिंदी भाषेचे थोर साहित्यकार मुंशी प्रेमचंद यांच्या प्रतिमेचे पूजन करून त्यांच्या साहित्याविषयी विद्यार्थ्यांना माहिती देण्यात आली. हिंदी दिनाच्या निमित्ताने विद्यालयात वकृत्व स्पर्धा, निबंध स्पर्धा व सुंदर हस्ताक्षर स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते.विद्यार्थ्यांमधून वेद दाते,वैष्णवी ठुबे,भक्ती खैरे,समृद्धी जांभळकर,ज्ञानेश्वरी उदावंत, वेदिका वाळुंज,प्रियल झावरे,मनस्वी झावरे यांनी हिंदी भाषेविषयी सुंदर विचार मांडले.कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी सांस्कृतिक समिती,सर्व शिक्षक आणि शिक्षकेत्तर सेवकांनी परिश्रम घेतले.या कार्यक्रमासाठी सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर सेवक व विद्यार्थी उपस्थित होते.कार्यक्रमाचे प्रास्ताविक ज्ञानदा पायमोडे हिने केले.सूत्रसंचालन वैभवी कटारिया व आराध्या कडुसकर यांनी केले.तर आभार समृद्धी जांभळकर हिने मानले.

### सांस्कृतिक परंपरा जपत शिवशंकर गणेश मित्र मंडळाचा गणपती आगमन सोहळा



**निघोज :** श्री गणरायाचा जयघोष ढोलाचा निनाद लेझीमचा ताल सनईचे मंगल सूर आणि पारंपरिक वाद्यांच्या गजरात वडनेर बुद्रुक नगरीत गणरायाचे आगमन मोठ्या उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात झाले. गणरायाच्या आगमनावेळी ढोल, लेझीम, सनई आणि पारंपरिक ताफ्याच्या वाद्यांचा गजर संपूर्ण गावात घुमत होता. प्रत्येकाच्या चेहऱ्यावर आनंद, उत्साह आणि भक्तिभाव दिसून येत होता. या पारंपरिक वाद्यांच्या तालावर वातावरण अक्षरशः भारावून गेले. गणरायाच्या आगमन सोहळ्यात केवळ उत्सव नव्हता, तर एकता, संस्कृती, परंपरा आणि सामूहिक अभिमानाचे दर्शन घडत होते. लहानांपासून मोठ्यांपर्यंत सर्वांनी एकत्र येऊन उत्साहाने सहभाग घेतल्यामुळे संपूर्ण वडनेर बुद्रुक गाव भक्ती आणि आनंदाने न्हाऊन निघाले. परंपरा जपली तर संस्कृती टिकते, संस्कृती टिकली तर गावाची ओळख टिकते हे या आगमन सोहळ्यात दिसून येत होते. शिवशंकर गणेश मित्र मंडळाने या आगमन सोहळ्याच्या माध्यमातून आपल्या गावच्या परंपरेचा आणि लोककलेचा जो सुंदर जागर केला, तो निश्चितच कौतुकास्पद आणि पुढील पिढीसाठी प्रेरणादायी होता.

### साई समर्थ मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटलचे शनिवारी निघोज येथे उद्घाटन



**निघोज :** पारनेर,शिरुर, जुन्नर, श्रीगोंदा तालुक्यातील रुग्णांना सोयीस्कर व त्वरित उपचार उपलब्ध होण्यासाठी निघोज या ठिकाणी साई समर्थ मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटलचे उद्घाटन शनिवारी दि.१९ रोजी सकाळी १०.३० वाजता विष्णू कदम व ठकुबाई कदम यांच्या शुभहस्ते तसेच डॉ. नारायण महाराज जाधव यांच्या प्रमुख उपस्थितीत होत असल्याची माहिती डॉ. सुनिल कदम, डॉ. अजित लंके, डॉ. पांडुरंग थोरात, डॉ. सोमेश्वर आढाव यांनी दिली आहे. यावेळी खा. डॉ निलेश लंके, आ. काशिनाथ दाते, माजी आ. पोपटराव गावडे, गीतांजली शेळके, प्रमुख डॉ. बाळासाहेब बांडे, संदीपजी निचीत, गौरव वांढेकर आदी सन्माननीय मान्यवर तसेच अहिल्यानगर व पुणे जिल्ह्यातील मान्यवर उपस्थित राहणार आहेत. २४ तास अत्यावश्यक सेवा व सर्व विभागाकडून रुग्णांची सेवा करण्यासाठी हे हॉस्पिटल सुसज्ज असून नवीन ईमारत माध्यमातून अहिल्यानगर व पुणे जिल्ह्यातील ग्रामीण भागात असे सुसज्ज हॉस्पिटल प्रथमच सर्व सोयीसुविधा माध्यमातून सुरू होत आहे. पुणे व अहिल्यानगर तसेच मुंबई येथील नामंकीत व अनुभवी वैद्यकीय सेवा देणारे डॉक्टर या ठिकाणी कायमस्वरूपी उपलब्ध होणार आहेत. या उद्घाटन कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन मुंबई येथील व्यवसायीक विष्णूशेठ कदम, ठकुबाई कदम, आदर्श सेवानिवृत्त मुख्याध्यापक उत्तमराव गोविंदराव लंके, आदर्श सेवानिवृत्त मुख्याध्यापिका कलावती सिताराम आढाव तसेच बाबासाहेब कवाद निघोज नागरी सहकारी पतसंस्थेचे उपाध्यक्ष नामदेवराव थोरात व लक्ष्मीबाई थोरात व सर्व संचालक मंडळ यांनी केले आहे.

# नगरच्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात विद्यार्थ्यांना प्रवेशास परवानगी

## खा. लंके यांच्या पाठपुराव्याला यश; २०२६-२७ या शैक्षणिक वर्षासाठी शासनाचा महत्त्वपूर्ण निर्णय

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**पारनेर :** अहिल्यानगर येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात प्रथम वर्षाच्या वैद्यकीय अभ्यासक्रमासाठी १०० विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यास महाराष्ट्र शासनाने परवानगी दिली आहे. या महाविद्यालयाच्या मान्यतेसह विद्यार्थ्यांच्या प्रवेशासाठी खासदार डॉ. नीलेश लंके यांनी सातत्याने पाठपुरावा केला होता. त्यांच्या पाठपुराव्याला यश आले असून, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाने १६ सप्टेंबर रोजी शासन निर्णय काढून प्रवेशास मान्यता दिली आहे.

अहिल्यानगर येथे १०० विद्यार्थी प्रवेश क्षमतेचे नवीन शासकीय वैद्यकीय महाविद्यालय तसेच त्यास संलग्न ४३० खाटांचे रुग्णालय सुरू करण्यास यापूर्वी केंद्र शासनाच्या मान्यतेनंतर परवानगी देण्यात आली होती. मात्र, शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी प्रथम वर्षाच्या १०० विद्यार्थ्यांच्या प्रवेशाची परवानगी प्रलंबित होती. राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोगानेही प्रथम अपील फेटाळले होते.



दरम्यान, आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालय, नवी दिल्ली यांनी १५ सप्टेंबर २०२६ रोजी दिलेल्या आदेशानुसार शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व संलग्न ४३० खाटांच्या रुग्णालयास २०२६-२७ या शैक्षणिक वर्षासाठी प्रथम वर्षात १०० विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यास परवानगी देण्यात आली. त्यानंतर राज्य शासनानेही याबाबत शासन निर्णय जारी केला. या निर्णयानुसार महाविद्यालयाची प्रवेश क्षमता १०० विद्यार्थ्यांची राहणार आहे. विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यापूर्वी महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांचे संलग्नीकरण प्राप्त करून घेणे आवश्यक आहे. तसेच केंद्र व राज्य शासनाने वेळोवेळी निश्चित केलेले नियम व मानके आणि प्रवेशाची निर्धारित कार्यपद्धती यांचे पालन करणे बंधनकारक राहणार आहे.

### आप्पासाहेब कांबळे यांना राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार प्रदान

**ामरजगाव :** कजत तालुक्याताल बाभूळगाव खालसा येथील रहिवासी आणि समर्थ माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील शिक्षक आप्पासाहेब फक्कड कांबळे सर यांना शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केल्याबद्दल 'राज्यस्तरीय आदर्श शिक्षक' पुरस्कार देऊन नुकतेच सन्मानित करण्यात आले आहे. स्विफ्ट अँड लिफ्ट मीडिया ग्रुपच्या वतीने प्रतिष्ठेचा असा समजला जाणारा हा राज्यस्तरीय डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन आदर्श शिक्षक पुरस्कार समर्थ माध्य. व उच्च माध्य. विद्यालयातील शिक्षक आप्पासाहेब फक्कड कांबळे यांना नवनाथ येवले, कविता काळे, छत्रपती शिवाजी महाराज यांचे सचिव काझी हैदर यांचे तेरावे वंशज सोहेल शमशुद्दीन शेख व निलेश साबे यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

### पाथर्डीत सुशील कम्प्युटरतर्फे बाप्पाचे उत्साहात आगमण



प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**पाथर्डी शहर :** भाद्रपद शुक्ल चतुर्थीच्या शुभमुहूर्तावर पाथर्डी शहरात लाडक्या गणरायाचे भक्तिमय वातावरणात आगमन झाले. याच पार्श्वभूमीवर पाथर्डी येथील नामांकित सुशील कम्प्युटर क्लासमध्ये श्री गणरायाच्या मूर्तीची विधीवत प्रतिष्ठापना करण्यात आली. तसेच महाराष्ट्र नॉलेज कॉर्पोरेशन लिमिटेडच्या रौप्य महोत्सवी अर्थात २५ व्या वर्षपूर्तीनिमित्त विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. धार्मिक श्रद्धेसोबतच संगणकीय शिक्षण, डिजिटल साक्षरता आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा संदेश देणाऱ्या या कार्यक्रमाला विद्यार्थी, पालक आणि मान्यवरांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. दरम्यान, अपरिहार्य कारणामुळे कार्यक्रमास प्रत्यक्ष उपस्थित राहता न आल्याने जिल्हा समन्वयक श्री. गणेश आठरे, 'निमा' संघटनेचे डॉ. श्रीधर देशमुख, डॉ. अमोल शिरसाट, प्रगतशील शेतकरी शशिकांत बोरुडे, सुनील महाजन सर, नगरसेवक बजरंग घोडके, अनिल बोरुडे, संतोष पालवे, गिरीश जातेगावकर, देवा आणि ईश्वर जावळे यांनी शुभेच्छा संदेश पाठवून कार्यक्रमाचे कौतुक केले.

# एमआयडीसीत शेती अतिक्रमणाविरोधात अखेर प्रशासनाचा दणका!

## उपअभियंत्यांना तातडीने अतिक्रमण हटविण्याचे आदेश

सर्जेराव साळवे । राष्ट्र सह्याद्री

**'राष्ट्र सह्याद्री'च्या पाठपुराव्याने प्रशासनाला जाग**

'एमआयडीसीच्या ताब्यात असलेली ६२४ एकर जमीन नेमकी कोणाच्या ताब्यात आहे?', 'शासकीय जमिनीवर अनधिकृत पिके घेण्यास परवानगी कोणी दिली?', 'वीज व बोअरवेलचा वापर कोणत्या अधिकाराने सुरू आहे?' असे ज्वलंत प्रश्न दैनिक 'राष्ट्र सह्याद्री'ने आपल्या वृत्तमालिकेतून उपस्थित केले होते. या वृत्तांकनानंतर प्रशासकीय यंत्रणेत खळबळ उडाली होती. अखेर एमआयडीसी प्रशासनाने कागदी कारवाईपुरती मर्यादा न ठेवता प्रत्यक्ष घटनास्थळी पाहणी व कारवाईचे आदेश दिल्याने या प्रकरणाला आता निर्णायक वळण मिळाले आहे.

**बेलवंडी :** श्रीगोंदा तालुक्यातील लोणीव्यंकनाथ शिवारातील पार्वतवाडी व पिसोरे बुद्रुक परिसरातील प्रस्तावित औद्योगिक वसाहतीच्या जमिनीवरील अनधिकृत शेती, अतिक्रमण आणि बेकायदेशीर वीज वापराच्या गंभीर प्रकरणाची अखेर महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने (एमआयडीसी) दखल घेतली आहे. दैनिक 'राष्ट्र सह्याद्री'ने सातत्याने केलेल्या रोखठोक वृत्तांकन व पाठपुराव्यानंतर प्रशासनाने प्रत्यक्ष घटनास्थळी जाऊन पाहणी करून कारवाई करण्याचे लेखी आदेश जारी केले आहेत.




एमआयडीसीच्या अहिल्यानगर प्रादेशिक कार्यालयाच्या प्रादेशिक अधिकाऱ्यांनी स्थापत्य उपविभागाच्या उपअभियंत्यांना दिनांक १७ सप्टेंबर २०२६ रोजी पत्राद्वारे तातडीच्या कारवाईचे निर्देश दिले आहेत.

श्रीगोंदा तालुक्यातील लोणीव्यंकनाथ पार्वतवाडी, पिसोरे बुद्रुक व परिसरात औद्योगिक विकासासाठी राखीव असलेल्या सुमारे ६२४ एकर शासकीय जमिनीचा प्रश्न गेल्या काही दिवसांपासून चर्चेत आहे. एमआयडीसीच्या ताब्यात जमीन हस्तांतरित होऊन दोन वर्षांचा कालावधी उलटला असतानाही काही भागात अनधिकृत शेती सुरू असल्याच्या तक्रारी समोर आल्या होत्या.

जवळपास १०० एकर क्षेत्रात ऊस, डाळिंब, पपई यांसह विविध पिकांची लागवड करण्यात आल्याचा आरोप करण्यात आला होता. तसेच बोअरवेल व वीज कनेक्शनचा अनधिकृत वापर होत असल्याच्या तक्रारींमुळे प्रशासनाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले होते.

प्रशासनाने आदेश दिल्यानंतर आता प्रत्यक्षात अतिक्रमण हटविण्याची कारवाई कधी सुरू होते, अनधिकृत वीज जोडण्या कोणाच्या नावावर आहेत, तसेच शासकीय जमिनीचा गैरवापर करणाऱ्यांवर कोणती कायदेशीर कारवाई केली जाते, याकडे परिसरातील नागरिकांचे लक्ष लागले आहे.

**आदेशात नेमके काय?**

महामंडळाच्या औद्योगिक क्षेत्रातील जमिनीवर अनधिकृत शेतीचे अतिक्रमण व बेकायदेशीर वीज जोडणीबाबत प्राप्त तक्रारींची घटनास्थळी जाऊन तातडीने पडताळणी करावी. पाहणीदरम्यान अतिक्रमण झाल्याचे निदर्शनास आल्यास ते तातडीने हटविण्याची कारवाई करावी. बेकायदेशीर वीज कनेक्शन आढळल्यास ते तत्काळ खंडित करून संबंधित प्रकरणात नियमानुसार कारवाई करावी. घटनास्थळी केलेल्या पाहणी व कारवाईचा सविस्तर अहवाल वरिष्ठ कार्यालयाकडे सादर करण्याचेही निर्देश देण्यात आले आहेत.

### जामखेडमध्ये भर उन्हात पावसासाठी मुस्लिम बांधवांची सामूहिक नमाज अन् दूआ

**आम्ही माणसं चुकलो; पशु पक्षी मुक्या प्राण्यांवर दया कर! पाऊस दे !**

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**जामखेड :** जमीन तापली ,पिकं वाळली,तलाव ,नदी नाले सुकले, पाण्यासाठी आभाळाकडे नजरा लागल्या ... हे आल्लाह! आम्ही माणसं चुकीचे वागत आहोत .आम्हाला माफ कर ,मुक्या प्राण्यांवर दया कर ,पाऊस दे ....! अशी आर्त दुआ पावसासाठी करण्यात आली .

राज्यातील अनेक भागांत पावसाने ओढ दिल्याने शहरासह ग्रामीण भागातील नागरिक चिंतेत सापडले आहेत. पावसाअभावी शेतीपिकांवर जनावरांवर पाण्याचे संकट निर्माण झाले .पावसासाठी जामखेड शहरात मुस्लिम बांधवांनी पावसासाठी सामूहिक नमाज आणि प्रार्थनेचा आधार घेतला आहे. जामखेड नगर रोडवरील मदरसा मैदानावर 'नमाज -ए-इस्तिस्का' आणि विशेष दुआ चे आयोजित करण्यात आले होते. पावसासाठी करण्यात येणाऱ्या या सामूहिक प्रार्थनेत मौलाना , लहान मुलं, ज्येष्ठ नागरिक, सर्व क्षेत्रातील मुस्लिम बांधव मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. पावसासाठी करण्यात आलेल्या या प्रार्थनेदरम्यान सर्वजण अत्यंत आर्ततेने अल्लाहकडे याचना करताना दिसून आले. हे परवरदिगार,



रहमत की बारीश आता फरमा आणि आम्हा सर्वांना या संकटातून वाचव, अशी सामूहिक प्रार्थना यावेळी करण्यात आली. पावसाने दडी मारल्याने शेतकरी,व्यापारी व समस्त नागरिकांच्या जनजीवनावर त्याचा परिणाम जाणवत आहे. अशा परिस्थितीत मुस्लिम बांधवांनी पावसासाठी केलेली ही सामूहिक प्रार्थना धार्मिक सलोखा आणि निसर्गाविषयीची सामूहिक आर्तता अधोरेखित करणारी ठरत आहे. आता वरुणराजाने कृपा करावी आणि जामखेडसह संपूर्ण राज्यात दमदार पाऊस पडून शेतकरी व नागरिकांना दिलासा मिळावा, अशी भावना या सामूहिक दुआमधून व्यक्त करण्यात आली.पावसासाठी सलग तीन दिवस चालणाऱ्या या सामूहिक नमाज आणि दुआचा पहिला दिवस होता गुरूवारी सकाळी ९.३० वाजता तर शुक्रवारी दुपारी नमाज आणि दूआ होणार आहे. तरी सर्व बांधवांनी सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# समान काम, समान वेतनाच्या मागणीसाठी न्यायालयीन कर्मचाऱ्यांचे काळ्याफिती आंदोलन

## वेतनवाढीचा प्रस्ताव दीर्घकाळ प्रलंबित; बेमुदत संपाचा इशारा

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**शासनाकडून मागण्यांबाबत सकारात्मक निर्णय न झाल्यास आंदोलन अधिक तीव्र करण्यात येणार आहे.**

१६ व १७ ऑक्टोबर : काळ्याफिती लावून कामकाज

५ नोव्हेंबर : सामूहिक रजा आंदोलन

१७ नोव्हेंबरपासून : मागण्यांची दखल न घेतल्यास बेमुदत संप

वेतनवाढीचा प्रस्ताव तातडीने निकाली काढावा आणि प्रलंबित मागण्यांबाबत सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी मागणी अहमदनगर जिल्हा न्यायालयीन कर्मचाऱ्यांनी केली आहे.

**अहिल्यानगर :** समान काम, समान वेतनाच्या मागणीसह न्यायालयीन कर्मचाऱ्यांचा वेतनवाढीचा प्रस्ताव राज्य सरकारकडे दीर्घकाळ प्रलंबित असल्याच्या निषेधार्थ महाराष्ट्र राज्य न्यायालयीन कर्मचारी महासंघाच्या वतीने आंदोलनाचा पहिला टप्पा सुरू करण्यात आला. या आंदोलनांतर्गत अहिल्यानगर जिल्हा न्यायालयातील कर्मचाऱ्यांनी काळ्याफिती लावून दिवसभर कामकाज केले.

उच्च न्यायालयातील कर्मचाऱ्यांना लागू असलेल्या वेतनश्रेणीप्रमाणे दुय्यम न्यायालयातील कर्मचाऱ्यांनाही समान वेतन देण्यात यावे, अशी मागणी करण्यात आली. शासनाने या मागणीची गांभीर्याने दखल घेऊन वेतनवाढीच्या प्रस्तावाला मंजुरी द्यावी. अन्यथा आंदोलन अधिक तीव्र करण्यात येईल, असा इशारा महाराष्ट्र राज्य न्यायालयीन कर्मचारी महासंघाने दिला आहे.

यावेळी अहमदनगर जिल्हा न्यायालयीन कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष अंकुश सांगळे, कार्याध्यक्ष शिरीष ढाळे, सचिव आनंद सोनपसारे, उपाध्यक्ष रवींद्र सूर्यपुजारी अधीक्षक डी,बी शिंदे



सहाय्यक अधीक्षक श्रीपाद माचवे बी डी शिंदे संगीता कोल्हे अरुण शिंदे सविता भालेराव बद्रीनाथ गुंजाळ वैशाली बोऱ्हाडे जया गुप्ता केशव गपाट परमजीत मंताला यांच्यासह न्यायालयीन कर्मचारी काळ्याफिती लावून आंदोलनात सहभागी झाले होते.

राज्यातील दुय्यम न्यायालयातील कर्मचाऱ्यांचा वेतनवाढीचा प्रस्ताव शासनाकडे २०२५ पासून प्रलंबित आहे. या पार्श्वभूमीवर कर्मचाऱ्यांच्या विविध मागण्यांसाठी आंदोलनाची दिशा निश्चित करण्यात आली आहे.

या संदर्भात मुंबई येथे १६ ऑगस्ट रोजी झालेल्या बैठकीत चारही महासंघांनी एकत्रितपणे आंदोलन करण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार आंदोलनाच्या पहिल्या टप्प्यात न्यायालयीन कर्मचाऱ्यांनी काळ्याफिती लावून कामकाज केले. वेतनवाढीच्या प्रस्तावाला शासनाने सकारात्मक निर्णय घेऊन मंजुरी द्यावी, अशी अपेक्षा कर्मचाऱ्यांनी व्यक्त केली. प्रलंबित मागण्यांबाबत शासनाने तातडीने निर्णय घेऊन न्यायालयीन कर्मचाऱ्यांना दिलासा द्यावा, अशी मागणी करण्यात आली.

# हिंजवडीतील रस्त्यांच्या कामांना १ डिसेंबरपासून सुरुवात

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**पुणे :** हिंजवडी, मान आणि मारुंजी परिसरातील वाहतूक कोंडी व पायाभूत सुविधांच्या प्रश्नांवर कायमस्वरूपी उपाययोजना करण्यासाठी प्रशासनाने रस्ते विकासाला गती देण्याचा निर्णय घेतला आहे. रस्त्यांसाठी आवश्यक भूसंपादनाची ६० ते ७० टक्के प्रक्रिया १५ ऑक्टोबरपर्यंत पूर्ण करून १ डिसेंबरपासून प्रत्यक्ष कामांना सुरुवात करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्या बैठकीस आमदार शंकर मांडेकर, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे महानगर आयुक्त डॉ. अभिजित चौधरी, निवासी उपजिल्हाधिकारी ज्योती कदम यांच्यासह विविध विभागांचे



अधिकारी उपस्थित होते.हिंजवडी आयटी परिसरातील वाहतूक सुरळीत करण्यासाठी सहा प्रमुख रस्ते निश्चित करण्यात आले आहेत. या रस्त्यांसाठी भूसंपादन, आखणी आणि निविदा प्रक्रियेसाठी सल्लागार नियुक्तीची प्रक्रिया अंतिम टप्प्यात आहे. शेतकरी व जमीनमालकांकडून ६० ते ७० टक्के जमिनीची संमती आणि आगाऊ ताबा मिळाल्यानंतर निविदा प्रक्रिया तातडीने सुरू करण्याचे नियोजन आहे. मान, मारुंजी आणि हिंजवडी परिसरातील जमीनमालकांना भूसंपादन, हस्तांतरणीय विकास हक्क, निवासी वापराचे नियम आणि मिळणाऱ्या लाभांची माहिती देण्यासाठी गावनिहाय मार्गदर्शन शिबिरे घेण्यात येणार आहेत. प्रशासनाच्या अधिकाऱ्यांनी नागरिकांशी थेट संवाद साधून त्यांच्या शंकांचे निरसन करण्याच्या सूचना देण्यात आल्या.

सहा प्रमुख रस्त्यांव्यतिरिक्त विप्रो चौक, पुनवळे-मारुंजी जोडरस्ता आणि कालव्यालगतच्या रस्त्यांचीही पाहणी करण्यात येणार आहे. सिंचन विभागाच्या ताब्यातील जमिनींच्या वापराबाबतचा प्रस्ताव ३० सप्टेंबरपर्यंत तयार करून मंजुरीसाठी पाठविण्याचे नियोजन आहे.

दरम्यान, हिंजवडी परिसरातील सांडपाणी नदीत जाणार नाही याची दक्षता घेण्याचे निर्देश देण्यात आले. सांडपाणी प्रक्रिया केंद्रांच्या कामांना गती देण्यासह नियमांचे उल्लंघन करणाऱ्या प्रकल्पांवर महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत कारवाई करण्याची सूचना देण्यात आली.

भूमकर चौक, रावेतसह प्रमुख चौकांवरील वाहतूक कोंडी दूर करण्यासाठी रस्ते रुंदीकरण, खड्डे बुजविणे आणि वाहतुकीतील अडथळे दूर करण्यावर भर देण्यात आला. पाणीपुरवठा, रस्ते रुंदीकरणासाठी आवश्यक जमिनीचा मोबदला आणि इतर पायाभूत सुविधांबाबतही संबंधित विभागांनी समन्वयाने कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात आल्या.

## चाकणमधील वाहतूक कोंडीवर कृती आराखडा

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**चाकण :** चाकण परिसरातील वाढती वाहतूक कोंडी, औद्योगिक वाहनांची वर्दळ, रस्त्यांवरील खड्डे आणि अनधिकृत वाहनतळांच्या प्रश्नांवर कायमस्वरूपी उपाययोजना करण्यासाठी विविध विभागांनी समन्वयाने कृती आराखडा तयार करून त्याची टप्प्याटप्प्याने अंमलबजावणी करावी, असे निर्देश जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयात चाकण परिसरातील रस्ते व वाहतूक व्यवस्थेबाबत उच्चस्तरीय आढावा बैठक झाली. बैठकीस आमदार बाबाजी काळे, निवासी उपजिल्हाधिकारी ज्योती कदम यांच्यासह सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, वाहतूक पोलिस, स्थानिक प्रशासनाचे अधिकारी आणि नागरिक उपस्थित होते.चाकण, तळेगाव, बोराटे वस्ती आणि भोसरी परिसरातील जोडरस्त्यांवरील खड्डे तातडीने बुजवून वाहतूक सुरळीत करावी. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या प्रलंबित कामांना प्राधान्य देऊन ती निर्धारित कालावधीत पूर्ण करावीत, तसेच जिल्हा परिषदेच्या अखत्यारीतील रस्त्यांचीही आवश्यक दुरुस्ती करावी, अशा सूचना देण्यात आल्या.

प्रमुख चौकांतील वाहतूक नियोजनासाठी स्वतंत्र सर्वेक्षण करून सुधारित आराखडा तयार करावा. वाहतूक नियंत्रणासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित तंत्रज्ञानाचा वापर करावा. निरीक्षण कॅमेऱ्यांच्या माध्यमातून वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई करण्याचे निर्देशही देण्यात आले.

रस्त्यांवरील अनधिकृत वाहनतळ हटविण्यासाठी टोईंग वाहनांचा वापर करून दंडात्मक कारवाई करावी. औद्योगिक कंपन्यांनी त्यांच्या वाहनांसाठी स्वतंत्र वाहनतळ अथवा थांबा व्यवस्था करावी. चाकण-शिक्रापूर मार्गावरील कामांपूर्वी वाहतूक नियोजन करून जड वाहनांसाठी पर्यायी मार्ग निश्चित करावा. रस्ते कामांच्या ठिकाणी सुरक्षिततेच्या उपाययोजना, दिशादर्शक फलक आणि वाहतूक मार्गांचे नकाशे लावावेत, अशा सूचनाही डुडी यांनी दिल्या.

अतिक्रमण हटविल्यानंतर विद्युत खांब व तारा हलविण्याची कामे महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, सार्वजनिक बांधकाम विभाग आणि राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने समन्वयाने तातडीने पूर्ण करावीत. प्रत्येक विभागाने कामांची कालमर्यादा व जबाबदारी निश्चित करून प्रगतीचा नियमित आढावा घ्यावा, असेही जिल्हाधिकाऱ्यांनी सांगितले.

## गणेशोत्सवात पुण्यात वाहतुकीत बदल

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**पुणे :** गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर शहरातील वाढती गर्दी लक्षात घेऊन वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी पुणे शहर वाहतूक शाखेने १८ ते २५ सप्टेंबरदरम्यान आवश्यकतेनुसार विविध मार्गांवर वाहतुकीत तात्पुरते बदल केले आहेत. काही मार्गांवर वाहतूक बंद, तर काही मार्गांवर एकेरी वाहतूक तात्पुरती दुहेरी करण्यात येणार आहे. सहा प्रमुख मार्गांवर दोन्ही बाजूंना 'नो पार्किंग' लागू करण्यात आले आहे.

१८ सप्टेंबर रोजी लक्ष्मी रस्त्यावरील हमजेखान चौक ते सेवासदन चौक, शिवाजी रस्त्यावरील गाडगीळ पुतळा ते रामेश्वर चौक आणि आप्पा बळवंत चौक ते मोती चौक या मार्गांवरील वाहतूक बंद राहणार आहे. वाहनचालकांनी डुल्या मारुती चौक, महाराणा प्रताप रस्ता, शंकरशेठ रस्ता, जे. एम. रस्ता, अलका चौक, टिळक रस्ता, शास्त्री रस्ता तसेच बाजीराव रस्त्याचा पर्यायी मार्ग म्हणून वापर करावा.

१८ ते २५ सप्टेंबरदरम्यान दररोज सायंकाळी पाच वाजल्यापासून गर्दी संपेपर्यंत परिस्थितीनुसार लक्ष्मी, शिवाजी आणि बाजीराव रस्त्यासह सिंहगड गॅरेज, हिराबाग, सणस रस्ता, गंजपेठ, गावकसाब मशीद, कोहिनूर चौक आदी परिसरातील विविध मार्गांवरील वाहतूक बंद किंवा पर्यायी मार्गाने वळविण्यात येणार आहे.

पादचाऱ्यांची गर्दी वाढल्यास कुमठेकर रस्ता, फडके हौद रस्ता, नाईक रस्ता आणि एम. जी. रस्त्यावरील काही मार्गांवरील एकेरी वाहतूक आवश्यकतेनुसार तात्पुरती दुहेरी करण्यात येणार आहे.

शिवाजी रस्ता, बाजीराव रस्ता, आप्पा बळवंत चौक ते मोती चौक, टिळक रस्ता आणि शास्त्री रस्त्याच्या काही भागात दोन्ही बाजूंना 'नो पार्किंग' लागू करण्यात आले आहे. अग्निशमन वाहने, पोलिस वाहने आणि रुग्णवाहिका यांना निर्बंधातून वगळण्यात आले आहे.

गर्दी वाढल्यास संबंधित मार्गावरील वाहतूक बंद करून पर्यायी मार्गाने वळविण्यात येणार असल्याने नागरिकांनी वाहतूक बंद असलेल्या मार्गावर वाहने न आणता पर्यायी मार्गांचा वापर करावा, असे आवाहन पुणे शहर वाहतूक शाखेने केले आहे.

## प्रधानमंत्री विश्वकर्मा योजनेच्या लाभार्थ्यांना प्रमाणपत्र, कर्जपत्र व टूलकिट

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**पुणे :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त प्रधानमंत्री विश्वकर्मा योजनेअंतर्गत पुणे जिल्ह्यातील पात्र लाभार्थ्यांना प्रमाणपत्र, ओळखपत्र, कर्ज मंजुरीपत्र आणि टूलकिटचे वितरण करण्यात आले. निवासी उपजिल्हाधिकारी ज्योती कदम यांच्या हस्ते लाभार्थ्यांचा सन्मान करण्यात आला.




जिल्हाधिकारी कार्यालयात महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळाच्या वतीने आयोजित लाभार्थी मेळाव्यास उपायुक्त अर्चना कोठारी, जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी रमेश सुरुंग, अधीक्षक समीर महाजन, जिल्हा अग्रणी बँक अधिकारी योगेश पाटील, जिल्हा कौशल्य विकास अधिकारी सुरेश वऱ्हाडे, राज्य समन्वय अधिकारी अभय रावेतकर यांच्यासह अधिकारी व सुकाणू समितीचे सदस्य उपस्थित होते.

हातकागद संस्था संचालक अमर राऊत यांनी मंडळाच्या कार्याची माहिती देताना ग्रामोद्योग क्षेत्राचे आर्थिक विकासातील महत्त्व स्पष्ट केले. प्रधानमंत्री विश्वकर्मा योजनेच्या अंमलबजावणीत खादी व ग्रामोद्योग मंडळ नोडल एजन्सी म्हणून कार्यरत असून, महाराष्ट्र देशात दुसऱ्या क्रमांकावर असल्याचे त्यांनी सांगितले.

पारंपरिक कारागीर व हस्तकला व्यावसायिकांना कौशल्य प्रशिक्षण, आधुनिक टूलकिट, कर्ज सुविधा आणि बाजारपेठ उपलब्ध करून देऊन आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी योजना राबविण्यात येत आहे. यावेळी लाभार्थ्यांना योजनेतील विविध सुविधांची माहिती देण्यात आली. रश्मी रविंद्र देसाई आणि तानाजी आवारे यांना प्रमाणपत्र देऊन प्रत्येकी एक लाख रुपयांच्या मंजूर कर्जाचे मंजुरीपत्र देण्यात आले. लता ढोरे, विनोद थोरात, अनिल रसाळ, स्वर्णा जाधव, विठ्ठबा बोरकर, विठ्ठल सदाशिव पवार आणि प्रवीण हमीन नदाफ यांना प्रमाणपत्र व ओळखपत्र देण्यात आले. रेखा प्रेम भुटाणा यांना एक लाख रुपयांच्या कर्जाचे मंजुरीपत्र देण्यात आले.

जिल्ह्यात ८ हजार ६७४ अर्ज जिल्हा समितीने पात्र ठरवून शिफारस केली आहे. त्यापैकी ७ हजार ६८६ अर्ज प्राथमिक प्रशिक्षणासाठी पाठविण्यात आले असून, ६ हजार २९६ लाभार्थ्यांचे प्रशिक्षण पूर्ण झाले आहे. आतापर्यंत ३ हजार ६१७ लाभार्थ्यांना टूलकिटचे वाटप करण्यात आले आहे.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अनंत कदम यांनी केले. राज्य समन्वय अधिकारी रविंद्र शेवते यांनी आभार मानले.

## शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या स्वप्नांना दिशा द्यावी : विजय कोलते

माळशिरस : ग्रामीण व दुर्गम भागातील विद्यार्थ्यांमध्ये गुणवत्तेची कमतरता नाही. त्यांच्या कल्पनाशक्तीला योग्य दिशा देऊन स्वप्नांना आकार देणे महत्त्वाचे आहे. ज्ञानदानाबरोबरच विद्यार्थ्यांमध्ये चांगले विचार, राष्ट्रप्रेम, जबाबदारीची जाणीव, संवेदनशीलता आणि समतावादी विचार रुजविण्याचे कार्य शिक्षकांनी करावे, असे प्रतिपादन आचार्य अत्रे विकास प्रतिष्ठान, पुरंदरचे अध्यक्ष विजय कोलते यांनी केले. आचार्य अत्रे विकास प्रतिष्ठान, पुरंदर यांच्या वतीने शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या प्राथमिक, माध्यमिक व महाविद्यालयीन स्तरावरील शिक्षकांचा विशेष पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला. प्रतिष्ठानच्या सासवड-पिसर्वे रोड येथील सभागृहात हा सोहळा झाला. कै. अनुसयाबाई कृष्णाजी जगताप, कै. नारायण कृष्णाजी जगताप, कै. गुणाबाई नारायण जगताप आणि कै. सुमन हनुमंत जाधव यांच्या स्मरणार्थ कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रतिष्ठानचे सचिव शांताराम पोमण यांनी केले. त्यांनी प्रतिष्ठानच्या सामाजिक व शैक्षणिक उपक्रमांचा आढावा घेत शिक्षकांच्या योगदानाचे महत्त्व स्पष्ट केले.

यावेळी मराठी विभाग प्रमुख, शंकरराव भेलके महाविद्यालय, नसरापूर – प्रा. डॉ. जगदीश दिनकर शेवते, न्यू इंग्लिश स्कूल, जेऊर – प्रशांत रमेश जगताप, प्राथमिक शाळा, कोंढकेवाडी – संदीप रामचंद्र कुंभार, प्राथमिक शाळा, सिदोबाची वाडी – मायादेवी विभीषण जाधव आणि सावित्रीबाई फुले शाळा क्रमांक २, नगरपालिका सासवड – संगीता प्रमोद म्हेत्रे यांचा उत्कृष्ट कार्याबद्दल गौरव करण्यात आला.

## स्वच्छता अभियानात ४५० जणांचे श्रमदान

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**आळंदी :** स्वच्छ भारत अभियान २.०, स्वच्छ महाराष्ट्र अभियान नागरी, स्वच्छ सर्वेक्षण २०२६ आणि माझी वसुंधरा अभियान ७.० अंतर्गत 'स्वच्छता ही सेवा २०२६' महास्वच्छता अभियानाचा शुभारंभ सिद्धबेट येथे करण्यात आला. या अभियानात विद्यार्थी, सामाजिक संस्थांचे प्रतिनिधी आणि आळंदी नगरपरिषद कर्मचाऱ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेत श्रमदान केले.




अभियानात सात शैक्षणिक व सामाजिक संस्थांमधील ३७० विद्यार्थी व प्रतिनिधी, तसेच आळंदी नगरपरिषदेचे ८० कर्मचारी असे एकूण ४५० जण सहभागी झाले. सिद्धबेट परिसरात स्वच्छता करून विद्यार्थ्यांनी स्वच्छतेचा संदेश दिला.

ज्ञानसाई शाळेचे ४५, महात्मा फुले शिक्षण संस्थेचे १५, नगरपरिषद शाळा क्रमांक १ चे ११०, दुरपे विद्यालयाचे ३०, ध्यास फाउंडेशनचे २०, ज्ञानेश्वर विद्यालयाचे ८० आणि ज्ञानगंगा संस्थेचे ७० विद्यार्थी व प्रतिनिधी सहभागी झाले.आळंदी नगरपरिषद मुख्याधिकारी माधव खांडेकर यांनी स्वच्छ व सुंदर आळंदीच्या निर्मितीसाठी नागरिकांनीही स्वच्छता मोहिमेत सहभागी होण्याचे आवाहन केले.

# दखल

## सायबर फसवणुकीपासून सावध राहा

**पुणे :** गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर शासनाच्या योजना आणि नागरिकांच्या सुरक्षिततेबाबत जनजागृती करण्यासाठी राबविण्यात येत असलेल्या 'लोकसंवाद-२०२६' उपक्रमांतर्गत तुळशीबाग गणेश मंडळासमोर नागरिकांना सायबर सुरक्षेबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

सायबर पोलिस उपनिरीक्षक योगिता कुदळे यांनी मोबाईल चोरी, ऑनलाइन फसवणूक आणि शेअर बाजारातील गुंतवणुकीच्या नावाखाली होणाऱ्या फसवणुकीपासून नागरिकांनी सावध राहण्याचे आवाहन केले. मोबाईल हरवल्यास विलंब न करता संबंधित यंत्रणेकडे ऑनलाइन तक्रार नोंदवून आवश्यक ती कायदेशीर कार्यवाही करावी, असे त्यांनी सांगितले.शेअर बाजारातील गुंतवणूक, प्रशिक्षण किंवा अधिक परताव्याचे आमिष दाखवून नागरिकांना 'फेसबुक', 'टेलिग्राम' आणि 'व्हॉट्सॲप'वरील बनावट ग्रुपमध्ये सहभागी करून घेण्याचे प्रकार वाढले आहेत. अशा अनोळखी ग्रुपमध्ये सहभागी होऊ नये.

मोठा आर्थिक लाभ मिळवून देण्याचे आमिष दाखविणाऱ्या व्यक्ती, संदेश किंवा लिंकवर विश्वास ठेवू नये, असेही कुदळे यांनी सांगितले.ऑनलाइन व्यवहारातील गोपनीय संकेतांक, बँक खात्याची माहिती किंवा अन्य संवेदनशील माहिती अनोळखी व्यक्तींना देऊ नये. फसवणूक झाल्यास तातडीने संबंधित यंत्रणेशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले.यावेळी तुळशीबाग गणपती मंडळाचे अध्यक्ष विकास पवार तसेच मंडळाचे सदस्य उपस्थित होते.

## नियमबाह्य नंबर प्लेट, काळ्या फिल्मविरोधात आरटीओची कारवाई

**पिंपरी-चिंचवड :** प्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या वतीने १ ते १५ सप्टेंबरदरम्यान वाहनांची विशेष तपासणी मोहीम राबविण्यात आली. नियमबाह्य नंबर प्लेट, काळी फिल्म, एचएसआरपी नंबर प्लेट नसलेली वाहने तसेच इतर राज्यांत नोंदणीकृत ट्रॅव्हल्स बसेसवर कारवाई करण्यात आली.

मोहिमेत एकूण ३९५ चलन करण्यात आले. त्यापैकी १६७ चलनांचा भरणा झाला असून, ८ लाख ९ हजार २७० रुपये दंड वसूल करण्यात आला. काळ्या फिल्मप्रकरणी १६ चलनांपैकी सहा चलनांचा भरणा होऊन तीन हजार रुपये, एचएसआरपी नसलेल्या वाहनांवर २७५ चलनांपैकी १०६ चलनांचा भरणा होऊन एक लाख आठ हजार रुपये दंड वसूल करण्यात आला.

फॅन्सी अथवा नियमबाह्य नोंदणी क्रमांकाच्या ५९ चलनांपैकी ३२ चलनांचा भरणा होऊन २० हजार ५०० रुपये, तर इतर राज्यांतील नोंदणीकृत ट्रॅव्हल्स बसेसच्या ४५ चलनांपैकी २३ चलनांचा भरणा होऊन ६ लाख ७७ हजार ७७० रुपये दंड वसूल करण्यात आला.

वाहनमालकांनी नियमबाह्य नंबर प्लेट व काळी फिल्म काढून शासनाच्या नियमानुसार एचएसआरपी नंबर प्लेट बसवावी. तसेच वाहनाच्या मूळ रचनेत किंवा सुरक्षा मानकांमध्ये अनधिकृत बदल करू नयेत. नियमांचे उल्लंघन आढळल्यास मोटार वाहन कायद्यानुसार दंडात्मक कारवाई करण्यात येईल, असे उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, प्रादेशिक परिवहन कार्यालय, पिंपरी-चिंचवड यांनी कळविले आहे.

## स्वाधार योजनेच्या नूतनीकरणासाठी ३० सप्टेंबरपर्यंत मुदतवाढ

**पुणे :** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेअंतर्गत २०२५-२६ या शैक्षणिक वर्षात लाभ घेतलेल्या विद्यार्थ्यांना २०२६-२७ या शैक्षणिक वर्षासाठी नूतनीकरण अर्ज सादर करण्यासाठी ३० सप्टेंबरपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. यापूर्वी अर्ज सादर करण्याची अंतिम मुदत १५ सप्टेंबर होती.अद्याप नूतनीकरण अर्ज न केलेल्या पात्र विद्यार्थ्यांनी विहित मुदतीत ऑनलाइन अर्ज सादर करावा. यासाठी महाआयटीच्या स्वाधार योजना वेब पोर्टलवर अर्ज करता येणार आहे. मुदतवाढीचा लाभ घेऊन विद्यार्थ्यांनी ३० सप्टेंबरपूर्वी अर्ज पूर्ण करावा, असे आवाहन समाज कल्याण विभागाचे सहायक आयुक्त विशाल लोंढे यांनी केले आहे.

## ऑटोरिक्षा मीटर तपासणीचे काम काज १८ ते २० सप्टेंबरदरम्यान बंद

**पुणे :** प्रादेशिक परिवहन प्राधिकरण, पुणे यांच्या मान्यतेनुसार पुणे, पिंपरी-चिंचवड आणि बारामती कार्यक्षेत्रातील ऑटोरिक्षांसाठी सुधारित भाडेदर १ सप्टेंबर २०२६ पासून लागू करण्यात आले आहेत. या अनुषंगाने कॅलिब्रेशन झालेल्या ऑटोरिक्षांच्या मीटर तपासणीचे कामकाज कर्वेनगर येथील अलंकार पोलीस ठाण्यासमोर सुरू आहे.

मीटर तपासणीचे कामकाज सोमवार ते शुक्रवार सकाळी ८ ते १० या वेळेत, तर शनिवारी सकाळी ८ ते दुपारी ४ या वेळेत करण्यात येते. प्रत्येक रविवारी मीटर तपासणीचे कामकाज बंद असते.दरम्यान, ज्येष्ठ गौरी सणानिमित्त शुक्रवार, दि. १८ सप्टेंबर ते रविवार, दि. २० सप्टेंबर २०२६ या कालावधीत ऑटोरिक्षा मीटर तपासणीचे कामकाज बंद राहणार आहे. त्यानंतर नियोजित वेळेनुसार तपासणीचे कामकाज सुरू राहील, अशी माहिती उप प्रादेशिक परिवहन अधिकारी स्वप्निल भोसले यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली आहे.

## तडीपार आदेशाचा भंग; आरोपीविरुद्ध गुन्हा

**निरगुडसर :** तडीपार आदेशाचा भंग करून पुणे जिल्ह्यात प्रवेश केल्याप्रकरणी मंचर पोलिसांनी तुषार अजय तोडकर वय २६, रा. पेठ, ता. आंबेगाव याच्याविरुद्ध महाराष्ट्र पोलिस कायदा कलम १४२ अन्वये गुन्हा दाखल केला.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तुषार तोडकर याच्याविरुद्ध यापूर्वी मंचर पोलिस ठाण्याच्या हद्दीत कारवाई करण्यात आली होती. जुन्नर-आंबेगाव उपविभागीय अधिकारी कार्यालयाच्या आदेशानुसार त्याला ४ फेब्रुवारी २०२६ पासून एक वर्षासाठी पुणे जिल्ह्यातून, बारामती वगळून, तडीपार करण्यात आले होते.

दरम्यान, ११ सप्टेंबर रोजी सकाळी साडेअकराच्या सुमारास तुषार तोडकर कोणतीही पूर्वपरवानगी न घेता पेठ येथे कुटुंबीयांना भेटण्यासाठी आल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानुसार पोलिसांनी पेठ परिसरात शोध घेतला असता तो वाकेश्वर विद्यालय परिसरात आढळून आला. चौकशीत त्याने पुणे जिल्ह्यात प्रवेश करण्यासाठी सक्षम अधिकाऱ्यांची पूर्वपरवानगी घेतली नसल्याचे सांगितल्याचे तक्रारीत नमूद आहे.तडीपार आदेशाचा भंग केल्याप्रकरणी त्याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून, पोलीस हवालदार औटी पुढील तपास करीत आहेत.

## पुरंदर तालुक्यात पूर्व भागात गौराईचे जोरदार स्वागत महीला

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**माळशिरस :** गणपतीची बाप्पाची स्थापना झाल्यानंतर महीला वर्गाचे श्रद्धास्थान असणाऱ्या गौराईची वाजत गाजत आज स्थापना करण्यात आली. त्यांच्या अगमनाने संपूर्ण महीला वर्गामध्ये उत्साही वातावरण निर्माण झाले आहे.

पुरंदर तालुक्यात दरवर्षीच गणपती उत्सव व गौराई स्थापना उत्साहात केली जिथे.शेतकरी महीला शेतातील कामे पाहुनसकाळी किंवा संध्याकाळी गौराई उत्सवाची तयारी करतात.गेल्या आठवड्यापासुन घराची साफसफाई व रंगरंगोटी करण्यात व्यस्त आहेत.घरातील जागेवरती छोटासा मंडप तयार करण्यात आला.बाजारातुन गौराईचे वेगवेगळे आकर्षक मुखवटे खरेदी करणे, चांगले दागीणे तयार करणे, आकर्षक सजावट साहीत्यांची खरेदी करणे, विद्धुत साहीत्याची खरेदी गेली महीनाभर करतात. प्रसाद म्हणुन दिवाळीतील गोड पदार्थांची तयारी करतात.पुरंदर तालुक्यात गणपतीचे उत्साही वातावरण स्वागत करुन स्थापना करण्यात आली.त्यानंतर आज असंख्य महीलांच्या उपस्थितीत गौराईचे आगमन झाले.यासाठी गणपतीची स्थापना करताना गौराईसाठी राखीव जागा ठेवण्यात येते. घरासमोरील आंगणात गौराईची सजावट करुन पुजा करण्यात आली. वाजतगाजत महीलांच्या उपस्थितीत गणपतीच्या मंडपात गौराईची स्थापना करण्यात आली. विधिवत पुजा करण्यात आली.

१- सनब्राईट इंग्लिश स्कूलच्या मुख्याध्यापिका शितल चव्हाण म्हणाल्या कि सुख समृद्धीचा व आनंदाचा वारसा घेऊन गौराई आजच्या दिवशी आपल्या माहेरी सणासाठी येत असतात. माहेरी दोन दिवसाच्या माहेरपणासाठी येतात. घरात सुख समृद्धी, धन्यप्राप्ती व संतान प्राप्ती प्राप्त होते अशी पूर्वांपार समज आहे. काही ठिकाणी आपल्या लेकीला माहेराकडून हा वारसा दान दिला जातो.



पुरंदर तालुक्यातील नायगाव येथील मुख्याध्यापिका शितल चव्हाण यांच्या घरातील गौराई सजावट .

# तरुणांच्या श्रमदानातून डोंगरगण शाळेला 'नवा रंग'

## लोकसहभागातून 'डिजिटल' झेप !

**शशिकांत पवार । राष्ट्र सह्याद्री**

**नगर तालुका :** लोकसहभाग, तरुणांचे श्रमदान, माजी विद्यार्थ्यांची साथ, पालकांचा सहभाग आणि शिक्षकांची धडपड या पंचसूत्रीतून शाळेचा चेहरामोहरा बदलला आहे. डिजिटल शिक्षणापासून फिरत्या वाचनालयापर्यंत आणि सौरऊर्जे पासून विद्यार्थ्यांच्या बचत बँकेपर्यंत विविध उपक्रमांमुळे डोंगरगणची शाळा तालुक्यात चर्चेचा विषय ठरत आहे.

इयत्ता पहिली ते चौथीपर्यंत ४२ विद्यार्थी आणि दोन शिक्षक अशी शाळेची पटसंख्या आहे. शिक्षक नारायण मंगलारम आणि ज्ञानेश्वर चेडे यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध उपक्रम राबविले जात आहेत. शाळेच्या विकासासाठी माजी विद्यार्थी संघ, शाळा व्यवस्थापन समिती, पालक, ग्रामस्थ तसेच तरुणांनी पुढाकार घेतला आहे.

**वर्गाबाहेरचेही शिक्षण !**

जिल्हाधिकारी कार्यालय, पोलीस स्टेशन, शासकीय कार्यालये व धार्मिक क्षेत्रांना भेटी, फिरते वाचनालय, अभिवाचन, वृक्षारोपण आणि आकाशवाणीवरील श्रुतनाटिका अशा उपक्रमातून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधण्यास मदत होत आहे.

शाळेच्या वर्गखोल्यांमध्ये इंटरॅक्टिव्ह पॅनल बसविण्यात आले असून संपर्क फाऊंडेशनच्या अभ्यासक्रमाची जोड मिळाली आहे. त्यामुळे पारंपरिक शिक्षणाला आधुनिक तंत्रज्ञानाची साथ मिळाली आहे. शाळेत सौरऊर्जा प्रकल्प, वॉटर प्युरिफायर, बोलक्या भिंती आणि आकर्षक रंगरंगोटी करण्यात आली आहे. वृक्षारोपण आणि स्वच्छता यामुळे परिसर 'ग्रीन अँड क्लीन' बनला आहे.

विद्यार्थ्यांमध्ये आर्थिक शिस्त निर्माण व्हावी यासाठी 'रामेश्वर विद्यार्थी बचत बँके'ची सुरुवात करण्यात आली आहे. सर्व विद्यार्थ्यांना स्पोर्ट्स ड्रेस देण्यात आला असून पालक व माजी विद्यार्थी संघाच्या सहकार्याने विद्यार्थ्यांना फळांचे वाटप केले जाते. कुसुमाग्रज वाचन अभियानांतर्गत विद्यार्थी वाचनालय सुरू करण्यात आले आहे. त्याचबरोबर दर मंगळवारी ऊर्जा गुरुकुल परिवाराच्या वतीने फिरते वाचनालय आणि अभिवाचनाचा उपक्रम राबविला जातो. वृक्षारोपणातून पर्यावरण संवर्धनाचा संदेशही विद्यार्थ्यांना दिला जात आहे.

डोंगरगण प्राथमिक शाळेचा संपूर्ण कायापालट झाला असून करून ग्रामस्थ ,पालक, शिक्षक व माजी विद्यार्थी संघाने मोठे सहकार्य केले. शाळेतील विद्यार्थी उज्वल देशाचे भविष्य आहे. त्यामुळे इतर गावांनी देखील शाळेच्या विकासासाठी प्रयत्न करण्याची गरज आहे.

**कैलास पटारे**



विद्यार्थ्यांना केवळ पुस्तकी ज्ञान न देता जिल्हाधिकारी कार्यालय, पोलीस स्टेशन, विविध शासकीय कार्यालये तसेच धार्मिक क्षेत्रांना भेटी देऊन प्रत्यक्ष अनुभवातून शिक्षण देण्यावर भर दिला जात आहे. आकाशवाणी येथे विद्यार्थ्यांनी 'अष्टावधानी शिवराय' ही श्रुतनाटिका सादर केली. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या कलागुणांना व्यासपीठ मिळाले आहे.

एकेकाळी केवळ वर्गखोल्यांपुरती मर्यादित असलेली शाळा आज गावकऱ्यांच्या सहभागातून शिकण्याची, घडण्याची आणि अनुभवण्याची जागा बनली आहे. सरकारी शाळेच्या विकासासाठी शासनाच्या मदतीसोबतच समाजाने पुढाकार घेतला तर कायापालट शक्य असल्याचे डोंगरगण शाळेने दाखवून दिले आहे.

## आ. दाते यांच्या माध्यमातून वेताळबाबा स्टेडियम सुशोभीकरणासाठी १५ लाख रुपयांचा निधी



**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**निघोज :** आ. काशिनाथ दाते यांच्या माध्यमातून निघोज येथील वेताळबाबा स्टेडियम सुशोभीकरणासाठी १५ लाख रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात आला असल्याची माहिती स्टेडियमचे सर्वेसर्वा तसेच आजी माजी सैनिक संघटनेचे पदाधिकारी मेजर विकास वराळ यांनी दिली आहे. यासाठी मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्टचे विश्वस्त विठ्ठलराव कवाद, रोहिदास लामखडे यांनी पुढाकार घेतला होता. आ. काशिनाथ दाते यांचे समर्थक कार्यकर्ते व मेजर वराळ यांनी पारनेर येथे जाऊन आ. दाते यांना याबाबत निवेदन दिले होते तसेच याबाबतचा प्रस्ताव तयार करून दिला होता. या सुशोभीकरणामध्ये महिला व पुरुष यांच्यासाठी स्वतंत्र स्वच्छतागृह तसेच चेंजींगरुम तसेच १८ बाय ३० चे पत्रा शेड आदिंचा समावेश असून लवकरच हे काम सुरू होणार आहे. निघोज येथे पुष्पावती नदीकिनारी जवळपास चार एकर जागेवर ग्रामस्थ, आजी माजी सैनिक संघटना तसेच खेळाडू व दानशूर दाते या सर्वांच्या लोकसहभागातून वेताळबाबा स्टेडियमची उभारणी करण्यात आली आहे. गेली पाच वर्षांपासून छोट्या मोठ्या कामांच्या माध्यमातून भव्य आणी दिव्य असेच क्रिडांगण उभे राहिले आहे निघोज आणी पंचक्रोशीतील शेकडो लोक सकाळी ६ ते ९ वाजेपर्यंत या ठिकाणी व्यायाम चालणे, तसेच क्रिकेट व्हॉलीबॉल खेळून व्यायाम करीत असतात सकाळ संध्याकाळ या ठिकाणी मोठ्या प्रमाणात युवक व ज्येष्ठ मंडळी तसेच महिला भगीनी यांची सातत्याने गर्दी असते. यासाठी चेंजींगरुम व स्वच्छतागृह यांची नितांत आवश्यकता होती.

## कुस्तीला प्रोत्साहनाचा कौतुकास्पद पुढाकार : डॉ. आहेर

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**



**पारनेर :** दिवसेंदिवस पारंपरिक खेळांकडे दुर्लक्ष होत आहे.अशा परिस्थितीत नगरसेवक युवराज पठारे यांनी कुस्तीला प्रोत्साहन देण्यासाठी पुढाकार घेतला,ही कौतुकाची बाब आहे. खेळातून जीवन कसे जगायचे याचे शिक्षण मिळते.त्यामुळे प्रत्येक गावात तालीम असणे आवश्यक आहे.असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. रंगनाथ आहेर यांनी केले.

पारनेर शहरातील छत्रपती क्रिडा संकुलात क्रीडा व युवक सेवा संचालनालय,पुणे व अहिल्यानगर जिल्हा क्रीडा कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने,न्यू इंग्लिश स्कूल व छत्रपती कुस्ती संकुल यांच्या सहकार्याने पारनेर तालुका शालेय कुस्ती स्पर्धांचे उद्घाटन पार पडले. या स्पर्धेत १४,१७ व १९ वर्षांखालील मुला-मुलींच्या गटातील स्पर्धा घेण्यात आल्या.

यावेळी नितीन अडसूळ, डॉ. बाळासाहेब कावरे, अर्जुन भालेकर,अशोक चेडे,डॉ.संतोष भुजबळ, योगेश मते,भूषण शेलार,बाळासाहेब पठारे, सचिन औटी,सुभाष शिंदे,कुंडलिक पठारे, बापूसाहेब होळकर उपस्थित होते. आहेर म्हणाले, कुस्ती आणि इतर पारंपरिक खेळांना प्रोत्साहन मिळाल्यास ग्रामीण भागातील खेळाडूंना मोठी संधी मिळेल. स्पर्धेच्या आयोजनासाठी युवराज पठारे यांनी पुढाकार घेतला. तालुक्यातील तालीम व कुस्ती संस्कृतीला चालना देण्यासाठी क्रिडा संकुलात विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत.

कुस्तीला प्रोत्साहन देणे आवश्यक आहे.तालीममधील अनेक पैलवान राज्यस्तरावर पोहोचले आहेत. महाराष्ट्र केसरीपर्यंत मजल मारण्याची क्षमता त्यांच्यात आहे. कुस्ती खेळाबरोबरच करिअरचीही संधी आहे.

**युवराज पठारे**
**नगरसेवक**

## शेवगाव तालुक्यात खरिपाची पैसेवारी ५० च्या आत जाहीर झाल्याने दुष्काळ जाहीर होण्याचा मार्ग मोकळा?

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**हातगाव :** शेवगाव तालुका हा महसूल क्षेत्रासह अग्रेसर असणारा तालुका म्हणून जिल्ह्यात ओळखला जात असून विस्ताराने‌ही मोठा तालुका समजला जाणाऱ्या या तालुक्यातील ११३ गावापैकी ८० गावे ही खरिपासाठी महसूल दप्तरी नोंदलेले असून चालू हंगामात सुरुवातीपासूनच पावसाने मोठी दडी मारल्याने तालुक्यातील खरिपाचे अख्खे पिक वाया गेले असल्यामुळे व त्यातच नुकतीच जिल्हाधिकाऱ्यांमार्फत खरिपाची नुकतीच पैसेवारी जाहीर झाली असून तालुक्यातील सर्वच्या सर्व ८० गावांची ५० च्या आतच पैसेवारी जाहीर झाली असल्याबाबतची माहिती तहसील कार्यालयातून देण्यात आली आहे. तालुक्यांतील खरिपाच्या गावातील मंजूर झालेली पैसेवारी पुढीलप्रमाणे शेवगाव तालुक्यातील ४३ गावाची ४९ पैसे पैसेवारी जाहीर करण्यात आली. ३७ गावाची ४८



पैसेवारी जाहीर झाली असल्याचेही तहसील कार्यालयातून सांगण्यात आले असून जाहीर झालेली नजर पैसेवारी असून यानंतर सुधारित जाहीर होऊन नंतर अंतिम पैसेवारी निश्चित करण्यात येईल असेही या वेळी सांगण्यात आले आहे.

## अंधश्रद्धेचा अंधकार दूर करण्यासाठी संतांची शिकवण आत्मसात करा

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**पाथर्डी शहर :** विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या युगात समाजाने प्रगतीची मोठी झेप घेतली असली, तरी अंधश्रद्धेचे सावट अद्यापही समाजमनातून पूर्णपणे दूर झालेले नाही. श्रद्धा आणि अंधश्रद्धा यातील फरक समजून घेत विवेकवादी विचारसरणी स्वीकारणे काळाची गरज आहे, असा सूर संत वामन तरुण मंडळाच्या वतीने आयोजित 'संतांची शिकवण-अंधश्रद्धा निर्मूलन' या प्रयोगशील जनजागृती कार्यक्रमात उमटला.

या कार्यक्रमाला नागरिकांची मोठी गर्दी झाली होती. नगरसेवक अमोल भैया गर्जे प्रमुख पाहुणे, तर पत्रकार राजेंद्र देवढे अध्यक्षस्थानी होते. अध्यक्षीय भाषणात राजेंद्र देवढे म्हणाले, संत वामनभाऊ तरुण मंडळ दरवर्षी विविध सामाजिक



आणि वैचारिक उपक्रम राबवून नागरिकांना काहीतरी देण्याचा प्रयत्न करते. वैचारिक कार्यक्रम, क्रीडा आणि विविध कलांना प्रोत्साहन देण्याचे काम मंडळ करीत आहे. यंदा १११ किलो कागदापासून गणेशमूर्ती साकारून पर्यावरणपूरकतेचा आदर्श निर्माण केला आहे. त्याचबरोबर संत वामनराव महिला टाळ पथकाची निर्मिती करून महिला शक्तीलाही व्यासपीठ दिले आहे. प्रमुख पाहुणे नगरसेवक अमोल गर्जे म्हणाले, डॉ. नरेंद्र दाभोलकर यांनी अंधश्रद्धेविरोधात आयुष्यभर लढा दिला. महाराष्ट्रात अंधश्रद्धा निर्मूलन कायदा लागू झाला आहे. कार्यक्रमासाठी सचिन नागापुरे, डॉ. मृत्युंजय गर्जे, संतोष गायकवाड, धनंजय बडे, रामप्रसाद आव्हाड, उद्धव दौंड, राजेंद्र जायभाय, प्रा. भगवान सांगळे, किरण पुरी, सिद्धार्थ गायकवाड, अशोक जेधे, कृष्णा जेधे, भूषण नागापुरे, प्रणव गव्हाणे, ऋषिकेश गायकवाड, वरद भालेराव, हर्षल आंधळे, स्वप्निल खेडकर, संदीप पानखडे, मंदाकिनी तुपे, चंद्रकला गायकवाड, सारिका जेधे, शैला बटुळे, शोभा सदामत आदी उपस्थित होते.

## समाजकारणाचा वारसा जपणारे लोकनेते मारुतरावजी घुले पाटील यांचे विचार दिशादर्शक : देवढे

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**एरंडगाव :** लोकनेते मारुतरावजी घुले पाटील यांच्या ९६ व्या जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमात बोलताना, माजी प्राचार्य शिवाजीराव देवढे यांनी त्यांच्या सामाजिक, सहकार आणि शैक्षणिक क्षेत्रातील योगदानाचा गौरव केला. व्यक्तीचा कालखंड किती आहे यापेक्षा त्याचे कर्तृत्व काय आहे, हे अधिक महत्त्वाचे असते. मारुतरावजींनी बहुजन समाज आणि ग्रामीण विकासासाठी दिलेले योगदान चिरकाल स्मरणात राहणारे आहे. गुणवत्तापूर्ण शिक्षण, कॉपीमुक्त परीक्षा, नाविन्यपूर्ण अध्यापन आणि बहुआयामी विद्यार्थी घडवणे हेच मारुतरावजींच्या विचारांना खऱ्या अर्थाने अभिवादन ठरेल, असे त्यांनी नमूद केले.

अहिल्यानगर येथील लोकनेते मारुतरावजी घुले पाटील कला, वाणिज्य व शास्त्र महाविद्यालयात त्यांची ९६ वी जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. यानिमित्ताने महाविद्यालयात विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा. पी. एन. खरड यांनी केले, तर प्रमुख मान्यवरांचा परिचय कला शाखाप्रमुख प्रा. एस. व्ही. मरकड यांनी करून दिला. अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ए. के. पंदरकर म्हणाले, स्वर्गीय मारुतरावजी घुले पाटील यांच्या शैक्षणिक



कार्यातून घडलेले असंख्य विद्यार्थी आज मोठ्या पदांवर कार्यरत आहेत, हेच त्यांच्या जयंतीनिमित्त खरे अभिवादन ठरले . या कार्यक्रमास उपप्राचार्य प्रा.पी.ए.फटांगरे, प्रा.डॉ.एस.बी.दहातोंडे आणि प्रा.एन.ए.गायके उपस्थित होते. स्पर्धांचे आयोजन व यशस्वी विजेते पुढील प्रमाणे, १. निबंध स्पर्धा -दिशा प्रकाश कनगरे, प्रथम पूर्वी धनंजय त्रिभुवन, द्वितीय प्रियंका संजय गाडे, तृतीय २. रांगोळी स्पर्धा भक्ती सागर भालेराव, प्रथम ईशा जयसिंग कर्डिले, द्वितीय आकाश शिवाजी इंगे, तृतीय अंकिता संतोष म्हस्के, चतुर्थ ३. मेहंदी स्पर्धा प्रिती रत्नकांत आढाव, प्रथम मायादेवी गोपेलाल निषाद, द्वितीय प्रतिभा अविनाश सोळसे, तृतीय ४. पीपीटी, स्पर्धा प्रगती हाबेल मकासरे, प्रथम सिद्धी प्रफुल्ल शेवाळे, द्वितीय निकिता रामदास बारस्कर, तृतीय कार्मक्रमाच्या यशस्वीतेसाठी कार्यालयीन अधीक्षक पी. व्ही. दळवी तसेच ऋतिक ताकपेरे, अल्तमस शेख, विनायक शेळके आणि शामा वाळके यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. के. आर. पिसाळ यांनी केले, तर आभार प्रा. एस. ए. घालमे यांनी मानले.

# बोधेगाव-बालमटाकळी परिसरात अवैध वृक्षतोडीचा कहर

## प्रशासनाच्या निदर्शनास आणूनही कारवाईचा अभाव; लाकूड तस्करीला आळा घालण्याची ग्रामस्थांची मागणी, आंदोलनाचा इशारा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**एरंडगाव :** शेवगाव तालुक्याच्या पूर्व भागातील बोधेगाव, बालमटाकळी तसेच परिसरातील गावांमध्ये मोठ्या प्रमाणावर अवैध वृक्षतोड सुरू असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. दिवसाढवळ्या तसेच रात्रीच्या वेळी मोठमोठी झाडे तोडली जात असून, याबाबत संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना वेळोवेळी माहिती देऊनही ठोस कारवाई होत नसल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

बोधेगाव, बालमटाकळी परिसरातील शेतशिवार, रस्त्यांच्या कडेला तसेच गावालगतच्या भागातील अनेक वर्षे जतन केलेली मोठी झाडे तोडली जात असल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. वृक्षतोडीसाठी आधुनिक यंत्रसामग्रीचा वापर केला जात असल्याने अल्पावधीत मोठ्या प्रमाणात झाडांची कत्तल होत असल्याचा आरोपही करण्यात आला आहे.

**रात्रंदिवस झाडांची कत्तल सुरू**

परिसरात रात्रीच्या वेळी तसेच दिवसाढवळ्या मोठ्या प्रमाणात झाडे तोडली जात असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. तोडलेल्या झाडांचे लाकूड विविध वाहनांमधून वाहून नेले जात असल्याचेही सांगण्यात येते. या प्रकारामुळे भविष्यात पाणीटंचाई, वाढते तापमान आणि अन्य पर्यावरणीय समस्या गंभीर होण्याची शक्यता नागरिकांनी व्यक्त केली आहे.



तोडण्यात आलेल्या झाडांचे लाकूड ट्रॅक्टर, टेम्पो तसेच अन्य वाहनांमधून वाहून नेले जात असल्याचे ग्रामस्थांनी सांगितले. या प्रकारामुळे परिसरातील हिरवळ कमी होत असून, पर्यावरणाचा समतोल बिघडण्याची भीती व्यक्त केली जात आहे. वृक्षतोडीचा परिणाम पक्षी, वन्यजीव आणि अन्य सजीवांच्या अधिवासावरही होत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. या संपूर्ण प्रकाराची माहिती संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणून दिल्यानंतरही कारवाई होत नसल्याने वृक्षतोड करणाऱ्यांचे मनोबल वाढत असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. प्रशासनाच्या कथित दुर्लक्षामुळे अवैध वृक्षतोडीला प्रोत्साहन मिळत असल्याची भावना नागरिकांमध्ये निर्माण झाली आहे. दरम्यान, प्रशासनाने तातडीने घटनास्थळी पाहणी करून वृक्षतोडीची सखोल चौकशी करावी, तोडण्यात आलेल्या झाडांची संख्या निश्चित करावी आणि दोषी आढळणाऱ्यांवर नियमानुसार कठोर कारवाई करावी, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

**लाकूड वाहतूक करणाऱ्या वाहनांचे वजन काटे तपासा**

अवैध वृक्षतोडीनंतर लाकूड वाहतूक करणाऱ्या वाहनांचे वजन कुठे आणि कोणाच्या माध्यमातून केले जाते, याचीही चौकशी करावी, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे. लाकूड वाहतूक करणाऱ्या वाहनांचे वजन काट्यांवरील नोंदी, वाहन क्रमांक, संबंधित कागदपत्रे तसेच वाहतुकीसाठी आवश्यक परवानग्यांची तपासणी करण्यात यावी. अवैध वृक्षतोड, लाकूड वाहतूक, साठवणूक किंवा विक्रीमध्ये सहभागी असलेल्या सर्व घटकांची चौकशी करून दोषींवर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी करण्यात

## द•ख•ल

### बॉक्सिंग स्पर्धेत रमजान पठाण व नाहीद पठाण यांची पुणे विभागीय स्पर्धेसाठी निवड





**श्रीगोंदा :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठांतर्गत संगमनेर महाविद्यालय, संगमनेर येथे १५ सप्टेंबर रोजी झालेल्या आंतरमहाविद्यालयीन बॉक्सिंग स्पर्धेत श्री शिवाजीराव नागवडे महाविद्यालयाच्या पाच खेळाडूंनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. या स्पर्धेत महाविद्यालयाच्या रमजान पठाण आणि नाहीद पठाण या दोन खेळाडूंची पुणे विभागीय क्रीडा स्पर्धेसाठी निवड झाली आहे. रमजान पठाण (ढध इ.डल.) याची ६०-६५ किलो वजनी गटात, तर नाहीद पठाण (डध इ.उे.) याची ९२ किलोपेक्षा अधिक वजनी गटात पुणे विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली.या उल्लेखनीय यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष राजेंद्रदादा नागवडे, सौ. अनुराधाताई नागवडे, संस्थेचे निरीक्षक सचिन लगड, सर्व विश्वस्त, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सतीशचंद्र सूर्यवंशी, उपप्राचार्य कातोरे सर तसेच पर्यवेक्षक टकले सर यांनी दोन्ही खेळाडूंचे अभिनंदन केले.खेळाडूंना डॉ. सतीश चोरमले आणि डॉ. महेश गिरमकर यांचे मार्गदर्शन लाभले. पुणे विभागीय स्पर्धेतही दोन्ही खेळाडूंनी दमदार कामगिरी करून महाविद्यालयाचे व संस्थेचे नाव उज्ज्वल करावे, अशा शुभेच्छा यावेळी देण्यात आल्या.

### नागबेंदवाडीला गणेशोत्सवानिमित्त कथा

**भाळवणी :** पारनेर तालुक्यातील नागबेंदवाडी (भाळवणी) येथे सालाबादप्रमाणे थोरामोठ्यांच्या आशिर्वादाने व भाविकांच्या सहकार्याने गणेशोत्सवानिमित्त अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन येथील हनुमान तरुण मित्र मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे. सप्ताहाचे हे २९ वे वर्ष असून गणेशोत्सवाचे हे १५ वे वर्ष आहे. शुक्रवार दि. १८ सप्टेंबर ते शुक्रवार दि. २५ सप्टेंबर २०२६ या कालावधीत यंदा किर्तनांना फाटा देत कथाकार ह.भ.प. मनोहर महाराज सिनारे यांच्या सुमधुर वाणीतून ताटी उघडा ज्ञानेश्वरा या संत ज्ञानेश्वर यांच्या जीवनावर आधारित संगीत कथेचे आयोजन करण्यात आले असून या कथेचा भाविकांनी लाभ घ्यावा असे आवाहन मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे. यंदा मंडळाच्या माध्यमातून दि. २५ सप्टेंबर रोजी सकाळी १० वा. जि.प. प्राथमिक शाळा नागबेंदवाडी येथे जनकल्याण रक्तपेढी अहिल्यानगर यांच्या वतीने रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे. तर शुक्रवार दि. २५ रोजी सकाळी ९ ते ११ या वेळेत भागवताचार्य ह.भ.प. मनोहर महाराज सिनारे यांच्या काल्याच्या किर्तनाने कथेची सांगता होणार असून नंतर मिरवणूकिने गणेश विसर्जन होणार आहे.

### भाळवणीत महात्मा फुले विद्यालयात चक्रधरस्वामी जयंती साजरी



**भाळवणी :** येथील महात्मा फुले माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात भगवान सर्वज्ञ श्री. चक्रधर स्वामींची ८०६ वी जयंती व ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालय ओम शांती ग्रुप कडून नशा मुक्त भारत अभियान साजरा करण्यात आला. यावेळी अध्यक्षस्थानी विद्यालयाचे सल्लागार समिती सदस्य दत्तात्रय पवार, विद्यालयाचे प्राचार्य व सहाय्यक विभागीय अधिकारी नाईकवाडी बी.एस., प्रभारी पर्यवेक्षिका आढाव मॅडम सर्व शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते. यावेळी बोलताना दत्तात्रय पवार यांनी सांगितले की श्री चक्रधर स्वामी हे परमेश्वरी अवतार होते त्यांनी महानुभाव पंथाची स्थापना केली व समाज सुधारण्याचे कार्य केले. त्यांनी मराठी भाषेला प्राधान्य दिले. अनेक लीळा करून ज्ञान, भक्ती, वैराग्य, समता, जातीभेद यांची शिकवण दिली. चोरी, लबाडी, मद्यपान, मांसाहार याला छेद देऊन कलियुगामध्ये प्रत्येक व्यक्तीने सप्त व्यसनांचा त्याग करून परमेश्वर भक्ती करावीअशी शिकवण चक्रधर स्वामींनी दिल्याचे सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संतोष रोहोकले यांनी केले, प्रा. नाईकवाडी यांनी आपले विचार व्यक्त केले. वर्षा ढगे यांनी आभार मानले.

### देवटाकळी जय - तुळजाभवानी वाचनालयात निबंध स्पर्धा



**दहिगाव ने :** देवटाकळी ( तालुका शेवगाव ) येथील तुळजाभवानी सार्वजनिक वाचनालयाचे संचालक संतोष मेरड यांच्या नियोजनात स्वर्गीय लोकनेते मारुतरावजी घुले पाटील यांच्या ९६ व्या जयंतीनिमित्त जय तुळजाभवानी सार्वजनिक वाचनालय वतीने निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. शालेय विद्यार्थ्यांसाठी हा उपक्रम एक प्रोत्साहन म्हणून राबवला असुन वाचनालय नेहमी राबवत असलेल्या विविध उपक्रमापैकी हा एक उपक्रम होता असे संचालक संतोष मेरड यांनी सांगितले. या निबंध स्पर्धेत येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, जिजामाता विद्यालय व जोहरापूर हायस्कूल मधील विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. स्पर्धेसाठी वाचनालय वतीने प्रथम ७०१ रु., द्वितीय ५०१ रु. व तृतीय ३०१ रु. असे बक्षीसे विविध गटांसाठी ठेवले होते. या बक्षीस वितरण सोहळ्यास सरपंच ज्ञानदेव खरड, तालुका कृषी उत्पन्न बाजार समिती संचालक अशोकराव मेरड, ग्रामपंचायत सदस्य आदिनाथ खरड, ह.भ.प. मिर्झे महाराज, शिवाजी साळुंखे, शंकर ओबळे, पांडुरंग ओंबळे, आनंद सावंत, पोस्टमन करीम भाई ग्रामस्थ, जिल्हा परिषद व हायस्कूल चे शिक्षक - विद्यार्थी यांची उपस्थिती होती. आभार संतोष मेरड यांनी व्यक्त केले.

### सावली स्कूल ऑफ नर्सिंगचा निकाल १०० टक्के

**टाकळी ढोकेश्वर :** सावली स्कूल ऑफ नर्सिंगने उज्ज्वल यशाची परंपरा कायम राखली आहे.नुकत्याच जाहीर झालेल्या एएनएम द्वितीय वर्षाच्या नर्सिंग परीक्षेचा निकाल १०० टक्के लागला असून, ग्रामीण भागातील विद्यार्थिनींनी गुणवत्तेचा झेंडा फडकावला आहे. परीक्षेस बसलेल्या सर्व विद्यार्थिनी चांगल्या गुणांनी उत्तीर्ण झाल्या आहेत.यामध्ये अनुक्रमे रजिया रज्जाक शेख हिने ८४.८३ टक्के गुणांसह प्रथम तर मंगल ज्ञानेश्वर दाभाडे हिने ७८.८३ टक्के गुणांसह द्वितीय तर साक्षी गेणुभाऊ भोसले हिने ७८.५० टक्के गुणांसह तृतीय क्रमांक पटकावला. विद्यार्थिनींच्या या घवघवीत यशाबद्दल संस्थेचे संस्थापक डॉ.भाऊसाहेब खिलारी,डॉ.स्वाती खिलारी तसेच संस्थेचे सर्व पदाधिकारी यांनी सर्व उत्तीर्ण व गुणवंत विद्यार्थिनींचे मनापासून अभिनंदन केले. विद्यार्थिनींची चिकाटी,मेहनत आणि शिक्षकांचे योग्य नियोजन यांमुळेच हे यश शक्य झाले असून आगामी काळात नर्सिंग स्कूल अशीच शैक्षणिक गुणवत्ता टिकवून ठेवेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. या सर्व यशस्वी विद्यार्थिनींना प्राचार्य शीतल गर्कल, प्रा.नामदेव वाळुंज,प्रा.पिंकी त्रिभुवन,प्रा.पुष्पा घुले यांचे मार्गदर्शन लाभले. ग्रामीण भागातील विद्यार्थिनींना नर्सिंग क्षेत्रात दर्जेदार शिक्षण आणि उत्तम प्रात्यक्षिक प्रशिक्षण मिळाल्यामुळेच हे उज्वल यश संपादन करता आले.

दैनिक
# राष्ट्र सह्याद्री
शुक्रवार दि.१८ सप्टेंबर २०२६ | अहिल्यानगर | पान नं. ८

## तालुक्याच्या हक्काचे पाणी अन् पूर्ण दाबाने वीज मिळालीच पाहिजे : बाळासाहेब थोरात

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**संगमनेर** : तालुक्यात सध्या विजेची अवस्था अत्यंत वाईट असून आवर्तन काळात ११ तास वीजपुरवठा सुरू ठेवण्याचे न्यायालयाचे निर्देश असतानाही वीज खंडित केली जात आहे. वीज गेली की पाणीही पुढे जात नाही. त्यामुळे शेतकरी व नागरिकांसाठी पाणी आणि वीज हे अत्यंत महत्त्वाचे प्रश्न असून तालुक्याच्या हक्काचे पाणी व पूर्ण दाबाने सुरळीत वीज मिळालीच पाहिजे.

अन्यथा प्रसंगी आंदोलनाची भूमिका घ्यावी लागेल, असा इशारा माजी कृषिमंत्री बाळासाहेब थोरात यांनी दिला. संगमनेर शेतकी संघाच्या ६७ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत ते बोलत होते. अध्यक्षस्थानी चेअरमन संपतराव डोंगरे होते. यावेळी माजी आमदार डॉ. सुधीर तांबे, डॉ. जयश्री थोरात, पांडुरंग पाटील घुले, आर. बी. राहणे, गणपतराव सांगळे यांच्यासह संचालक व विविध संस्थांचे पदाधिकारी उपस्थित होते. थोरात म्हणाले, यशवंतराव चव्हाण यांच्या कृषी-औद्योगिक धोरणातून शेतकी संघ व सहकारी संस्था उभ्या राहिल्या.

सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात व सहकाऱ्यांनी स्थापन केलेला संगमनेर शेतकी संघ आजही सक्षमपणे कार्यरत आहे. शेतकऱ्यांना खते व अन्य साहित्य उपलब्ध करून देण्यात संघाचे मोठे योगदान आहे. निळवंडे धरण व दोन्ही कालवे पूर्ण करून तालुक्याच्या पाण्याचा प्रश्न मार्गी लावला. १९८९ मध्ये भंडारदरा धरणातील ३० टक्के हक्काचे पाणी मिळवले.

न्यायालयीन संघर्षातून आवर्तन काळात ११ तास वीज मिळवली. मात्र मागील दोन वर्षांपासून पाणी व विजेबाबत अन्याय होत आहे. सध्या दुष्काळसदृश स्थितीत पिके सुकत असताना रात्रीच्या वेळी मोठ्या प्रमाणात वीज खंडित केली जात असल्याने शेतकऱ्यांनी जागरूक राहावे, असे आवाहन त्यांनी केले.



### खतांच्या दरवाढीवरून सरकारवर टीका

कृषिमंत्री असताना युरियाची गोणी ३५० रुपयांना होती. आता खतांच्या किमती वाढल्या असून बफर साठ्याच्या नावाखाली युरिया रोखून ठेवली जाते. शेतकऱ्यांना युरियासोबत इतर खत घेण्याची सक्ती केली जाते. पाणी व वीज या मूलभूत प्रश्नांकडे लक्ष देण्याऐवजी सत्ताधाऱ्यांचे मुरूम व वाळूकडे लक्ष असल्याची टीका थोरात यांनी केली.

## एक फोन अन् काम फत्ते !

### राधाकृष्ण विखे पाटलांचा पुढाकार : रोहित्र एका दिवसात बदलले

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री



**झरेकाठी** : संगमनेर तालुक्यातील परिसरातील खंडोबा मंदिराजवळील रोहित्र जळाल्याने शेतकऱ्यांसमोर संकट निर्माण झाले होते. जवळपास महिनाभरापासून रोहित्र बंद असल्याने शेतकऱ्यांना पिकांना पाणी देता येत नव्हते. त्यात पंधरा दिवसांच्या प्रतीक्षेनंतर बसविण्यात आलेले नवीन रोहित्रही अवघ्या काही तासांत जळाल्याने शेतकऱ्यांची चिंता आणखी वाढली होती. अखेर ही बाब पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या निदर्शनास आल्यानंतर त्यांनी तातडीने दखल घेत अवघ्या एका दिवसात नवीन रोहित्र उपलब्ध करून दिले.

पठारभागातील पिंपळगाव देपा परिसरात यंदा पावसाने पाठ फिरवल्याने खरीप हंगाम अडचणीत आला आहे. कडक उन्हामुळे पिके सुकत असताना शेतकऱ्यांना उपलब्ध पाण्याचा वापर करून पिकांना जीवदान देणे गरजेचे होते. मात्र, खंडोबा मंदिराजवळील रोहित्र जळाल्याने वीजपुरवठा खंडित झाला आणि सिंचनाचा प्रश्न निर्माण झाला. रोहित्र दुरुस्त अथवा बदलून मिळावे, यासाठी शेतकरी संबंधित यंत्रणेकडे पाठपुरावा करीत होते. मात्र, पंधरा दिवसांनी बसविण्यात आलेले रोहित्रही काही तासांत जळाल्याने शेतकऱ्यांसमोर पुन्हा मोठे संकट उभे राहिले. रोहित्र जळाल्याने शेतकऱ्यांना भेडसावणाऱ्या अडचणींची माहिती पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांना मिळाली. त्यांनी या प्रश्नाची तातडीने दखल घेत संबंधित यंत्रणेला सूचना केल्या. शेतकऱ्यांच्या अडचणीची तातडीने दखल घेऊन प्रत्यक्ष प्रश्न मार्गी लावल्याने समाधान व्यक्त केले.

## नेवासा कांदा बाजारात तेजी; कमाल भाव ५ हजार रुपये

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री



**नेवासा** : कांदा उत्पादक शेतकऱ्यांसाठी दिलासादायक चित्र निर्माण झाले असून, नेवासा कृषी उत्पन्न बाजार समितीच्या कांदा बाजारात गुरुवारी (दि. १७ सप्टेंबर) कांद्याला चांगला भाव मिळाला. बाजारात एकूण १४५ वाहनांची आवक झाली. यावेळी कांद्याला कमाल ५ हजार रुपये, सरासरी ४ हजार २५० रुपये तर किमान १ हजार ५०० रुपये प्रतिक्विंटल भाव मिळाला असल्याची माहिती सभापती नंदकुमार पाटील यांनी दिली. बाजार समितीतील लिलावात ४५०० ते ५००० रुपये दराच्या श्रेणीत ११ वाहने, ४००० ते ४५०० रुपये दरात ६० वाहने, ३५०० ते ४००० रुपये दरात ३७ वाहने, ३००० ते ३५०० रुपये दरात ९ वाहने, २५०० ते ३००० रुपये दरात १८ वाहने, तर १५०० ते २५०० रुपये दरात १० वाहनांची आवक झाली.बाजार समितीमध्ये लिलाव झालेल्या सर्व वाहनांना सरासरी ४२५० रुपये प्रतिक्विंटल दर मिळाला. यामध्ये बद्दा, गोट्टी, गोल्टा व सुपर मालाचा समावेश असल्याचे बाजार समितीने स्पष्ट केले आहे. कांद्याच्या बाजारभावात समाधानकारक स्थिती असल्याने परिसरातील कांदा उत्पादक शेतकऱ्यांना काहीसा दिलासा मिळाला आहे. माजी मंत्री शंकरराव गडाख यांच्या दूरदृष्टीमुळे नेवासा शहराच्या परिसराला देखील बाजारपेठेच्या दृष्टीने महत्व प्राप्त झाले असून नेवासा बाजार समितीचे सर्व संचालक मंडळ,सचिव व कर्मचारी वृंद यांच्या उत्कृष्ट नियोजनाखाली नेवासा कांदा मार्केटला दिवसेंदिवस बहर आलेला दिसत असून कांद्याला चांगला भाव ही निघत असल्याने कांदा उत्पादक शेतकऱ्यांमध्ये समाधान व्यक्त होत असल्याचे बाजार समितीचे सभापती नंदकुमार पाटील यांनी सांगितले.

## पोहेगावात सौर मोटार पंपाची चोरी; शेतकऱ्यांमध्ये भीती

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**पोहेगाव** : कोपरगाव तालुक्यातील पोहेगाव येथील पंचकेश्वर शिवारातील गट क्रमांक १८० मधून पाच अश्वशक्ती क्षमतेचा सौर मोटार पंप अज्ञात चोरट्यांनी चोरून नेल्याची घटना घडली. शेतकरी कैलास सुभाष औताडे यांच्या विहिरीतील पाणी उपसण्यासाठी बसविण्यात आलेला जैन सोलर कंपनीचा हा पंप चोरीस गेला. या घटनेमुळे परिसरातील सौरऊर्जा पंप वापरणाऱ्या शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. शेती साहित्याच्या चोरीच्या घटनांना आळा घालण्यासाठी पोलिसांनी रात्रीची गस्त वाढवून चोरट्यांचा बंदोबस्त करावा, अशी मागणी शेतकऱ्यांनी केली आहे. घटनेची माहिती मिळताच कोपरगाव तालुका पोलीस ठाण्याचे निरीक्षक संभाजी गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस कॉन्स्टेबल कुकडे यांनी घटनास्थळी भेट देऊन पंचनामा केला. याप्रकरणी कैलास औताडे यांनी फिर्याद दाखल केली असून, पुढील तपास पोलीस कॉन्स्टेबल कुकडे करीत आहेत. दरम्यान, पावसाने दडी मारल्याने परिसरातील खरीप पिकांवर संकट आले आहे. मका, सोयाबीन, कपाशी यांसह अन्य पिकांना पाण्याची गरज असताना शेतकऱ्यांनी विहिरीतील पाणी उपसण्यासाठी सौर पंप बसविले आहेत. अशा परिस्थितीत पंप चोरीला गेल्याने शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होण्याबरोबरच पिकांना पाणी देण्याची अडचण निर्माण झाली आहे.

## नागवडे कारखान्याच्या ६०व्या वार्षिक अहवालातून इथापे-मगर 'गायब'!

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**श्रीगोंदा** : सहकार महर्षी शिवाजीराव नारायणराव नागवडे सहकारी साखर कारखान्याच्या ६० वर्षांच्या वाटचालीचे दस्तऐवजीकरण करणाऱ्या वार्षिक अहवालातून ज्येष्ठ सहकार नेते बाबासाहेब इथापे आणि केशवभाऊ मगर यांचा उल्लेख अथवा छायाचित्र नसल्याने सभासदांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. विशेष म्हणजे कारखान्याच्या जडणघडणीत महत्त्वाची भूमिका बजावलेल्या माजी व्हा चेरमन बाबासाहेब इथपे व केशवभाऊ मगर यांना अहवालात स्थान नसल्याने यामागचे कारण काय, असा सवाल सभासदांकडून उपस्थित केला जात आहे.कारखान्याच्या उभारणीपासूनच्या प्रवासात अनेक ज्येष्ठ सहकार कार्यकर्त्यांनी योगदान दिले.

त्यामध्ये माजी उपाध्यक्ष बाबासाहेब इथापे आणि केशवभाऊ मगर यांचेही योगदान असल्याचे सभासदांचे म्हणणे आहे. त्यामुळे सहकार संस्थेच्या ६० वर्षांच्या इतिहासाचे प्रतिबिंब असलेल्या वार्षिक अहवालात या व्यक्तींचा साधा उल्लेखही का नाही? असा प्रश्न आता चर्चेचा विषय बनला आहे.वार्षिक अहवाल म्हणजे केवळ नफा-तोटा आणि आर्थिक आकडेवारी मांडणारे पुस्तक नसून, तो संस्थेच्या इतिहासाचा आणि वाटचालीचा दस्तऐवज मानला जातो. त्यामुळे कारखान्याच्या जडणघडणीत योगदान देणाऱ्या व्यक्तींची छायाचित्रे अथवा उल्लेख वगळण्यामागील नेमके कारण कारखाना व्यवस्थापनाने सभासदांसमोर स्पष्ट करावे, अशी मागणी होत आहे.६१व्या वार्षिक सर्वसाधारण सभेच्या तोंडावर वार्षिक अहवालातील या मुद्द्याने नवा वाद निर्माण होण्याची शक्यता आहे. सभासदांच्या नाराजीवर कारखाना व्यवस्थापन काय स्पष्टीकरण देते, याकडे आता सहकार क्षेत्राचे लक्ष लागले आहे.

## निराधारांच्या प्रकरणांना 'कार्यालयीन फेऱ्यांचा' फास नको...!

### आ. काशिनाथ दाते यांच्या अध्यक्षतेखाली समितीची बैठक

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री



**पारनेर** : संजय गांधी निराधार योजनेच्या पात्र लाभार्थ्यांना शासकीय कार्यालयांच्या विनाकारण फेऱ्या माराव्या लागू नयेत, तसेच प्रलंबित प्रकरणांचा नियमानुसार तातडीने निपटारा करावा, अशी मागणी समितीचे सदस्य पंढरीनाथ उंडे यांनी केली. तहसील कार्यालय, पारनेर येथे गुरुवार, दि. १७ सप्टेंबर रोजी समितीचे अध्यक्ष तथा आमदार काशिनाथ दाते यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत सामाजिक सुरक्षा योजनांच्या अंमलबजावणीचा आढावा घेण्यात आला.

बैठकीत संजय गांधी निराधार योजना व इतर सामाजिक सुरक्षा योजनांशी संबंधित प्रकरणे, पात्र लाभार्थी आणि प्रलंबित अर्जांबाबत अधिकाऱ्यांकडून माहिती घेण्यात आली. गरजू आणि वंचित घटकांना शासनाच्या योजनांचा लाभ वेळेत मिळावा, यासाठी प्रशासकीय प्रक्रिया सुलभ करण्यावर चर्चा झाली. 'लाभार्थ्यांना विनाकारण झुलवत ठेवू नका' यावेळी बोलताना पंढरीनाथ उंडे म्हणाले, संजय गांधी निराधार योजनेच्या लाभासाठी येणाऱ्या पात्र लाभार्थ्यांना कार्यालयीन प्रक्रियेत विनाकारण झुलवत ठेवता कामा नये. त्यांची प्रकरणे नियमानुसार तातडीने निकाली काढण्यासाठी प्रशासनाने कार्यवाही करावी. पात्र व्यक्तींना आपल्या हक्काच्या योजनेचा लाभ मिळविण्यासाठी वारंवार कार्यालयाच्या फेऱ्या माराव्या लागू नयेत.

पात्र लाभार्थ्यांच्या प्रकरणांची नियमानुसार तपासणी करून आवश्यक प्रशासकीय कार्यवाही करण्याबाबत बैठकीत चर्चा झाली. योजनांचा लाभ वेळेत मिळण्यासाठी समिती आणि प्रशासनामध्ये समन्वय राखण्यावर भर देण्यात आला. यावेळी नायब तहसीलदार आकाश किसवे, समितीचे सदस्य पंढरीनाथ उंडे, सुधामती कवाद, रवींद्र आहेर, रमेश गाडगे, तुकाराम खाडे, अनिल वाबळे, तालुका समन्वयक शुभांगी औटी, सहाय्यक महसूल अधिकारी अलका कंद, अर्चना जगताप यांच्यासह संबंधित अधिकारी उपस्थित होते.

## जेष्ठा गौरीचे नेवासा शहरासह तालुक्यात उत्साहात स्थापना

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**नेवासा** : शहरासह तालुक्यात जेष्ठा गौरी महालक्ष्मीची उत्साहात स्थापना करण्यात आली.यावेळी सुवासिनींनी महालक्ष्मी देवींचे विधीवत पद्धतीने पंचारती ओवाळून व नैवेद्य अर्पण करून पूजन केले.गौराई आली गौराई आली..सोन पावलांनी गौराई आली असे म्हणत घरोघरी झालेल्या आगमनाने व महालक्ष्मी गौराई आरतीच्या निनादाने वातावरण मंगलमय बनले होते.

जेष्ठा गौरी महालक्ष्मीची स्थापना करण्याची लगबग आदल्या दिवशी पासूनच महिला सुवासींनीमध्ये दिसून येत होती,महालक्ष्मीदेवीसाठी लागणारे अलंकार व सजावटीचे साहित्य घेण्यासाठी नेवासा शहरातील बाजार पेठेत गर्दी दिसून येत होती नेवासाफाटा व शहर परिसरासह तालुक्यात ही हेच चित्र दिसून येत होते. महालक्ष्मी देवींना नैवेद्य अर्पण करण्यात आला होता. सुवासिनींनी देखील व्रत केले. जेष्ठा गौरी महालक्ष्मींना पहिल्या दिवशी साध्या भाजी भाकरीचा नैवेद्य अर्पण करण्यात येतो तर दुसऱ्या दिवशी पाचीपक्वान्न याचा नैवैद्य भोजन रूपाने महाप्रसाद दिला जातो. तिसऱ्या दिवशी सायंकाळी महालक्ष्मीचे विसर्जन केले जाते.

या तीन दिवसांच्या काळात घरोघरी महालक्ष्मीपुढे आरास केली जात असल्याने ती आरास पहाण्यासाठी सुवासींनीना हळदी कुंकुवाचे निमित्त साधून निमंत्रित केले जाते.



नेवासा येथील गायत्रीनगर येथील पत्रकार सुधीर चव्हाण व विठ्ठल चव्हाण यांच्या निवासस्थानी बसलेल्या जेष्ठा गौरी श्री महालक्ष्मी देवींच्या मूर्ती दिसत आहे.

छाया-आदित्य चव्हाण

## पाचेगाव फाट्याजवळ ट्रँकर झाडावर आदळला; चालक जागीच ठार




प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**नेवासा** : श्रीरामपूर-नेवासा मार्गावर पाचेगाव फाट्याजवळ गुरुवारी (दि. १७) पहाटे रिकामा अल्कोहोल वाहतूक करणारा ट्रँकर रस्त्याच्या कडेला असलेल्या लिंबाच्या झाडावर आदळून झालेल्या अपघातात चालकाचा जागीच मृत्यू झाला. एकनाथ रामकृष्ण पवार (वय ५७, रा. भगूर, ता. वैजापूर, जि. संभाजीनगर) असे मृत चालकाचे नाव आहे.

श्रीरामपूर येथील जी. के. शर्मा यांच्या कंपनीचा ट्रँकर (क्रमांक एमएच-१७-सीव्ही-९७४७) श्रीरामपूरहून नेवासाकडे जात होता. पहाटे सुमारे पाच वाजण्याच्या सुमारास पाचेगाव फाट्याजवळ ट्रँकर अचानक रस्त्याच्या कडेला असलेल्या लिंबाच्या झाडावर आदळला. धडकेत ट्रँकरची पुढील बाजू व चालकाचा केबिन पूर्णपणे दबला गेल्याने पवार हे त्यात अडकून पडले.

पहाटे व्यायामासाठी जाणाऱ्या पाचेगाव येथील नागरिकांच्या हा प्रकार निदर्शनास आला. त्यांनी कारवाडी येथील वाहनचालकांना माहिती दिल्यानंतर ग्रामस्थांनी घटनास्थळी धाव घेतली. कारवाडी येथील ज्ञानेश्वर घोगरे यांनी स्वतःचा जेसीबी, तर टाकळीभान येथील बाबासाहेब कोकणे यांनी हायड्रा उपलब्ध करून दिला. सुमारे दोन ते तीन तासांच्या अथक प्रयत्नांनंतर चालकाला केबिनमधून बाहेर काढण्यात आले.

शिवमुद्रा रुग्णवाहिकेचे चालक विकास निपुंगे घटनास्थळी दाखल झाले. मृतदेह शवविच्छेदनासाठी नेवासाफाटा येथील शासकीय रुग्णालयात पाठविण्यात आला. डॉ. वाल्मीक तुवर यांनी घटनेची माहिती कारवाडी येथील शकील बेग यांना दिली. अर्जुन काकडे, बाबासाहेब साठे, सलीम शेख, कय्युम बेग, जुनेद बेग, आदिल बेग, ज्ञानेश्वर माळी, आसिफ बेग यांच्यासह ग्रामस्थांनी बचावकार्यात सहकार्य केले. अपघाताचे नेमके कारण समजू शकले नाही.

## विद्यार्थ्यांना स्कूल बॅगचे वाटप, शिक्षणाला प्रोत्साहन देण्याचा उपक्रम

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**कोपरगाव** : वाढदिवसाचा आनंद केवळ उत्सव आणि औपचारिक कार्यक्रमांपुरता मर्यादित न ठेवता, समाजाच्या उपयोगी पडणाऱ्या उपक्रमातून साजरा करण्याची परंपरा जोपासत नगराध्यक्ष पराग संधान यांचा वाढदिवस विद्यार्थ्यांसोबत सामाजिक उपक्रम राबवून साजरा करण्यात आला. पराग संधान मित्र मंडळाच्या वतीने मा. माधवरावजी कचेश्वर आढाव माध्यमिक व तांत्रिक विद्यालय, कोपरगाव येथे विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य म्हणून स्कूल बॅगचे वाटप करण्यात आले. वाढदिवसानिमित्त आयोजित या उपक्रमातून विद्यार्थ्यांच्या शिक्षणाच्या प्रवासाला हातभार लावण्याचा प्रयत्न करण्यात आला. शालेय जीवनात विद्यार्थ्यांना आवश्यक असणारे साहित्य उपलब्ध करून देण्यासोबतच शिक्षणाबद्दल सकारात्मक वातावरण निर्माण करणे आणि विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देणे, हा या उपक्रमामागील प्रमुख उद्देश होता. विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर उमटलेला आनंद आणि त्यांच्या शिक्षणासाठी मिळणारे प्रोत्साहन हीच वाढदिवसाची खरी भेट असल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली. कोल्हे कुटुंबाची सामाजिक कार्याची शिकवण माझ्या कामाची प्रेरणा आहे. बिपीनदादा कोल्हे यांच्या वाढदिवसाला शैक्षणिक साहित्य वाटप अनेक वर्षापासून केले जाते त्याचप्रमाणे स्नेहलताताई कोल्हे आणि आ.विवेकभैय्या कोल्हे यांची सातत्याने समाजाप्रती असणारी जाणीव विविध सामाजिक उपक्रम राबवण्यासाठी आम्हाला प्रेरणा देते अशी प्रतिक्रिया नगराध्यक्ष पराग संधान यांनी व्यक्त केली. वाढदिवसानिमित्त होणारा प्रत्येक उपक्रम हा केवळ औपचारिक न राहता समाजाच्या उपयोगी पडणारा आणि एखाद्याच्या भविष्यात सकारात्मक बदल घडविणारा असावा, ही भूमिका या उपक्रमातून अधोरेखित झाली. समाजातील गरजू घटक, विद्यार्थी आणि युवकांच्या विकासासाठी अशा उपक्रमांना सातत्याने प्रोत्साहन मिळणे आवश्यक आहे. शिक्षणाच्या माध्यमातून सक्षम पिढी घडविण्यासाठी समाजातील प्रत्येक घटकाने आपापल्या परीने योगदान देणे गरजेचे असल्याचे यावेळी सांगण्यात आले. या प्रसंगी विजयराव आढाव, मनोज अग्रवाल, संजनाताई उदावंत, प्रसाद आढाव, स्वप्नील मंजुळ, हारुणभाई, रियाज सर, सतीश काकडे, रावसाहेब साठे, कलविंदर दडियाल, रोहित कनगरे, दादा नाईकवाडे, शैलेश नागरे, अशोक वराट, समाधान कुऱ्हे, मनोज इंगळे, शुभम सोनवणे, गौरव आढाव, दुर्गेश गवळी, कृष्णा पडियार, अभिषेक मंजुळ,तोहिद कच्छी, संजय खरोटे, आनंद मोरस्कर, संजय उदावंत,रोहीत एरंडे, यांच्यासह इतर सहकारी उपस्थित होते.विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करून सामाजिक बांधिलकी जपत वाढदिवस साजरा करण्याच्या या उपक्रमाचे उपस्थितांकडून स्वागत करण्यात आले.

## राहुरी बार असोसिएशनतर्फे आ. प्राजक्त तनपुरे यांचा भव्य सत्कार



प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**राहुरी** : राहुरी न्यायालयातील वकिलांच्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या विविध समस्यांचा निपटारा केल्याबद्दल माजी राज्यमंत्री तथा आ. प्राजक्त तनपुरे यांचा त्यांच्या वाढदिवसानिमित्त राहुरी तालुका बार असोसिएशनच्या वतीने राहुरी न्यायालयातील बार रूममध्ये भव्य सत्कार करण्यात आला.

राहुरी न्यायालयातील वकिलांच्या विविध समस्या गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित होत्या. आमदार प्राजक्त तनपुरे यांनी या समस्यांकडे लक्ष घालून त्या मार्गी लावण्यासाठी प्रयत्न केले. यामध्ये सीनियर डिव्हिजन कोर्ट हॉलशेजारी वकिलांसाठी असलेली खोली तब्बल आठ वर्षांपासून प्रलंबित होती. ही खोली पूर्णत्वास आणून अद्ययावत करण्यात आली. वकिलांना सुविधा उपलब्ध झाल्याने बार असोसिएशनच्या वतीने आ. तनपुरे यांचा जाहीर सत्कार करण्यात आला.

दरम्यान, वाढदिवसाचे औचित्य साधून आमदार तनपुरे यांनी सामाजिक बांधिलकी जपत डोंगरगण येथील गोशाळेला एक गाडी चारा मोफत दिला. तसेच राहुरी शहरातील गाडगे आश्रमातील गरजू विद्यार्थ्यांना त्यांच्या हस्ते शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले.

यावेळी राहुरी तालुका बार असोसिएशनचे अध्यक्ष ॲड. प्रशांत मुसमाडे, उपाध्यक्ष, ॲड. बाळासाहेब बाचकर, ॲड. ज्ञानेश्वर येवले, ॲड. योगेश शिंदे, ॲड. प्रसाद कोळसे, ॲड.राहुल शेटे, ॲड. जीवन राऊत, ॲड. जगन्नाथ डौले, ॲड. विक्रम आघाव, ॲड. नानासाहेब तनपुरे, ॲड. अमोल पानसंबळ, ॲड. राहुल आवटे, ॲड. सुंदर बाप्पू माने, ॲड. शशिकांत शिरसाठ, ॲड. सुभाष आंबडकर, ॲड. सुनील घोगरे,ड. मोहनीश शेळके, ॲड.सविता गांधले, ॲड. पल्लवी कांबळे, ॲड. कल्याणी पागिरे, ॲड. सुरेखा कुलकर्णी, ॲड. उज्वला शेरकर, ॲड. अनिता तोडमल, ॲड. अदिती औटी, ॲड. श्वेता आघाव, ॲड. ज्योती राऊत, ॲड. रीया पंजाबी, ॲड. जया गावडे, ॲड. अशोक तनपुरे, ॲड. श्वेता पेरणे आदींसह वकील बांधव व उपस्थित मान्यवर सहभागी झाले होते.